



# क्रांतिमाता
# लक्ष्मीबाई नायकवडी

एका
लढवय्या
क्रांतिमातेचा
इतिहास...

- जयवंत अहिर

# क्रांतिमाता लक्ष्मीबाई नायकवडी

लेखक

जयवंत अहिर (मामा)

नाग-नालंदा
प्रकाशन

नाग-नालंदा
प्रकाशन

**Krantimata Laxmibai Nayakvadi**
Jayvant Ahir (Mama)

ISBN : 978-93-82451-43-3

**क्रांतिमाता लक्ष्मीबाई नायकवडी**

**लेखक :**
**जयवंत अहिर (मामा)**
मु.पो.ता. वाळवा, जि. सांगली
फोन : (०२३४२) २६७२३८
मोबा. : ९०२१७०२४७८

**© सर्व हक्क लेखकाधिन**

**प्रथमावृत्ती :**
२७ जून, २०१५
(क्रांतिमाता लक्ष्मीबाई नायकवडी स्मृतिदिन)

**अक्षरजुळणी :**
आयुष ग्राफीक्स, कोल्हापूर

**मुख्य वितरक :**
हुतात्मा बझार, वाळवा

**प्रकाशक :**
**त्र्यंबकेश्वर मिरजकर**
नाग-नालंदा प्रकाशन
विशालनगर, मु. पो. इस्लामपूर,
ता. वाळवा, जि. सांगली
Email : tbmirajkar76@gmail.com
मोबा. : ९८८१०३५८०३

**मुखपृष्ठ साहाय्य :**
अनिल शेजाळे, आष्टा

**चित्रकार :**
वसीम शिकलगार, इस्लामपूर

**मुखपृष्ठ :**
विद्याधर कांबळे, हातकणंगले

**मुद्रक :**
लायन प्रिंटींग प्रेस, कोल्हापूर

**मूल्य : ₹ १०० (शंभर रुपये)**

भारताच्या स्वातंत्र्य चळवळीत सहभागी झालेल्या
वीरमाता
नगाक्का ज्ञानु बोगर
राजूताई बळवंतराव बिरनाळे
इंदूताई बाबुजी पाटणकर
शेवंता ज्ञानू साळसकर
तानुबाई खंडू शेळके
भागिर्थी रामचंद्र गुरव
आणि
क्रांतिमातेला बळ देणाऱ्या सखी-सांगातिनी
हौसाबाई किसन अहिर
भागुबाई संतु अहिर
धोंडुबाई यशवंत कदम
किसाबाई यलाप्पा अहिर
बाळकाबाई भाऊ अहिर
हौसाबाई धोंडी अहिर
ताराबाई भाऊ अहिर
ज्यांच्या अपूर्व साहस व त्यागातून स्वातंत्र्याची सुरम्य पहाट उगवली....!
या लढावू स्त्रियांच्या चरणी ही शब्दफुले अर्पण...!!

## मनोगत

पद्मभूषण क्रांतिवीर डॉ. नागनाथअण्णा नायकवडी म्हणजे भारताच्या स्वातंत्र्य चळवळीतील एक रोमहर्षक पर्व! या क्रांतिवीराला घडविला, तो मात्र क्रांतिमाता लक्ष्मीबाई नायकवडी यांनी. म्हणूनच मला सौ. लक्ष्मीबाई व नागनाथअण्णा हे आधुनिक काळातील जिजाऊ-शिवबा वाटतात. या नररत्नाला जन्म देणारी, वाढवणारी संस्काराची खाण म्हणजे लक्ष्मीबाई नायकवडी होय. या क्रांतिमातेचा जीवनप्रवास सर्वांनाच थक्क करून सोडणारा असला तरीही आजअखेर त्या क्रांतिमातेवर स्वतंत्र रूपाने ग्रंथ लेखन झालेले नाही. यादृष्टीने त्या उपेक्षितच राहिल्या. म्हणूनच मी हे त्यांचे छोटेखानी चरित्र वाचकांसमोर ठेवत आहे.

यापूर्वी मी साने गुरुजींची 'श्यामची आई' वाचली. संपादक उत्तम कांबळेंचे 'आई समजून घेताना' हे पुस्तक वाचले. त्याच वेळी मला क्रांतिमातेच्या चरित्र लेखनाची प्रेरणा मिळाली. क्रांतिमाता लक्ष्मीबाई नायकवडी या इतिहास घडविणाऱ्या नायिका होत्या. आपल्या वागण्या, बोलण्याने त्यांनी अनेक माणसे जोडली आणि जपली. जोडलेल्या प्रत्येकाची त्या आस्तेवाईकपणे विचारपूस करत, त्यांना जेवू-खाऊ घालत. त्यांना क्रांतिकार्यात सहभागी करून घेत. प्रत्यक्षात त्यांना नागनाथ व शामराव ही दोन मुलं, पण त्या हजारोंच्या आई होत्या. त्या कधीच फक्त चार भिंतीच्या आतल्या संसारात रमल्या नाहीत. त्यांनी देश-समाज यांची सेवा करण्यात धन्यता मानली. मी ३०-३५ वर्षे या क्रांतिमातेला जवळून पाहिलं, अनुभवलं. त्यातूनच हा त्यांचा क्रांतिकारक इतिहास शब्दबद्ध झालेला आहे.



क्रांतिमाता लक्ष्मीबाईचं पुस्तकी शिक्षण कमी असलं, तरी त्यांचं लहानपण हे कलकत्तासारख्या मोठ्या शहरात गेलं. त्यामुळे त्या हिंदी भाषा सुबक बोलत. त्या दिसायला साध्या होत्या. राहणीमानही साधंच होतं. नऊवारी टोप पदराचं लुगडं, टाचेपर्यंतचा पदर, कपाळावर लांबूनही स्पष्ट दिसावा असा लालभडक कुंकवाचा टिळा, यातून त्यांचं मराठमोळंपण जाणवत होतं. आई साध्या असल्या तरी त्यांचे विचार नवे आणि आधुनिक होते. स्त्रियांनी चूल आणि मुल एवढ्यापुरतं मर्यादित न राहता शिकलं पाहिजे, घरच्या कर्त्या पुरुषांनी मुलींना शाळेत घातलं पाहिजे, यासाठी त्या आग्रही होत्या. या विचाराची जोपासना त्यांनी स्वत:च्या घरापासून केली. थोरल्या सुनबाई सौ. कुसुमताई यांना प्रोत्साहन देऊन लग्नानंतर पदवीपर्यंतचं शिक्षण दिलं. विशाखाताई, शोभाताई या नातींनाही त्यांनी पदवीपर्यंतचं शिक्षण दिलं. मुलींसाठी जिजामाता विद्यालय व गरीब-गरजू मुलींना राहण्यासाठी सावित्रीबाई फुले वसतिगृह सुरू व्हावे म्हणून त्यांनी नागनाथअण्णांना प्रोत्साहन दिलं. त्यांनी जुनं चांगलं ते जोपासलं आणि नवीन चांगलं ते समजून-उमजून स्वीकारलं. अशा क्रांतिमातेचे चरित्र माझ्या हातून लिहून होत आहे, हे माझे भाग्य होय.

हे पुस्तक लिहिताना मला अनेकांनी साहाय्य केलं. त्यामध्ये मुलाणी सर, न कंटाळता प्राथमिक टंकलेखन करणारे माझे मित्र माणिक म. कुलकर्णी यांचे योगदान मोठे आहे. वैभवकाकांनी तर जाहीर सभेत मला आवाहन केलं, ''जयमामा, तुम्ही दुसरं काही करू नका. जुना इतिहास लिहिण्याचं काम करा.'' त्यांच्या या शब्दांनी मला बळ मिळालं. माझी मुलगी डॉ. ज्योत्स्ना व पत्नी सौ. जयश्री मला म्हणायच्या, ''अण्णा हयात होते त्यावेळी सतत त्यांच्यासोबत कामात रहावे लागायचे. अण्णांचा सहवास संपल्यामुळे आता तुमच्याकडे भरपूर वेळ आहे. लिहिण्याची कला व आवड आहे. तुम्ही क्रांतिवीर नागनाथअण्णांवर लिहिलेलं पुस्तक खूप गाजलं. तेव्हा त्यासारखंच अण्णांच्या आईंवरपण पुस्तक लिहा.'' दोघींचा सारखा तगादा होता. म्हणूनच मी हे लेखन करू शकलो.

मी लिहिले मात्र त्याला पुस्तकाचे सुबक रूप देण्याची जबाबदारी नाग-नालंदा प्रकाशनाचे तरुण प्रकाशक त्र्यंबकेश्वर मिरजकर यांनी उचलली. मी पट्टीचा लेखक नाही. भाषा-वाक्यरचना सुधारून घेण्याचे महत्त्वपूर्ण काम राहील पट्टेकरी व प्रा. डॉ. श्यामसुंदर मिरजकर यांनी केले. अक्षरजुळणी संदीप

गोंजारे यांनी केली. मुखपृष्ठ साहाय्य अनिल शेजाळे तर मुखपृष्ठाचे चित्र वसीम शिकलगार यांनी काढले. मुखपृष्ठ ग्राफिक्स विद्याधर कांबळे यांनी तयार केले. हुतात्मा शिक्षण व उद्योग समुहातील सर्व शिक्षक-शिक्षिका, प्राध्यापक-प्राध्यापिका, प्रशासकीय सेवक, साखर कामगार, पदाधिकारी, शेतकरी व कार्यकर्ते या सगळ्यांचे आभार मानावेत तेवढे थोडेच आहेत. नातू अभिजीत विकास अहिर याची या पुस्तकासाठीची धडपड मोलाची आहे. या सगळ्यांच्या प्रतिभेचा स्पर्श या लेखनाला अधिक दर्जेदार व प्रभावी बनविणारा ठरलेला आहे. मला मदत करणाऱ्या सगळ्यांचाच उल्लेख करणे शक्य नाही. माझ्या लेखनावर प्रेम करणाऱ्या सर्वांचे मन:पूर्वक आभार मानून हे ऐतिहासिक चरित्र वाचकांच्या हाती देत आहे. वाचकांनी आपल्या प्रतिक्रिया जरूर कळवाव्यात ही विनंती.

**- जयवंत अहिर**



## अनुक्रम

मनोगत । ०४
क्रांतिमातेशी संबंधित छायाचित्रे । ०९
१. शूरवीरांचं घराणं । १७
२. लष्करी वातावरणातील बालपण । १९
३. कन्या सासुराशी जाय... । २४
४. संसाराची वाटचाल व मुलांची जडणघडण । ३१
५. क्रांतिकार्यासाठी दिला पुत्र । ३६
६. क्रांतिकार्यातील सखी : नगाक्का । ४३
७. पोलिसांचा ससेमिरा । ४५
८. लक्ष्मीबाईंनाही अटक । ४९
९. क्रांतिमातेला भेटली लेक । ५१
१०. येरवड्यातून सुटका । ५४
११. आठवणीतील शेवंता । ५७
१२. संसार जोडणाऱ्या क्रांतिमाता । ६२

१३. जनतेची क्रांतिमाता । ६६
१४. जीवाला चटका । ६८
१५. अन्नदात्री क्रांतिमाता । ७०
१६. अनोखा लग्नसोहळा । ७२
१७. स्वातंत्र्याची चाहूल । ७४
१८. स्वातंत्र्याची रम्य पहाट । ७६
१९. फाळणीची वेदना । ७८
२०. हुतात्म्यांचा स्मृतिदिन । ८१
२१. हुतात्म्यांची जिवंत स्मारके । ८३
२२. क्रांतिवीराचे लग्न । ८६
२३. सामाजिक चळवळीतील आईसाहेब । ८९
२४. आठवणीतल्या क्रांतिमाता । ९४
२५. सर्वसामान्यांची आई । १००
२६. क्रांतिमाता अनंतात विलीन । १०३
क्रांतिमातेवरील काव्य । १०९



**प्रकरण एक**

## शूरवीरांचं घराणं

आपल्या देशावर जुलमी इंग्रज राज्य करीत होते, तेव्हा इ.स. १९०० च्या दरम्यान घडलेली ही कथा आहे. याच काळात वाळवा तालुक्यातील मिरजवाडी या खेडेगावी एका सर्वसामान्य शेतकरी कुटुंबात सौ. तानुबाई व संभाजीराव साळुंखे या माता-पित्याच्या पोटी लक्ष्मीबाई या कन्येचा जन्म झाला. इंग्रजांचे जुलमी अन्याय, अत्याचार जवळून पाहिलेल्या या लक्ष्मीबाईने पुढे इंग्रजांचा कर्दनकाळ जन्मास घातला आणि ती सांगली-सातारा जिल्ह्याला आदर वाटावा अशी क्रांतिमाता बनली. क्रांतिमाता सौ. लक्ष्मीबाई नायकवडी या नावाने इतिहासात एक तेजस्वी सुवर्णपान निर्माण झाले. त्याचीच ही कथा आहे.

इस्लामपूर-सांगली या राज्य मार्गावर सव्वालाखी आष्टा हे गाव आहे. या गावाखाली येणाऱ्या वाड्यांपैकी मिरजवाडी हे दोन-अडीचशे उंबऱ्याची वस्ती असणारं गाव. इथला जमीन-जुमला पोटापुरता. सगळी जमीन कृष्णा-वारणेच्या खोऱ्यातल्या सुपीक प्रदेशात मोडणारी. सगळी पिकाऊ. थोडेफार गायरान सोडले तर सगळी जमीन काळी कसदार. पावसावर अवलंबून असणारी शेती. पाऊसकाळ चांगला झाला तर एक वर्ष पिकवावं आणि तीन वर्ष गावानं बसून खावं, असं पीक काळी आई भूमिपुत्रांच्या पदरात टाकणारी.

अशा या छोट्या वाडीत अप्पाजी साळुंखे या सामान्य शेतकऱ्याच्या कुटुंबात चरित्रनायिकेच्या वडिलांचा म्हणजे संभाजीरावांचा जन्म झाला. त्यांचे

बालपण मिरजवाडीत गेले. आई-वडिलांनी उत्तम संस्कार केले. ब्रिटिश आमदानीतील त्या जुन्या काळात संभाजीरावांचे शिक्षण सातवीपर्यंत झाले. संभाजीरावांना एक बहीण होती, भागूबाई. तशातच घरच्यांनी संभाजीरावांचे लग्न लहान वयातच उरकले. कळत-नकळत कुटुंबाची जबाबदारी संभाजीरावांवर येऊन पडली. संभाजीराव अंगापिंडाने भरलेला मर्दाना गडी. युद्ध व साहसाची आवड. त्यातूनच त्यांनी ब्रिटिश लष्करात भरती होण्याचा निर्णय घेतला. सहा फूट उंची, अंगाने तगडा, रंगाने गोरा, रूबाबदार पण करारी व्यक्तिमत्त्व. पहिल्याच प्रयत्नात त्यांची निवड झाली. आणि एका आठवड्यात पुण्याला मिलिटरी कॅम्प मराठा बटालियनमध्ये हजर राहण्याचा आदेश मिळाला.

मिलिटरी हुकूमानुसार संभाजीराव पुण्याला हजर झाले. सुरुवातीला त्यांना खडकवासला कॅम्पमध्ये ट्रेनिंगला पाठवण्यात आले. तीन महिन्याच्या ट्रेनिंगनंतर ब्रिटिश लष्करी सेवेचा रितसर करार करून घेऊन त्यांची नेमणूक करण्यात आली. लवकरच लष्करी जीवनाला संभाजीराव सरावले. मिळणाऱ्या पगारातून त्यांनी आर्थिक बचत केली. चार वर्षात त्यांच्या प्रयत्नाने गावाकडे विहीर काढली. घर बांधले. बहिणीचे लग्नही उरकले. एकंदर घराची घडी चांगली बसली. वडील अप्पाजी शेती मेहनतीने कसत होते, तर आई यसाबाई घर सांभाळून शेतीतही हातभार लावत होती. या चार वर्षात घरी नियमित पैसे पाठविणे या पलीकडे कोणतीच कौटुंबिक जबाबदारी संभाजीरावांवर नव्हती. पुण्यातल्या चार वर्षानंतर त्यांची मनमाडला बदली झाली. नंतर तीन वर्षातच ठाण्याच्या मिलिटरी कॅम्पमध्ये त्यांना पाठवण्यात आले. याच दरम्यान त्यांना प्रमोशन मिळणार अशी सुचिन्हे दिसत होती. मात्र प्रमोशन मिळाल्यावर कुठेतरी लांबच्या प्रदेशात बदली होणार हे निश्चित होते. सुख-दुःखाची, ऊन-सावली मनावर घेऊन ते दोन महिने सुट्टीसाठी गावी आले. मनातील उलघाल घरच्यांना सांगितली. अप्पाजी म्हणाले, ''घाबरू नकोरं पोरा! सैनिकानं बिऱ्हाड पाटीवर बांधून मुलूखगिरी करायची असती. घरादाराचा विचार करून पराक्रम गाजवता येत नाही. रयत राजं शिवबा डोळ्यांपुढं ठेव आणि कुठंबी जा. घराण्याचं नाव कर.'' वडिलांच्या या उद्‌गाराने संभाजीराव निश्चिंत झाले.

■■■



प्रकरण दोन

## लष्करी वातावरणातील बालपण

दोन महिन्यांच्या सुट्टीनंतर संभाजीराव आपल्या पत्नीसह ठाणे मिलिटरी कॉलनीमध्ये परतले. दुसऱ्या दिवशी ड्युटीवर हजर झाले. ऑफिसमध्ये जाऊन साहेबांना हजर रिपोर्ट दिला. त्याचवेळी साहेब म्हणाले, ''संभाजीराव, अभिनंदन! आपले प्रमोशन झाले आहे. आता तुम्ही सुभेदार झाला आहात. त्याचबरोबर आपली बदली कलकत्याला झाली आहे. येणाऱ्या एक तारखेला कलकत्याला हजर व्हायचे आहे. तीन आठवडे बाकी आहेत. दरम्यान तुमची कामे पूर्ण करून सिनिअर ऑफिसरकडे चार्ज द्या आणि योग्यवेळी बदलीच्या ठिकाणी हजर व्हा. ऑल द बेस्ट! गुडलक!!''

बढती आणि बदलीची ऑर्डर घेऊन ते घरी परतले. ही आनंदाची वार्ता प्रथम पत्नीला सांगितली. तीही आनंदली. संसाराची नवी नव्हाळी तिच्या अंगावर सजली होती. लवकरच संसाराच्या वेलीवर एक सुंदर फूल उमलणार याची चाहूल त्या उभयतांना लागली होती. संभाजीराव तिला म्हणाले, ''तू आता दोन जिवांची बाई झाली आहेस. परंतु बाळंतपणाला अजून अवकाश आहे. तुझे पहिले बाळंतपण. या धावपळीचा तुला त्रास नको. तुला आपल्या घरी मिरजवाडीला किंवा तुझ्या माहेरी मर्दवाडीला सोडतो. आणि मी कलकत्याला हजर होतो. तू असे कर, गरजेपुरते सामान बाजूला ठेव आणि बाकी सामानाची बांधाबांध कर. मिलिटरी ट्रकने सामान हालवता येईल.''

त्यावर तानुबाई म्हणाली, ''मला अजून खूप अवकाश आहे. प्रवासाची दगदग होणार नाही. मी तुमच्या सोबत येते. तुमच्या खाण्यापिण्याचे हाल नकोत. शिवाय माझी आई बाळंपणावेळी ठाण्याला येतो म्हणाली होती. तिला निरोप दिला तर ती कलकत्यालासुद्धा येईल. माझ्या माहेरी तशी फारशी अडचण नाही.''

खूप विचारांती संभाजीरावांनी गावाकडे दोन पत्रे पाठवली. पहिले पत्र मिरजवाडीला पाठवून आपल्या आई-वडिलांना ही आनंदाची वार्ता दिली. दुसरे पत्र मेव्हण्याला पाठवून कलकत्याला जाण्यापूर्वी सासूबाईंना ठाण्यास घेऊन येण्यास कळवले. रात्र थोडी, सोंगे फार अशी त्यांची अवस्था झाली होती. एक तर कलकत्ता म्हणजे लांबचा प्रदेश, पर मुलूख. वेगळी माणसे, वेगळी भाषा, वेगळ्या चालीरिती हे सगळे बायकामाणसांना कसे जुळणार अशी चिंता मनाला सतावत होती. कलकत्याला जाण्यापूर्वी एकदा गावाकडे आपल्या माणसांना धावती भेट दिली पाहिजे, असे वाटत होते. कारण त्या परमुलखातून पुन्हा कधी येणे होईल, हे सांगता येण्यासारखे नव्हते.

संभाजीराव मुळात निर्भीड व धाडशी. येईल त्या प्रसंगाला तोंड देण्याची सवय. त्यांनी हिंमतीने साऱ्या जबाबदाऱ्या पूर्ण केल्या. कलकत्याला जाण्याची तयारी केली. दोन दिवस अगोदरच रेल्वेचे रिझर्व्हेशन करून तिकीट काढले. पुन्हा मिलिटरी कॅम्प व कॉलनीतील मित्रपरिवारांची भेट घेतली. सामानसुमान आवरले. सकाळी दहाची रेल्वे गाठण्यासाठी धावपळ व आवराआवर केली. पत्नी तानुबाई व सासुबाईंसह ठाणे रेल्वे स्टेशनवर आले. सोबत दोन मिलिटरीतील शिपाई होते. गाडी होती. आवश्यक सामान स्वत:सोबत ठेवले अन् बाकीचे लगेजच्या डब्यात टाकले. पत्नी व सासूबाईस गाडीत बसवून स्वत: गाडीबाहेर जवानांशी बोलत थांबले. चहा घेतला.

गाडी सुटण्याचा सिग्नल पडला. शिपाई म्हणाले, ''सुभेदार साहेब, शिट्टी होईल, गाडीत बसा.'' संभाजीराव गाडीच्या दरवाजात उभे राहिले. हवेत धुराचे लोट सोडीत ती झुग-झुग गाडी प्लॅटफॉर्म सोडून पुढे निघाली. संभाजीरावांनी शिपायांना हात हालवून निरोप दिला. ओळखीची माणसे आणि ओळखीचा परिसर मागे पडत होता. एका नव्या प्रदेशात आयुष्याचे नवे वळण सुरू होणार होते. संभाजीराव बराच वेळ गाडीच्या दारातून बाहेर बघत उभे राहिले. मग



पत्नीजवळ आले. भूतकाळ मागे पडत होता. भविष्यकाळ खुणावत होता.

कलकत्त्याच्या नव्या वातावरणात हळूहळू कुटुंब रुळले. इकडे येऊन आता सहा महिने होऊन गेले. संभाजीराव अधीरपणे 'बाप' होण्याच्या दिवसाची वाट पाहू लागले. शेवटी तो दिवस उजाडला. २० व्या शतकाच्या प्रारंभी १९०१ मध्ये तानुबाईंनी गोड-गोजिऱ्या मुलीला जन्म दिला. घर आनंदाने भरून गेले. पारतंत्र्याच्या काळात कलकत्त्यात जन्मलेली ही 'लक्ष्मी' भविष्यात क्रांतिकारकाला जन्म देणारी क्रांतिमाता होणार आहे, याची पुसटशी चाहूलही कोणाला नव्हती.

दिवाळीच्या सणाचे ते दिवस होते. लक्ष्मीपूजनाच्या दिवशी या कन्येचा जन्म झाला. तिच्या रूपाने घरात समृद्धी येईल असे वाटू लागले. तिचे नाव लक्ष्मीच ठेवण्यात आले. बाराव्या दिवशी मिलिटरी कॅम्पमधील मित्रपरिवाराने मराठमोळ्या पद्धतीने मुलीचे बारसे घातले. कन्या जन्माचा आनंदोत्सव साजरा केला. सर्वांना जिलेबीचे गोड जेवण देण्यात आले. गव्हाळ वर्ण, सुदृढ प्रकृती, काळेभोर जावळ, पाणीदार डोळे, लांब नाक अशी लक्ष्मी सुरेख दिसायची. थोड्याच दिवसात या लक्ष्मीचा मिलिटरी कॉलनीतील सर्वांना लळा लागला.

दिवस हळूहळू जात होते. लक्ष्मी चंद्राच्या कलेप्रमाणे वाढत होती. तिचे रम्य बालपण आई-वडिलांच्या मायेच्या वर्षावात घडत होते. संभाजीरावांनी आपली कन्या ३-४ वर्षाची होताच तिला मिलिटरी कॅम्पमधील बालवाडीत घातले. देशाच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या फौजी जवानांची मुले त्या बालवाडीत शिकत होती. विविध धर्म, जातींची मुले गुण्यागोविंदाने राहात होती. त्या मुलांच्या संगतीत छोटी लक्ष्मी हिंदी भाषा सराईतपणे बोलू लागली. तिच्या त्या बोबड्या बोलाचे संभाजीरावांना मोठे कौतुक वाटायचे. ती वडिलांना 'दादा' म्हणायची. ते प्रेमाने तिला 'आक्का' म्हणायचे.

लक्ष्मी शाळेच्या एक एक पायऱ्या पार करत पुढे जात होती. त्याचवेळी तिला लष्करी जवानांच्या कवायती, त्यांचे ट्रेनिंग यांचेही कुतूहल वाटायचे. ती दादाच्या पाठी लागून कवायती बघायला जायची. बंदुका, रायफली घेऊन जवान कसे जातात. कसे गोळीबाराचे ट्रेनिंग घेतात ते ती पहायची. सैनिकांची घोडेस्वारी तिला खूप आवडायची. लवकरच संभाजीरावांनी तिला घोड्यावरून रपेट करायला शिकवली. त्यामुळे या लष्करी वातावरणाने तिची मानसिकताही दृढ झाली. थोड्याच दिवसात ती एकटीच घोडदौड करायला शिकली. परंतु

याच काळात तिला उद्दाम इंग्रजी अधिकाऱ्यांच्या वागण्याचा अनुभव आला. त्यांचे सैनिकांशी तुच्छतेने वागणे, त्यांना नेहमी दुय्यम दर्जाची वागणूक देणे, स्वत:समोर झुकायला लावणे या गोष्टींचा ओरखडा तिच्या बालमनावर झाल्याशिवाय राहिला नाही. आपल्या दादांना इतर सैनिक मान देतात, आदर देतात, हे जसे तिला जाणवायचे तसे आपल्या दादांना इंग्रजांसमोर विनाकारण झुकावे लागते हेही तिला अनुभवाला यायचे. तिला ते बिलकूल आवडायचे नाही. ती म्हणायची, ''त्या गोऱ्या फिरंग्याचे तुम्ही काही ऐकू नका दादा. ते गोरे जर तुम्हाला त्रास द्यायला लागले तर सरळ त्यांना गोळ्या घाला.''

लक्ष्मीच्या या बोलाची त्यांना गंमतही वाटायची आणि भीतीही. लक्ष्मीच्या निर्भय बोलण्याचे शिपायांना मात्र कौतुक वाटायचे. आपल्या सुभेदाराची मुलगी म्हणून ते तिचे लाडही करायचे. संभाजीराव म्हणायचे, ''ही लष्कराची नोकरी म्हणजे डोक्यावर टांगती तलवार आहे. या बदलीतून जसा त्रास होतो तसा आनंदही कुटुंबाच्या वाट्याला येतो. सगळा भारत बघायला मिळतो. वेगवेगळ्या मुलखातील माणसं, त्यांचे राहणीमान समजून घेता येते. 'देश तसा वेश' हेही पटलं. त्यांचं खाणं-पिणं, वागणं मी जसं अनुभवलं तसं माझ्या कुटुंबानं देखील अनुभवलं. त्यांची सुख-दु:खं भोगली. त्यांच्या सणासुदीचा आनंद घेतला. या साऱ्या गोष्टींमुळे माझ्या मुलींची चांगली जडणघडण झाली. तशी मला ओळीनं आठ मुलं झाली. त्यापैकी पहिल्या सात मुली आणि आठवा मुलगा बाबासाब. थोरल्या लक्ष्मीच्या पाठीवर सहा मुली झाल्या. त्यातल्या तीन वाचल्या, तिघींचा अकाली मृत्यू झाला.''

आपल्या देशबांधवांविरुद्ध इंग्रज आम्हाला लढायला लावत आहेत, याची बोच संभाजीरावांना होती. ते अधूनमधून बोलून दाखवत. एक दिवस ते पत्नीला म्हणाले, ''माझी लष्करातील नोकरी लवकरच संपत आहे, लिहून दिलेल्या बाँडची मुदत संपताच आपण सर्वजण गावाकडे जाऊ.'' इंग्रजांचा आदेश मोडणाऱ्यांवर अमानुष अत्याचार करण्याचे आदेश दिले जायचे. त्यामुळे लाठीचार्ज, गोळीबार या गोष्टी वारंवार घडायच्या. निरपराध भारतीयांवर अत्याचार करण्यासाठी आपले हात वापरले जात आहेत, या जाणिवेने ते अस्वस्थ झाले होते. कधी एकदा नोकरीचा बाँड संपतो अन् आपण इंग्रजांच्या ताबेदारीतून मुक्त होतो असे त्यांना वाटे.



संभाजीरावांना आपल्या लेकीचे मोठे कौतुक वाटे. ते तिला आदरार्थी बोलवत. लक्ष्मीबाई आता दहा-अकरा वर्षाच्या झाल्या म्हणजे जाणत्या झाल्या, असे त्यांना वाटे. लक्ष्मीबाई आपल्या वडिलांना म्हणत, ''हे इंग्रज मोठे क्रूर आहेत. ते आपल्या लोकांना विनाकारण छळतात. तुम्ही त्यांची नोकरी सोडा.'' अशा वेळी ते गप्प राहात. अस्वस्थ होत. त्यांची घालमेल होई. आपल्या लेकीला कसे समजवावे त्यांना कळायचे नाही. ते पत्नी तानुबाईला मनाची व्यथा सांगायचे. तानुबाई म्हणायची, ''अहो, नका उगा तिची काळजी. मी समजावीन तिला.''

बघता बघता शेवटचे चार महिने कधी संपले ते संभाजीरावांना कळलेच नाही. लष्कराच्या नोकरीतून मुक्त झाल्यावर ते आपल्या गावी मिरजवाडीला आले. लक्ष्मीच्या पाठच्या मुलींना शाळेत घातले. पेन्शन बऱ्यापैकी मिळत होती. त्यातून मुलींच्या शिक्षणाचा खर्च, दवापाण्याचा खर्च व इतर घरखर्च यांचा आर्थिक मेळ बसत नव्हता. म्हणून ते फावल्या वेळी इस्लामपूर कचेरीत लोकांची कामे करायला जात असत. त्यातून मिळणाऱ्या थोड्याफार पैशाने संसाराला हातभार लागत होता.

असेच दिवस जात होते. गावाकडे येऊन चार-पाच वर्षे झाली. संभाजीरावांचे सगळ्या मुलांवर प्रेम होते. परंतु त्यांना लक्ष्मीबाईचे विशेष वाटायचे. 'पहिली बेटी, तूप रोटी' म्हणत त्यांनी तिला लाडाकोडात वाढविले होते. त्यामुळे लक्ष्मीबाईंमध्ये निर्भय सुधारकांचे गुण असल्याचे संभाजीरावांना जाणवायचे. तिच्याजवळ उच्च-नीच, गरीब-श्रीमंत असा भेदभाव नव्हता. ती सगळ्यांशी सारखंच वागायची. सर्व जातीधर्मांच्या मुला-मुलींशी समानतेने वागायची. एखाद्यावर अन्याय होत असेल तर ती भांडायला उठायची. तिचे वागणे अनेकदा तिच्या आई-वडिलांना आश्चर्यचकित करायचे. अशी लेक पोटी आली याचा त्यांना अभिमानही वाटायचा. परंतु त्याचवेळी त्यांना चिंता वाटायची. किती केलं तरी पोरीची जात. उद्या ती नांदायला जाणार. तिथं तिचं कसं होणार हा प्रश्न त्यांना सतावायचा.

■ ■ ■

प्रकरण तीन

# कन्या सासुराशी जाय...

सोमवारचा दिवस होता. संभाजीरावांनी सकाळची न्याहरी आटपली. अंगात कोट, डोक्याला कोशा फेटा, मलमली धोतर असा पेहराव करून ते घराच्या बाहेर पडण्याच्या बेतात होते. जाता जाता फेट्याचा तुरा नीट करावा म्हणून ते आरशात डोकावत होते. पायात वहाणा सरकवून ते बाहेर पडणार त्याच वेळी आतून तानुबाई बाहेर आल्या आणि फणकाऱ्यानं म्हणाल्या, ''बास झाली आता फुकटची पाटीलकी. गावाच्या कामाला पुढं आणि घरचं पडलंय कोडं.''

संभाजीराव म्हणाले, ''असं का म्हणता? काय मनात आसल ते स्पष्ट बोला.''

तानुबाई म्हणाल्या, ''गावाचं गाऱ्हाणं कळतय, खरं घरातलं दुखणं दिसंना व्हय!''

संभाजीराव पुढे म्हणाले, ''अगं तुला काय सांगायचं ते मला नीट कळंल असं बोलशील का न्हाई. का उगीच असं तोंड वाजवायल्यास.''

तानुबाई म्हणाल्या, ''एवढं कसं कळंना. अहो आपल्या पोरीकडं बघा तरी. पोरीची जात येरंडावानी वाढत्या. पोरी आता न्हात्याधुत्या झाल्या. लग्नाला आल्या, तरी तुमचं ध्यान नाही. एकी पाठोपाठ एक चौघींची लग्न करावी लागतील. त्यांच्यासाठी पै-पावण्यात चांगलं स्थळ शोधशिला का गावाची कामं करत तालुक्याला फिरशिला. थोडातरी इचार करावा माणसानं.''



तानुबाईंच्या बोलण्यानं संभाजीरावांच्या डोक्यात प्रकाश पडला. त्यांनी आपल्या मुलींकडे पाहिलं. थोरली आक्का आता अगदीच थोराड दिसत होती. अंगा-खांद्यावर बागडणारी पोर कवा एवढी मोठी झाली कळलंच नाही. ते म्हणाले, ''आता काय करू म्हणतीस मी?'' त्यावर तानुबाई म्हणाली, ''आवो आष्ट्याला तुमच्या भणीकडं जावा. चार पै-पावण्यांची भेट घ्या. औंदा लगीन काढलंय म्हणून सांगा. कुठून तरी मागमूस लागतोय का बघा. घरात बसून का पोरीचं लगीन व्हतय.''

संभाजीरावांना बायकोचं म्हणणं पटलं. ते म्हणाले, ''तू अगदी बराबर बोलतीयास. आज जरा महत्त्वाचं काम हाय. तेवढं उरकतो. माझ्यामुळं माणसं खोळंबतील. उद्याच आष्ट्याला जातो. आता आपल्या आक्काचं हात पिवळं करायलाच पाहिजेत.'' संभाजीरावांच्या या बोलण्यानं तानुबाई सुखावल्या.

दुसऱ्याच दिवशी संभाजीराव आष्ट्याला गेले. पाहुण्यांच्या कानावर मनातील गोष्ट घातली. पुढे एक-दोन पाहुण्यांना भेटून आपला मनोदय सांगितला. पै-पाहुण्यात लेकीसाठी योग्य स्थळ शोधण्याचा त्यांचा प्रयत्न सुरू झाला. दोन-चार स्थळं त्यांनी नजरेखाली घातली; परंतु मनासारखी पसंती घडत नव्हती.

तुळशी पुनवेचा सण जवळ आला होता. एकदा का तुळशी पुजा झाली की पोरा-पोरींची लग्न धुमधडाक्यात होत होती. तर त्यासाठी पालकांचे चपलाचे जोड झिजवायचे चालले होते. पोरींचे बाप चितागती होऊन पै-पावण्यात फिरत होते. एकदा आष्ट्याच्या आठवडी बाजारासाठी तानुबाई गेल्या. लवकर बाजारहाट करायचा आणि नणंदेची भेट घेऊनच परतायचे असे त्यांनी योजले. बाजारातून वाकडी वाट करून त्या नणंदेकडे गेल्या तर नणंदबाई दारातच जोंधळे नीट करत बसल्या होत्या. आपल्या वहिणीला बघताच त्या हरखल्या. उठून हाताला धरून त्यांनी वहिणीला घरात नेले. तांब्याभर पाणी दिले. त्या म्हणाल्या, ''अगदी बोलावल्याप्रमाणं आलासा. मी दारात बसून मिरजवाडीला जाणारं कोण दिसतंय का ते बघत हुतो. एका चांगल्या स्थळाचा पत्ता लागलाय. वाळव्याच्या गणपती नायकवडींचा पोरगा हाय. पाहुण्यापैचा दोरवा मी काढलाय. स्थळ चांगलं हाय. सोमवारी घर बघायला या असा सांगावा त्या पावण्यांनी दिलाय. त्योच निरोप कागदावर लिहून तुझ्याकडं पाठविणार हुते. आता दादाला समदं सांग. मुलगा, घरदार, शेतीवाडी समदं बघून ये म्हणाव. मग पुढल्या गोष्टी ठरविता येतील.''

तानुबाईंना मनातून आनंद झाला. पाहुणचार घेऊन आणि नणंदेने दिलेला कागद नीट जपून ठेवून त्या मिरजवाडीला निघाल्या. बाजारहाट केलेली पाटी डोक्यावर होती. दिवस बुडता बुडता त्या घरी पोचल्या. पोरी आईची वाटच बघत होत्या. थोरल्या आक्कानं डोईवरची पाटी उचलून घेतली. भरलेला तांब्या आईपुढे धरला. घटकाभर बसल्यावर चूळ भरून हात-तोंड धुवून तानुबाई घरात गेल्या. घरात मधल्या ठावनीवर एक दिवा लावून ठेवला. कंदील घेऊन म्हसरांच्या धारा पिळल्या. दुधाची कासांडी घरात आणली. धाकटी मुलगी आऊबाईला खोताच्या घरी दूधाचं रतीब घालायला पाठवले. चूल पेटवून भाकरीसाठी तवा ठेवला. एका बाजूला वैलावर दूध तापत ठेवले. भाकरी करता करता तापलेल्या दुधाची डिचकी उतरून ठेवली. कालवणाला फोडणी दिली. गाडग्यात कालवण रटारटा शिजत होते. त्या काळात सणासुदीला भात केला जायचा. इतर वेळी जोंधळ्याच्या कण्या, नाचणीची आंबील केली जायची. आज तानुबाईंनी कण्या केल्या होत्या.

त्या काळात विजेचे दिवे नव्हते. पंचायतीच्या खर्चाने चौका-चौकात दिवे पेटवले जायचे. टिपूर चांदणे पडलेले होते. रानामाळात गेलेली माणसे घराकडे परतत होती. संभाजीराव घरात आले. पाठोपाठ दारात खेळणारी मुलेही आत आली. साऱ्यांनी हातपाय धुतले. अंगणात चांदण्याच्या प्रकाशात जेवणाची पंगत बसली. जेवता जेवता तानुबाईंनी विषय काढला. त्या म्हणाल्या, ''आष्ट्याला बाजारला गेलेते तवा तुमच्या बहिणीकडं जाऊन आले. त्यांनी आपल्या आक्कासाठी स्थळ काढलंय. वाळव्याच्या नायकवड्यांचा मुलगा हाय म्हणत्यात. मुलगा चांगला हाय, निर्व्यसनी हाय असं कळतय. त्या पावण्यांनी सोमवारी घर बघायला बोलिवलंय. त्यांच्या नाव-गाव-पत्याचा कागूदबी दिलाय. जरा वाचून बघा नंतर.''

जेवणानंतर संभाजीरावांनी बहिणीनं दिलेला कागद बघितला. पाहुण्या-पैचा कुठे दोरवा लागतो का या विचारात ते गढून गेले. पाहुणे कसे असतील? आपल्या लेकीचे नशिब कुठे असेल? असे अनेक प्रश्न त्यांच्या मनात येऊ लागले. सोमवारी वाळव्याला जायचे म्हणजे चार जाणती माणसे बरोबर पाहिजेत. कुणाकुणाला सोबत न्यावे याचा त्यांनी मनाशी ताळा केला. दुसऱ्या दिवशी भावकीतला सावळा, मैतर आप्पा माने आणि खोतांच्या वाड्यातील अण्णा यांना निरोप दिला.



सोमवारी सकाळी सगळेच लवकर उठले. गोठा झाडून घेतला. जनावरांना वैरण-पाणी दाखवले. म्हसरांच्या धारा काढल्या. न्याहरी करून संभाजीराव कडीपाटावर झोके घेत बसले. थोड्याच वेळात सावळा आणि आप्पा माने आले. त्यांना चहापान देऊन सगळे बाहेर पडले. खोतांच्या वाड्यात जाऊन त्यांना बरोबर घेतले.

संभाजीरावांनी कोट, कोशा पटका, बूट असा पेहराव केला होता. घराबाहेर पडतानाच त्यांच्या कारभारणीनं हातावर दही देऊन दोन गोष्टी सांगितल्या होत्या. तानुबाई म्हणाल्या, ''मुलगा अंगानं धट्टा-कट्टा आन् स्वभावानं चांगला असला, घरची माणसं मायाळू असली तर जमीन जुमला, घर-इस्टेट यावर भर देऊ नका. तुमाला चांगलं वाटलं तर मुलगी बघायला या असा निरोप देऊनच या.''

१९१४-१५ चा काळ होता. त्यावेळी ब्रिटिशांचा अंमल आणि दरारा होता. त्यावेळी प्रवासासाठी आतासारखी एसटीची सोय नव्हती. पाणाचंदच्या हाप्टणी कोळशावर चालणाऱ्या होत्या. तशाच काही रॉकेल, डिझेलवर चालणाऱ्या होत्या. संभाजीराव आणि मंडळी मिरजवाडीच्या पाराजवळ आली. अर्ध्या तासातच पाणाचंदची हाप्टन आली. सगळे वाळव्याला जाण्यासाठी गाडीत बसले. पडवळवाडीच्या फाट्यावर वाळव्याला जाण्यासाठी उतरावे लागत होते. तेथून चार मैल चालत जावे लागत होते. हाप्टन अर्ध्या तासात पडवळवाडी फाट्यावर पोहोचली. संभाजीराव सग्यासोयऱ्यांसह खाली उतरले. आणखी दोन माणसेही खाली उतरली. सगळेच वाळव्याच्या रस्त्याला लागले. चालता चालता बोलणे सुरू झाले. ती दोन माणसे वाळवेकर होती. कुठून आला, कशासाठी आला चौकशी झाली. संभाजीराव म्हणाले, ''आम्हाला गणपती नायकवडींच्या घरची सोयरीक आली आहे. माणसं कशी आहेत, घर कसं आहे बघायला चाललोय.''

त्यावर वाळवेकर म्हणाले, ''पावणं गणपती नायकवडी म्हणजे व्यवहारी माणूस. दिला शब्द पाळणारा. त्याचा पोरगाबी चांगला हाय. नाव ठेवायला जागा न्हाई. अगदी डोळं झाकून पोरगी द्या.'' बोलता बोलता वेस आली. वाळवेकर गावात गेले. नायकवडी माळावर राहतात असे कळले. म्हणून मिरजवाडीकर तिकडे वळले.

दारात पाहुणे आल्याचे बघून गणपतरावांनी पुढे येऊन त्यांचे स्वागत

केले. हात-पाय धुवायला पाण्याचे तांबे दिले. पाहुणे बैठकीवर येऊन बसले. त्यांना पिण्याचे पाणी आणि गुळाचा खडा देण्यात आला. पाहुण्या रावळ्यांचा विषय निघाला. शेतीवाडीची चर्चा झाली. नायकवड्यांचा मुलगा बैठकीत बसला होता. मिरजवाडीकरांना मुलगा हरहुन्नरी वाटला. मुलगा पसंत पडला. मुलगी बघायला येण्याचे निमंत्रण देऊन आणि पाहुणचार घेऊन मंडळी उठली.

संभाजीराव इतर मंडळीच्या सोबत आष्टा या मधल्या वाटेने मिरजवाडीला चालत पोहोचली. तेव्हा संध्याकाळ झाली होती. तानुबाई आणि पोरी वाटेकडे डोळे लावून होत्या. संभाजीराव घरी आले तसे घरात चैतन्य पसरले. पोरींनी पाण्याचा तांब्या हातात ठेवला. संभाजीरावांनी हात-पाय धुतले. ते घरात येऊन माच्यावर बसले. ते काय सांगतात याकडे सगळ्यांचे कान लागले होते. ते म्हणाले, ''वाळव्याचं पावणं चांगलं हायत. पोरगा चांगला हाय. जोड चांगली जमती. पावणं रविवारी मुलगी बघायला येणार हायत. त्यास्नी आपली आक्का पसंत पडली तर सुपारी फोडायला हरकत नाही. देणं-घेणं ठरवू. आपणाला आता तयारीत रहावं लागल. तुम्ही जरा घरचा पसारा आवरून ठेवा. सडा-सारवण करून घर शोभिवंत करा. आपल्या आक्काचं सोनं हुणार असं दिसतंय. मनाजोगतं स्थळ चालून आलंय.'' या बोलण्याने सगळी मंडळी हरकली. पोरीचे तोंड गोड करावे म्हणून तानुबाईने सगळ्यास्नी गूळ-शेंगा खायला दिल्या.

इकडे गणपतराव नायकवडी वाळवेकरांनी मिरजवाडीला जायची तयारी सुरू केली. दोन बैलगाड्या करून जायचे ठरले. एका गाडीत बायका आणि एका गाडीत पुरुषमंडळी बसली. सकाळी लवकरच गाड्या हालल्या. बैलं दुडक्या चालीने निघाली. दोन तासात गाड्या मिरजवाडीला पाहुण्याच्या दारात हजर झाल्या. सारी मंडळी गाडीतून पायउतार झाली. पोरांनी पटापटा पाहुण्यांच्या हातात पाण्याचे तांबे दिले. पुरुषमंडळी बैठकीवर येऊन बसली. बायका माजघरात जाऊन बसल्या. रितरिवाजाप्रमाणे पाहुण्यांना कांदेपोहे, चहापान झाले. मग मुलीला बाहेर आणली. मुलगी सगळ्यांना पसंत पडली. ओटीत केळाची फणी ठेऊन पोरीला आत पाठवले. जुनी-जाणती माणसे पाहुण्यांचे नातेसंबंध कुठे-कसे आहेत, याची बारीक चर्चा सुरू झाली. पदर जुळतोय म्हटल्यावर लग्नाच्या वाटाघाटी सुरू झाल्या. ऐपतीप्रमाणे मान-पान करायचा. पोरीला एखादा दागिना करायचा अशी बोलाचाली झाली. जाणकार माणसाला याद्या लिहायला बसवले.



याद्या झाल्या. या आनंदापोटी संभाजीरावांनी सगळ्यांना गूळ-भाताचं जेवण दिले. वाळवेकरांनी लग्न स्वत:च्या दारात घेतले.

दोन्हीकडची मंडळी समजूतदार होती. त्या काळात पाच-पाच दिवस लग्नसमारंभ चालायचा. मात्र नव्या-जुन्या विचाराची सांगड घालून लग्न एका दिवसात उरकायचे ठरले. लगेचच आष्ट्यात मुला-मुलीचा लग्नाचा बस्ता बांधला. लग्नाची तारीख पक्की झाली.

लग्न चार दिवसांवर आले. संभाजीरावांची धावपळ उडाली होती. त्याकाळी आतासारखी वाहनाची सोय नव्हती. जास्तीत जास्त बैलगाडीचा वापर होता. मित्रमंडळीतल्या व भावकीतल्या बैलगाड्या सांगितल्या. त्यांच्या वैरण-पाण्याची व्यवस्था अगोदरच करून ठेवली. गाडीवांनानी बैलगाड्यांना तट्टे मारून आणि रंगीबेरंगी कापडांचे छत बांधून आपापल्या गाड्या सजवल्या. दहा-अकरा गाड्यात पोर-बायका माणसे, म्हातारी-कोतारी बसली. नवरीची गाडी चांगली सजवली. तिच्यासोबत करवल्या आणि लहान पोरं बसली. त्या गाडीच्या बैलांना झुला घातल्या. रंगीत कासरे जोडले. बैलांची शिंगे रंगवली. गाडीवानाने फेटा बांधला आणि गाडी सगळ्यांच्या पुढे काढली. सगळ्यांनी ठेवणीतली कापडे घातली होती. गाड्या दुडक्या चालीने वाळव्याच्या दिशेने निघाल्या. शिवेजवळ सगळ्या गाड्या थांबल्या. नारळ वाढवून बैलगाड्यांचे पूजन केले. दोन्ही दिशेला दही-भाताचा मुटका टाकला. पुन्हा गाडीवान आपल्या गाड्या वाळव्याच्या दिशेने दामटू लागले.

दीड-दोन तासात गाड्या वाळव्यात पोहोचल्या. लगीनघराच्या जवळच मारुती मंदिर होते, तिथे येऊन बैलगाड्या थांबल्या. वराकडील मंडळी सामोरी आली. दोन्हीकडील पाहुण्यांच्या भेटी-गाठीचा कार्यक्रम झाला. ढोल-ताशांच्या वाजपात व्हराड मंडळी जानवस घराजवळ येऊन थांबले. पोरांनी सामानसुमान उतरून ठेवले. व्हराडाचे चहापाणी चालले होते. तोवरच निरोप आला. 'नवरीला लवकर घेऊन या. नवरा-नवरीला हळद लावायच्या आहेत.' तोवर दुसरे कोणी म्हणाले, 'अजून घुगुळाचा पत्ता नाही. नवरदेव गावदेव करायला गेलाय. तो परत यायचा आहे. तोवरच सारी घाई करतायत.' अशी चर्चा चालली होती. त्याचवेळी एकजण म्हणाला, 'अहो, पाच दिवसाचे लग्न एका दिवसात उरकायचे म्हणजे अशी तारांबळ उडणारच.'

ऊन मी म्हणत होते. निम्मी अर्धी माणसे मांडवात तर अर्धी झाडाखाली सावलीला थांबली होती. इतक्यात नवरदेव आला. मग नवरा-नवरीला हळद लावली. कळसात पाणी घातले. दोन्हीकडच्या पाहुण्यांना आहेर व मानपान यांची देवाणघेवाण झाली. काही लग्नविधी करून घेतले आणि शेवटी नवरा-नवरींना समोरासमोर उभे केले. मध्ये अंतरपाट धरला. सर्वांच्या साक्षीने मंगलाष्टका म्हटल्या. वधु-वरांवर अक्षता टाकल्या. लग्न लागले. नवरा-नवरी बावल्यावर जाऊन बसले. मांडवात पाहुण्यांच्या जेवणाच्या पंगती पडल्या.

वऱ्हाडाला माघारी जायला वेळ नको म्हणून पहिल्यांदा त्यांना वाढून घेतले. मग गावकऱ्यांच्या पंगती बसल्या. जेवलेली मंडळी नवरा-नवरीस आशीर्वाद देत होती. आहेर दिला-घेतला जात होता. मानपान चालू होता. मंडपात पंगतीवर पंगती उठत होत्या. जाणती माणसे वऱ्हाड परत न्यायला घाई करत होती. काही हौशी मंडळी वरातीसाठी थांबणार होते.

नवी जोडी प्रथम देवादिकांच्या पाया पडली. मग सासू-सासरे, दीर-भावजा, चुलता-मालता, नणंदा-जावा अशा साऱ्या वडीलधाऱ्यांच्या पाया पडली. तानुबाईने लक्ष्मीला कुशीत घेतले. तिच्या डोक्यावरून हात फिरवत डबडबत्या डोळ्याने त्या म्हणाल्या, ''लक्ष्मी, आता सासू-सासरे हेच तुझे आई-वडील. त्यांना चांगले सांभाळ. तुझ्यावर मुलीसारखे त्यांनी प्रेम करावे असे वाग. दीर-जावा, नणंदा, नवरा सगळ्यांना माया लाव. गोठ्यातली जनावरंसुद्धा तुझ्याकडं बघून हंबरू देत, असं प्रेम कर. सगळ्यांची आवड-निवड जप. मर्जी सांभाळ. सुखानं संसार कर. आनंदात रहा, आई-वडिलांचं नाव काढ.''

लक्ष्मीचा कंठ दाटून आला. तिला बोलायला शब्द फुटेना. आईच्या गळ्यात पडून ती नुसतेच हुंदके देऊ लागली. तिने वडिलांकडे पाहिले. त्यांचेही डोळे पाण्याने डबडबले होते. त्यांची लाडकी आक्का आता परक्याची झाली होती. ज्याचे धन त्याला दिले, असा विचार करून ते माघारी वळले. वऱ्हाडाच्या गाडीत जाऊन बसले. गाड्या मार्गाला लागल्या. गाडीतली माणसे वळून वळून मागे पहात होती. भरल्या डोळ्यांनी पाहणाऱ्या लक्ष्मीला आपले आप्त दूर दूर जात आहेत, असा भास होत होता. तिच्या जीवनातील एक नवे पर्व सुरू झाले होते.

■■■



प्रकरण चार

## संसाराची वाटचाल व मुलांची जडणघडण

क्रांतिमाता लक्ष्मीबाईचे जीवन कसे घडले, कशा अडी-अडचणींना तोंड देत त्यांनी वाटचाल केली, हे त्यांनाच माहीत. त्यांच्या जीवनाचा पूर्वेतिहास मी थोडाफार जवळून पाहिला आणि थोडाफार त्यांच्याच तोंडून ऐकला. कधी नागनाथअण्णांनी आपल्या बालपणीच्या आठवणी सांगितल्या. क्रांतिमातांच्या बोलण्यातून त्यांचा जीवनपट माझ्यासमोर बऱ्याचदा उलगडला आहे.

एप्रिल महिना होता. परीक्षा नुकत्याच संपल्या होत्या. शिक्षक मंडळी पेपर तपासत स्टाफरूममध्ये बसले होते. मी (जयवंत अहिर), वसंत पवार, दत्ता दादा शेळके, चंदर लोहार आणि कोंडूसकर सर, हुतात्मा किसन अहिर यांच्या पुतळ्यासमोर अशोकाच्या गर्द झाडांच्या सावलीत असेच गप्पा मारत बसलो होतो. एवढ्यात शाळेचा शिपाई ज्ञानू पेशवा क्रांतिवीर नागनाथअण्णांच्या घरून क्रांतिसिंह नाना पाटलांचे जेवणाचे ताट घेऊन आला. त्याच्या पाठोपाठ क्रांतिमाता लक्ष्मीबाई येताना दिसल्या. आम्ही त्यांना आई म्हणायचो. ऊन मी म्हणत होते. आई पायात चप्पल घालत नव्हत्या. त्यांचे कर्मवीर भाऊराव पाटलांसारखे साऱ्यांच्या पायात चप्पल बघायचे स्वप्न होते. तशा ऊनाची पर्वा न करता त्या नाना पाटलांच्या खोलीत गेल्या. ज्या ज्यावेळी नाना पाटील वाळव्यात असायचे त्या त्या वेळी त्यांना समोर बसवून पोटभर जेवायला वाढायचे असा त्यांचा नित्य नेम होता. क्रांतिसिंह नाना पाटील आठ महिने वाळव्यात आणि चार

महिने पंढरपूरात रामबागेत पुरुषोत्तम रंगाचार्य महाराजांकडे मुक्कामाला रहात होते. आज अरुण भैय्याही आईंच्याबरोबर आला होता. तो आईंबरोबर नाना पाटलांच्या खोलीत न जाता आमच्याकडे आला आणि गप्पात सामील झाला.

आदल्या रात्री नागनाथअण्णांनी उशिरपर्यंत कार्यकर्त्यांची मीटिंग घेतली होती. त्यामुळे ते विश्रांती घेत होते. त्यांनी १९४२ च्या चळवळीत घर सोडले ते पुन्हा कधीही घरी गेले नाहीत. त्यामुळे वाळव्यात असताना त्यांचा मुक्काम हुतात्मा किसन अहिर विद्यालयात असायचा. पुढे तो साखरशाळेमध्ये होऊ लागला. आईने आम्हाला बागेत बसलेले पाहिले. शिवाय अरुण भैय्याही आमच्याजवळ बसलेला. त्यामुळे आई घराकडे जाण्याअगोदर आमच्याकडे येणार याची आम्हाला खात्री होती. त्याचवेळी आम्ही मनात ठरवले, आईंना त्यांचा पूर्व इतिहास सांगण्याचा आग्रह करायचा.

नाना पाटलांचे जेवण झाल्यावर ज्ञानू पेशवे खरकटी भांडी घेऊन घराकडे गेला. आणि आई आमच्याजवळ आल्या. बसता बसता त्या कोंडूसकर सरांना म्हणाल्या, ''आरं ए मास्तरा.... जरा शाळेतलं पेलाभर पाणी आण की....'' ते उठले आणि पाणी आणावयास गेले. मी आईला म्हणालो, ''परवा तुम्ही वाळव्यात तुमची नायकवडी घराण्याशी सोयरिक कशी झाली ते सांगितले. आता त्याच्या पुढचा इतिहास ऐकायची आम्हाला उत्सुकता लागली आहे. तुमच्या संसाराची गोष्ट आम्हाला सांगा.'' तेवढ्यात कोंडुसकर सरांनी पाणी आणले. आईंनी चूळ भरली. ओला हात तोंडावरून फिरवला. दोन घोट पाणी प्यायल्या. पदराने तोंड पुसल्या आणि आपली जीवनकथा सांगू लागल्या.

''पोरांनु, लग्न झालं. नव्या नवरीचं नवेपण कधी संपलं आणि मी माझ्या संसारात कधी रमून गेले हे माझं मलाच कळलं नाही. कलकत्ता सोडलं तवा अजून लहान होते. पण एक जाणवत होतं की हे गोरे इंग्रज आपल्या शेतकऱ्यांना, बायाबापड्यांना त्रास देतात. मला चीड यायची, पण मी काही करू शकत नव्हते. असं वाटायचं आपण, आपल्या भावानं किंवा भावी नवरा-पोरानं या इंग्रजांना धडा शिकवावा. आमचं कुटुंब शेतकरी. घरात सगळेच अंगठेबहाद्दर. माझे थोरले दीर दत्तक गेले होते. तरी आम्ही सारे एकत्रच राहात होतो. भाऊ भाऊ एका विचाराचे होते. ते वडिलांना खूप मान देत असत. माझी जाऊबाई प्रेमळ स्वभावाची होती. ती माझ्याशी बहिणीसारखं वागायची. दिसा-मासाने



प्रपंचाचा गाडा पुढं चालला होता. कधी पाऊसकाळ चांगला पडायचा, तर कधी कमी पडायचा. एखादं साल कोरडं जायचं. त्या काळात वाळव्यातली सगळी जमीन कोरडवाहू. एखादं साल चांगलं पिकायचं. एखाद्या वर्षी टोळधाड पडली तर काही विचारू नका, अशी परिस्थिती व्हायची. लग्नानंतरची पाच-सहा वर्षे काळाप्रमाणे आमचे रहाटगाडगं चाललं होतं.''

थोडं थांबून क्रांतिमाता पुढे सांगू लागल्या. ''चौदा-पंधरा वर्षांची होते लग्न झालं तवा. पुढं तीन-चार वर्षात दोन पोरं झाली, पण ती जगली नाहीत. किरकोळ आजारपणात ती मला सोडून गेली. मला लई वाईट वाटायचं. आपल्याला मूल का लाभत नाही, असं वाटायचं. त्यावेळी सासरच्या माणसांनी, आई-वडिलांनी, मालकांनी मला चांगला धीर दिला. दुःखातून सावरायला मदत केली. पुना मला दिवस गेले. मी देवाला साकडं घालायची देवा माझी कूस उजळू दे. मला पोर लाभू दे. एकदा रानात जाताना फणा काढलेला नाग आडवा आला. मी त्याला हात जोडलं. तो आपल्या वाटेनं सळसळ करत निघून गेला. मी मनात म्हटलं, या नागोबानं आपल्याला आशीर्वाद द्यायला दर्शन दिलं असेल. योगायोगानं माझ्या पोटी मुलगा जन्मला (१५ जुलै, १९२२). मी त्याचे नाव नागनाथ ठेवलं. सासरे, दीर, मालक सगळ्यास्नी लई आनंद झाला. बारसं धुमधडाक्यात घातलं. आयाबहिर्णीनी त्याला पाळण्यात घातलं. मी मनात म्हटलं, माझं बाळ मोठं व्हावं, त्यानं घराण्याचं नाव चहूमुलखात गाजवावं. पुढं तुमा साऱ्यास्नी माहीत हाय, हाच नागनाथ इंग्रजांच्या काळजात धडकी भरवणारा क्रांतिवीर झाला. नागनाथ हळूहळू मोठा झाला. त्याला अनेक सवंगडी मिळालं. साऱ्यास्नी मी आईची माया दिली. किसन पैलवान, जी. डी. बापू, खंडू शेळके, नारायण पेशवे, काका घोरपडे, अंता पाटील, तुकाराम नाना खोत, राजूताई पाटील, बाळकू बिरनाळे ही सगळी पुढं नागनाथाची मैतर झाली आणि मी साऱ्यांची आई झाली. त्यांना जेवू-खाऊ घातलं, त्यांना पोलिसांपासून वाचवलं, त्यांची हत्यारं सांभाळली. लई आठवणी हायत. त्या सगळ्या काय आता सांगत नाही.''

मी म्हणालो, ''आईसाहेब, उभा महाराष्ट्र तुम्हाला क्रांतिमाता म्हणून ओळखतो, ते उगीच नव्हे. तुम्ही सांगताय त्या आठवणी म्हणजे महाराष्ट्राचा इतिहास आहे.'' माझ्या शब्दांनी आईंच्या चेहऱ्यावर समाधानाचे हसू पसरले.

आमच्याकडे कौतुकाने बघत त्यांनी आपली कथा पुढे सुरू केली.

''१९२४ सालात मला चौथा मुलगा झाला. त्याचं नाव आम्ही शामराव ठेवलं. तो शांत स्वभावाचा, हळव्या मनाचा होता. नागनाथ थोरला म्हणून त्याला अण्णा म्हणायला सुरू केलं, तर अण्णा तापट, स्वभावाचा हेकेखोर, अन्यायाविरुद्ध पेटून उठणारा. पोरांच्यात त्यो पुढारपण करायचा. सगळ्या कामात अण्णा पुढं, मागं सारी वानरसेना. बुद्धीनं चलाख, हत्तीचं बळ घेऊन वावरायचा माझा अण्णा. घरची परिस्थिती खाऊन, पिऊन चांगली होती. पण हातात रोकडा पैसा नसायचा. धडुतं कपडा घ्यायचा असो का चावडी चवत्रा भरायचा असो गाडीभर धान्य विकायला लागायचं. दोन्ही मुलं हळूहळू मोठी होत होती. एकदा मालकांनी दोन्ही पोरास्नी जवळ बोलावलं आणि ते म्हणाले, ''पोरांनो, आता तुमी मोठं झालासा. तुमचं वय शाळंला जाण्याचं झालंय. खरं दोघास्नी शिकवायची माझी ऐपत नाही. तवा असं करा एक कोणतरी शाळंला जावा आणि एकानं शेतीत लक्ष घाला. बोला कोण काय करतंय?''

धाकट्या शामरावला रानामाळात हिंडायला आवडायचं. बैलगाडीत बसून हातात कासरा धरावा, औत चालू असला तर औतावर उभं रहावं, जनावरांना हाल्याहुल्या करावं, याची त्याला आवड. तो म्हणाला, ''बापू, मी तुमच्याबरोबर रानात येणार. मला नाय साळंत जायचं.''

तर थोरला नागनाथ म्हणाला, ''बापू, मी शाळेला जाणार.''

मालक म्हणाले, ''ठीक हाय. नागनाथ, तू जातो म्हणतोस तर जा. खरं लक्षात ठेव, जास्त शिकून आपल्याला दुसऱ्याची चाकरी करायची नाय. चावडी चवत्रा भरण्यापुरतं, हिसाब-किताब ठेवण्यापुरतं शीक. बाकी कुस्ती खेळ. अंगात रग कमव.''

बापलेकांचं बोलणं मी बारकाईनं ऐकत होते. मी मालकांना म्हटलं, ''नागनाथला, लय शिकवायचं माझ्या मनात हाय. त्याला लय मोठा करायचं हाय. तवा मी त्याची शाळा मधीच बंद करू द्यायची नाय.'' यावर मालक फक्त हसले, काय बोलले नाहीत.

पुढे क्रांतिमाता नागनाथअण्णांच्या शिक्षणाविषयी सांगू लागल्या. ''नागनाथ रोज शाळेला जायला लागला. वाळव्यात सहावीपर्यंतची शाळा होती. नागनाथनं सहावी पास केलं. मग त्याला सातवीला त्याच्या आत्याकडं आष्ट्याला ठेवला. सातवी पास झाल्यावर पुन्हा पुढच्या शिक्षणाला कोल्हापूरला धाडला. वाळव्यात असताना मालकांनी कधी त्याला एका शब्दानं शाळेत गेला का नाय गेला, विचारलं नाही. पण रोज न चुकता दूध पिला का? म्हणून विचारयचे. दूध पिलाय म्हटलं तर ठीक आणि न पिता झोपलाय म्हटलं तर झोपेतून जागं करून गोड बोलून दूध प्यायला लावायचे. गोड बोलून ऐकेना झाला तर थोबाडीत द्यायचे, पण दूध प्याल्याशिवाय झोपू द्यायचे नाहीत. त्यानं दूध पिलंच पाहिजे यावर त्यांचा भर असायचा.

नागनाथ कोल्हापूरला जाऊन चार वर्ष होत आली. तो राजाराम हायस्कूलच्या अकरावीच्या वर्गात शिक्षण घेत होता. तो काळ १९४२ च्या चळवळीचा होता. वयाच्या आठव्या वर्षापासूनच नागनाथनं क्रांतिसिंहांकडून स्वातंत्र्याचं बाळकडू घेतलं होतं. कोल्हापूरहून कधी सुट्टीला वाळव्याला आला तर सतत इंग्रजांच्या विरुद्ध बोलायचा. ही जुलमी सत्ता झुगारून दिली पाहिजे, म्हणायचा. तरुण पोरं गोळा करून त्यांना काहीबाही सांगायचा. म. गांधी, नाना पाटील, साने गुरुजी, भगतसिंग, राजगुरू, सुखदेव यांची नावं सतत तोंडात असायची. तवाच मी ओळखलं याच्या मनात देशाच्या स्वातंत्र्याचे विचार घोळत आहेत. हा आता शिक्षण पूर्ण करणार का नाना पाटलांच्या चळवळीत पडणार याचा काही थांगपत्ता लागत नव्हता. मी विचार केला, जे होतय ते बऱ्यासाठीच होतय. लहानपणी मला इंग्रजाची जी चीड यायची ते आता पोराच्या रक्तात उतरलंय. ही गोरी माकडं एकदाची घालवलीच पाहिजेत.''

■ ■ ■

प्रकरण पाच

# क्रांतिकार्यासाठी दिला पुत्र

''दिवस घाईगडबडीत चालले होते. आम्ही रानात राबत होतो, गुरा-ढोरात झट्याझोंबी देत होतो, तर तिकडं नागनाथ शाळेच्या एक एक इयत्ता पार करत होता. तो तसा अभ्यासात हुशार होता. राजाराम हायस्कूलसारख्या नावाजलेल्या शाळेत वर्गात पहिला नंबर काढून त्यानं पाच रुपयाची स्कॉलरशीप मिळवली, अशी बातमी कानावर होती. जुनी ११ वी म्हणजे मॅट्रिक ही महत्त्वाची परीक्षा होती. इकडं शाळेतलं महत्त्वाचं वर्ष सुरू झालं. आन् तिकडं चलेजावचं आंदोलन पेटलं. त्या दिवसातली एक आठवण मला आजही डोळ्यासमोर आहे.'' क्रांतिमाता सांगत होत्या.

''दिस मावळून गेला होता. सोप्यात अडकवून ठेवलेला कंदील वाऱ्यानं हेलकावत होता. त्या अंधुक उजेडात मालक पान खात माचावर बसले होते. मी आणि जाऊबाईंनी म्हसरांच्या धारा पिळल्या. जाऊबाई दुधाची कासंडी घेऊन घरात गेल्या. मी तिथंच कायतरी काम करत होते. धाकटा शामराव, त्याला आम्ही आप्पा म्हणायचो, तो गुरांना चारापाणी करत होता. एवढ्यात अण्णा ट्रंक आणि वळकटी घेऊन आलेला मला दिसला. मी चटकन उठून त्याची ट्रंक आणि वळकटी माझ्याकडं घेतली. हातपाय धुवायला सांगितलं. ह्यांनी बसल्या जाग्यावरूनच विचारलं, ''आरं नागनाथ, अचानक कसा काय आलास? शाळंला सुट्टी लागली काय?'' पायावर पाणी घेता घेता अण्णा म्हणाला, ''तसं काय न्हायी बापू. सहजच आलोय.''



रात्रीची जेवणं उरकली. आम्ही बाहेर अंगणात भांडी घासत बसलो होतो. तिथंच माचावर बाप-लेकांचं बोलणं चाललं होतं. अण्णा वडलांना सांगू लागला, ''बापू, मी परवा ७-८ ऑगस्टच्या काँग्रेस अधिवेशनाला मुंबईला गेलो होतो. त्या अधिवेशनासाठी देशातली सगळी मोठ-मोठी पुढारी मंडळी आली होती. लई मोठं अधिवेशन झालं. ही माणसं इंग्रजांच्या विरुद्ध संघर्षाची भूमिका मांडत होती. अशी जोरदार भाषणं झाली म्हणता....'' अण्णा सगळ्या गोष्टी मनापासून सांगत होता. पंडित नेहरू, म. गांधी, वल्लभभाई पटेल अशा मोठमोठ्या नेत्यांचे विचार जसेच्या तसे सांगत होता. आम्ही सगळे कान टवकारून ऐकत होतो. देशातल्या एवढ्या मोठ्या पुढाऱ्यांना आपल्या अण्णानं स्वत:च्या नजरेनं बघितलं, त्यांचं भाषण ऐकलं याचं आक्रीत वाटत होतं.

अण्णा पुढं सांगत होता, ''बापू, इंग्रज सरकारनं पं. नेहरू, वल्लभभाई पटेल वगैरे साऱ्या काँग्रेस कमिटीला पकडलंय. त्यांना कुठं ठेवलंय याचा पत्ता नाही. सारा देश पेटून उठलाय. गांधीजींना पकडून आगाखान पॅलेसमध्ये ठेवलंय. अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी म. गांधींनी साऱ्या देशाला 'करा किंवा मरा' असा आदेश दिलाय. तवा बापू आमच्यासारख्या तरुणांनी गप्प बसून राहता कामा नये, असं आम्ही ठरवलंय. म्हणून मी ठरवलंय देश स्वतंत्र झाल्याशिवाय शाळंत जायचं नाही. आणि जीवनातली महत्त्वाची बाब म्हणजे लग्न ते सुद्धा करायचं नाही. असं ठरवूनच मी कोल्हापूरहून माझा सारा बाडबिस्तारा घेऊन आलोय. मी इथून पुढं देशाच्या स्वातंत्र्य चळवळीत भाग घेणार हे तुमच्या कानावर घालायला घरी आलोय.''

इतका वेळ शांतपणे ऐकून घेणारे हे एकदम चिडले. नागनाथ त्यांच्या पुढं आलकट-पालकट घालून बसला होता. ह्यांनी शेजारी पडलेला जोडा उचलला आणि नागनाथच्या मांडीवर फडाफडा चार-पाच तडाखे हाणले. आणि वर आवेशाने म्हणाले, ''ह्या तुझ्या आईला आणि मला गोळ्या आधी घाल. मग तुला काय करायची ती चळवळ कर.''

कितीतरी दिवसानं घराकडं आलेल्या पोराला ह्यांनी जोड्यानं मारावं हे मला रुचलं नाही. मी आत निगून गेले. पाठोपाठ नागनाथ आला आणि मला म्हणाला, ''आई, हे बापूंचं वागणं माझ्या प्रेमापोटी आहे. चळवळीच्या बऱ्यावाईट

गोष्टी त्यांच्या कानावर गेल्या असतील म्हणून ते घाबरलेत. त्यांना वाटत आसंल, आपल्या डोळ्यादेखत माझ्या पोरांचं बरं वाईट व्हायला नको. तू त्यांचं वागणं कायबी मनाला लावून घेऊ नकोस.''

दुसऱ्या दिवशी सकाळी उठल्यावर नागनाथनं नेहमीप्रमाणं आंघोळ केली. घरात पाणी भरलं. आपल्या वडलांबरोबर गप्पा मारत न्याहरी केली. माझ्याबरोबर कोल्हापुरातल्या सुखदु:खाच्या दोन गोष्टी बोलला. जेणेकरून रात्रीचा घडला प्रकार मी विसरलो आहे, असं त्यानं आम्हा दोघांना दाखवलं. चार-एक दिवस वाळव्यात राहिला. कोल्हापूरला जाताना आम्हा दोघांना शिक्षणाला जातो म्हणून सांगून नमस्कार केला. परंतु त्यानं मनात वेगळंच योजलं होता. कोल्हापूरात गेल्यावर आपली ट्रंक आणि वळकटी खोलीतल्या मुलाकडं सोपवली आणि जीवाची पर्वा न करता स्वातंत्र्याच्या चळवळीत उडी घेतली. ही गोष्ट आम्हाला समजायला तीन-चार महिनं गेलं.

तसं बघायला गेलं तर आम्हाला लवकरच कळलं. कारण आम्ही त्याच्यावर एक जबाबदारी सोपवली होती. जोतीबा हा आमचा कुलस्वामी. दर पौर्णिमेला जोतिबाला निवद-नारळ द्यायला आमच्या घरचं कुणीतरी जायचं. नागनात कोल्हापुरात शिकायला गेला, तवा त्याच्या वडिलांनी त्याला सांगितलं, ''नागनाथ, तू कोल्हापुरात हाईस तवर एक करायचं. आम्ही वाळव्यातनं जोतिबाला जाणाऱ्या माणसाकडनं शिदा, निवद, नारळ आपल्या गोविंद गुरवाकडं पाठवतो. तू तेवढा निवद-नारळ जोतिबाला देऊन त्याचा प्रसाद येणाऱ्या माणसाकडनं वाळव्याला पाठवायचं आणि तू कोल्हापुरला जायचं.''

नागनाथ हा नितनेम पाळत होता. खरं आता कोल्हापुरला गेल्यापास्नं त्याचा हा नितनेम तुटला. आम्ही वाळव्याहून जोतिबाला जाणाऱ्या माणसाला विचारायचो, आमचा नागनाथ भेटला का? तो कसा आहे?'' तेव्हा जोतिबाहून परतणारी माणसं सांगायची, ''नागनाथ आलाच नाही. तुमचा निवद-पाणी आम्हीच देवाला दाखवला.'' पहिले एक-दोन महिने हे उत्तर ऐकून वाटले काय तरी कामात-व्यापात आसल. जमलं नसल जायला. तिसऱ्या-चौथ्या महिन्यातही नागनाथ जोतिबाला गेला नाही, हे कळल्यावर आम्ही हवालदिल झालो. नागनाथची माहिती ऐकण्यासाठी त्याचे वडील कासावीस व्हायचे. परंतु नागनाथ कुठे आहे आन् काय करतो याचा थांगपत्ता लागेना. शेवटी हे स्वत: गेले.



नागनाथच्या मित्रांकडे चौकशी केली, तेव्हा कळले नागनाथ क्रांतिसिंह नाना पाटलांच्या बरोबरीने स्वातंत्र्य चळवळीत काम करतो. हे ऐकताच हृदय भरून आलं. एकाचवेळी जीव अभिमानानं फुलायचा आणि नागनाथच्या चिंतेने जीव तीळ तीळ तुटायचा.

एक दिवस ह्यांनी शेजारच्या गोविंद सव्वाशाला नागनाथाला हुडकायला पाठवला. त्याच्याजवळ निरोप दिला, ''नागनाथ, तुला जी काय चळवळ करायची ती कर. माझा तुला पाठिंबा हाय. पर ती वाळव्यात येऊन कर.'' दोन दिवसानं झांजड पडता पडता नागनाथला घेऊन गोविंद घरात दाखल झाला. नागनाथाला बघून आमच्या डोळ्यात पाणी आलं. कुणीच काही बोललं नाही. हळूहळू नागनाथनं वाळव्यात राहून आपलं गणगोत जमवायला सुरुवात केली. नाना पाटलांचा कुंडल ग्रुप कसा हाय ते त्याला समदं माहीत होतं. तसंच त्यानं वाळव्यात सवंगडी जमवायला सुरुवात केली. त्यात काही बुर्जूग माणसंही होती. या कामात नागनाथ वडिलांचा सल्ला घेत होता. कोण कसा हाय, कोण कसा हाय याची पारख ह्यांना होती. अधूनमधून हे नागनाथला सावध करायचे. अहिर गल्लीतले नावाजलेले पैलवान किसन अहिर, खंडू शेळके, रामचंद्र अहिर, नारायण कदम (पेशवे), त्याशिवाय कोटावरचे शंकरराव परुळेकर (इनामदार), सखारामकाका घोरपडे, किसन देसाई, अण्णा पाटील, धाकटे अण्णा, थोरले अण्णा, कुबेर नवले, पांडू खंडागळे, पांडू देव, पडवळवाडीचे तुकाराम नाना खोत, महादेव अनुसे (देवास), मारुती बाड, कृष्णा रामा करमाळकर, हरी गणू कदम (भाऊ), यशवंत करमाळकर, तुकाराम साधू कुंभार (शाम), ढगेवाडीचे अन्ता पाटील, बाळू काईगडे, बाळकू दलाल, शिराळचे पांडू गायकवाड, वाय. सी. पाटील, अंकलखोपचे बाळकू बिरनाळे, जक्राईवाडीचे गंगाराम गायकवाड, नामदेव गायकवाड, लाडेगावचे देसाई (कॅप्टन), दत्तू पाटील, घोडेवाला विठू पाटील, लाडेगावचे शंकर सावळा नाईक, आरळ्याचे माधवराव गायकवाड, ऐतवडेच्या राजूताई पाटील, बच्चू पोरवाल अशी अनेक मंडळी वाळव्यात जमू लागली.

कुंडल ग्रुप आणि जी. डी. (बापू) लाड हे तर नागनाथचे जीवलग दोस्त. वाळवा तालुका, शिराळा पेठा, पलूस, येळावी, तासगाव, सांगली अगदी कर्नाटकात चिक्कोडी तालुक्यातही त्याची मित्रमंडळी पसरलेली. सांगलीचे

वसंतदादा पाटील, नामदेवराव कराडकर, चिक्कोडी तालुक्यातील व्याकूडचे व्ही. एल. पाटील अशी अनेक सवंगडी वाळव्यात नागनाथला भेटायला यायची. सगळ्यांची नावंसुद्धा आठवत नाहीत इतकी माणसं गोळा व्हायची. सगळ्यांनी मनापासून ही देशाच्या स्वातंत्र्याची लढाई सुरू केली होती. त्यातून होणाऱ्या त्रासाला तोंड देण्याची तयारी आम्हीपण केली होती. तरी या पोरांच्या कारनाम्याची झळ आम्हाला बसल्याशिवाय रहायची नाही. या पोरांच्या आगळिकी वाढू लागल्या. तसं सरकारनं या पोरांना अटक वारंट काढलं. पोरं सापडत नाहीत म्हटल्यावर त्यांना पकडून देणाऱ्यांना बक्षीस देण्याचं जाहीर केलं. नागनाथला पकडण्यासाठी पहिल्यांदा ५०० रुपयाचं बक्षीस जाहीर केलं. पुढे तो सापडेना म्हटल्यावर बक्षिसाची रक्कम वाढवत नेली सरकारनं.

१९४२ च्या दरम्यानची एक आठवण हाय. अण्णावर पोलिसांचं पकड वारंट होतं. तरी बी एका रात्री तो मला भेटायला आला. अण्णा असा भेटायला आला की, आम्ही घराबाहेरच्या चिंचंच्या खाली नाहीतर रानाजवळच्या एखाद्या झाडाखाली बसायचो. चुकून दगाफटका झाला, नागनाथला रानातून पसार होता यावं. दुधावानी चांदणं पडलं होतं. अण्णा आला. तासघटका भेटला. पोटभर जेवला आणि आपल्या वाटंनं निघून गेला. जाताना त्यानं चार बंदुका ठेवायला दिल्या. त्या समोरच पडल्या होत्या. सगळीकडं पांढराधोट उजेड असला तरी मी चिंचंखाली असल्यानं अंधारातच हुते. येवढ्यात लांबवर कुत्री भुकत्याला आवाज आला. मी सावध झाले. कुत्री एकमेकान्ला कशी भुकत्यात, दुसऱ्या जनावरांना कशी भुकत्यात आणि माणसान्ला कशी भुकत्यात ते मला पक्कं कळतं. मला शंका आली तशा त्या बंदुका उचलल्या आणि शेणकुटाच्या हुडव्यात नेऊन लपवल्या. लगबगीनं घरात जायला निघाले तर झाडाच्या शेंड्यावर बॅटरीचा उजेड पडल्याला दिसाय लागला. मी आत गेले. मागच्या पुढच्या दाराला कडी लावून कानोसा घेत राहिले.

थोडा वेळ गेला. पोलिसांच्या पायातील बुटांचा आवाज यायला लागला. तेवढ्यात दारावर बुटाची लाथ बसली. मी लगेच आवाज दिला, ''कोण हाय?'' बाहेरून आवाज आला, ''दार उघडा. आम्ही पोलीस आहोत.'' खरं तर त्या काळात पोलीस म्हटलं की, भल्याभल्यांच्या काळजात धडकी भरायची. मात्र तसं मला पोलिसांची भीती वाटत नव्हती. मी बंदूका घेऊन आलेल्या पोलिसांना म्हणायची, ''आरं, या फुकण्या घेऊन कशाला आलायसा. अशा लई फुकण्या मी बघितल्यात.'' फौजदारानं बुटाची दुसरी लाथ दारावर हाणली. तशी मी आतून ओरडले, ''तुम्ही का आलायसा ते म्हायती हाय मला. माजा मुलगा कोल्हापूरला शिकायला गेलाय. मालक आणि धाकटा मुलगा रानात वस्तीवर हायत. आम्ही जावा-जावा दोघीच घरात हाय. रात्री-अपरात्री दार उघडलं जाणार न्हाय. पाहिजे तर घराला चारी बाजूनं गराडा घाला. सकाळी माझ्या घराची झडती घ्या. मुलगा सापडला तर खुशाल घेऊन जा. खरं दार मोडून आत आला तर त्याचं परिणाम चांगलं होणार नाहीत. सांगून ठेवतो.'' मग मात्र पोलीस दारावर लाथ मारायचे थांबले. दिवस उगवायची वाट बघत थांबायचं त्यांनी ठरवलं. माझा नागनाथ एवढ्या वेळात लांब कुठंतरी पोचल या विचारानं माझं मन हलकं झालं. मी गाढ झोपले.

कोंबड्यानं बांग दिली तशी मी जागी झाले. अंथरूनात बसूनच बाहेरचा अदमास घेत होते. गोठ्यातल्या जनावरांची चाहूल लागत होती. एखादी बैलगाडी गावाबाहेर जात असताना बैलांच्या गळ्यातील घुंगरांचा आवाज येत होता. शेजारच्या घरात जातं फिरवल्याचा आवाज येत होता. मी जावेला उठविलं. दोघी ओव्या म्हणत जातं फिरवाय लागलो. तांबडं फुटलं. आया-बाया अंगण झाडायला लागल्या, शेणघाण काढायला लागल्या. मी उठले. दार उघडून बाहेर आले. पोलीस पेंगत हुते ते खाडकन उभे राहिले. त्याच्याबरोबर एक शब्दबी न बोलता मी बाहेर आले. अंगण झाडलं. शेणघाण काढलं. परत घरात गेले तर पोलीस घरात शिरून झडती घेत होते. मी म्हणाले, ''चांगली झडती घ्या. वरचा माळाबी तपासा. कोण हाताला लागतंय का बघा.'' घरात कोण नव्हतंच, तर पोलिसांच्या हाताला लागणार काय? ते हात हालवत घराबाहेर पडले. मी म्हणाले, ''का हो फौजदारसाहेब आम्ही साध्या माणसांवर तुमचा विश्वास नाही. मी किती डाव सांगितलं माजा थोरला मुलगा कोल्हापूरला शिकायला असतो. तर तुम्ही पुना पुना त्रास देता.'' फौजदार काहीच न बोलता रागारागानं पाय आपटत आणि आमच्याकडं बघत बघत आपली पोलीस पार्टी घेऊन बाहेर पडला. त्याच्याकडं बघून मला हसू आलं.

अशीच एक आठवण हाय. १९४३-४४ चं साल असावं. मी आणि जाऊबाई अंगणात भांडी धूत होतो. शेजारची नगा अक्का भेटायला आली

होती. तेवढ्यात फौजदार कोरूची दहा-बारा पोलिसांना घेऊन आला. घराला गराडा घाला अशी ऑर्डर देऊन तो स्वत: घरात शिरायला लागला. तशी मी झटकन उठले. साहेबाचं मनगट घट्ट पकडून त्याला मागं खेचलं. मी त्याला म्हटलं, ''माझं घर म्हणजे काय पोलीस स्टेशन वाटलं व्हय. कवाबी यावं आणि सरळ आत घुसावं. कुणाला विचारून घरात शिरताय?'' माझा आवाज ऐकून फौजदार गांगरला. तरी तो म्हणाला, ''आम्हाला पक्की खबर मिळाली आहे की, तुमच्या घरात दारूगोळा, शस्त्रास्त्रं आणि काही क्रांतिकारक दडून बसले आहेत. आम्हाला झडती घ्यायचीय. आम्हाला आमचं काम करू द्या. सरकारी कामात अडथळा आणू नका.'' मी म्हटलं, ''असं व्हय. मग लौकर घ्या झडती. बघा काय गावतंय का?''

खरं म्हणजे पोलिसांना मिळालेली खबर खोटी नव्हती; परंतु त्यांना यायला उशीर झाला होता. नागनाथ आपल्या सवंगड्यासह भल्या पहाटेच पसार झाला होता. बंदुका-दारूगोळा त्यानं स्वत:बरोबर नेला. त्यामुळं पोलिसांच्या हाताला काही लागलं नाही. फुकटच्या येरझारीनं पोलीस दमले होते. त्यांनी माझ्या मालकाकडं चहाची मागणी केली. त्यांनी मला सांगितलं. खरं माझ्या लेकरांच्या जिवावर उठलेल्या त्या मुडद्यांच्या नरड्यात चहा ओतावा असं मला वाटंना. मग मी म्हटलं, ''चहा केला असता वो, खरं चहाला दूध नाही.'' माझ्या बोलण्याचा रोख मालकास्नी कळला नाही. ते म्हणाले, ''अगं मग धार काढ की म्हशीची. दारात का उगाच बांधल्यात व्हय?''

मी पण इरेला पेटले. मनात ठरविलं, नाहीच द्यायचा चहा. मग मी रेडकं सोडली आणि एका म्हशीचं रेडकू दुसरीच्या कासत आणि दुसरीचं रेडकू पहिलीच्या कासत सोडलं. तशा म्हशी रेडकांना लाथाळू लागल्या. मग ती साहेबाला म्हटलं, ''साहेब, बिन दुधाचा च्या चालल का हो?'' माझी बोलण्यातली खोच साहेबाच्या लक्षात आली. तो म्हटला, ''मावशी आम्हाला चहा मिळाला. निघतो आम्ही.'' असं म्हणून ते गेले. मी आणि जाऊबाई एकमेकींकडं बघून हसायला लागलो.

■■■



प्रकरण सहा

## क्रांतिकार्यातील सखी : नगाक्का

नागनाथाच्या निमित्ताने त्यांच्या मातोश्री लक्ष्मीबाई देशाच्या स्वातंत्र्य चळवळीत नकळतपणे ओढल्या गेल्या. त्याचप्रमाणे लक्ष्मीबाईंच्या मैत्रीणीही या कार्यात ओढल्या गेल्या. त्यापैकीच एक म्हणजे त्यांच्या घराशेजारी राहणाऱ्या नगा अक्का होय. देश, देशाचं स्वातंत्र्य, गुलामगिरी या गोष्टींची त्यांना फारशी जाणीव नव्हती. परंतु आपल्यावर गोऱ्या माणसांचं राज्य आहे. त्यांच्या सांगण्यानुसार पोलीस वागतात आणि गोरगरिबांवर जुलूम जबरदस्ती करतात. एवढं नगाक्कांना कळत होतं. या गोऱ्यांच्या तावडीतून आपला देश सोडवायचा असं फार मोठं काम आपल्या पोरांनी शिरावर घेतलंय असं त्यांना वाटायचं. त्यामुळे नागनाथ अण्णा, जी. डी. बापू, किसन अहिर, राम मास्तर, नारायण पेशवे या पोरांचं त्यांना कौतुक वाटायचं. आपली पोरं पोलिसांच्या तावडीत सापडू नयेत असं त्यांना मनोमन वाटायचं म्हणून त्या आपली मैत्रीण लक्ष्मीबाईच्या कामात हातभार लावायच्या.

क्रांतिकारक पोरांना जेवण पोहोच करणं, पोलिसांची खबर बातमी देणं, हत्यारं लपवणं, इकडून तिकडं पोचवणं अशी जोखमीची कामं त्या जिवावर उदार होऊन करायच्या. या काळात सगळे क्रांतिकारक शिवरायांच्या मावळ्यांप्रमाणं डोंगरदऱ्यांच्या आधारानं, झाडाझुडपाच्या आधारानं लपून-छपून रहात. क्रांतिकारकांची काळजी घेणं हे आपलं कर्तव्य आहे, असं अनेकांना वाटे. नगाक्कासुद्धा याच भावनेनं या कामात मदत करीत.

सुगीचे दिवस संपले की रान-शिवार मोकळं होत असे. बांधावरची झाडं सोडली तर शिवारात दडण नसायची. तरीही क्रांतिकारक नागनाथ अण्णा, जी. डी. बापू आपल्या मोजक्या साथीदारासह वाळव्याच्या शिवारात शेतकऱ्यांच्या वस्तीवर रहात असत. तर कधी लहान मोठ्या ओढ्यांच्या व नाल्यांच्या काठावर असणाऱ्या झाडाझुडपांच्या ताटव्यात दडून रहात. रात्री गावात जात. गोरगरिबांवर अन्याय अत्याचार करणारे सावकार, इंग्रजांचे हस्तक, गावगुंड यांचा समाचार घेत. प्रतिसरकार स्थापन करून त्यामार्फत न्यायनिवाडा केला जाई. दोषींना शिक्षा दिली जाई आणि पहाटे पहाटे छोटे छोटे ग्रुप करून ते क्रांतिकारक वेगवेगळ्या ठिकाणी पांगत. आष्टे शिवारातील पांढर भाग, इस्लामपूर रस्ता, कामेरी रस्ता, अहिरवाडी शिवार अशा ठिकाणी त्यांचा मुक्काम असे. त्या त्या ठिकाणी जेवण, निरोप किंवा शस्त्रसाठा पोहोचवण्याचे काम लक्ष्मीबाई आणि नगाक्का करत. हे काम गुप्तपणे करावे लागे. पोलीस आणि सी.आय.डी.चे लोक यांची पाळत असे. त्यामुळे अनेक बहाणे करून घराबाहेर पडावे लागे. योग्यवेळी, योग्य स्थळी रसद पुरवणे हे मोठ्या कसरतीचे काम त्या हिकमतीने करीत. अधे-मधे पोलीस संशय घेत, पाळत वाढवत. अशा वेळी लक्ष्मीबाई, सौ. तानुबाई खंडू शेळके व कासेगावला इंदूताई पाटणकर यांना निरोप देत. क्रांतिकारांना रसद पुरविण्याचे काम परस्पर उरकले जाई.

१० सप्टेंबर, १९४२ चा इस्लामपूर मोर्चा, टोप संभापूर जवळील पोष्टाच्या टपाल गाडीची लूट, पोलीस चौकीवरील हल्ले, गोव्यावरून आणलेल्या हत्यारांचा पोलिसांना लागलेला सुगावा आणि बिचूद शेणोली हद्दीत ७ जून, १९४३ ला लुटलेली पे स्पेशल ट्रेन या सर्व क्रांतिकारकांच्या कारनाम्यांमुळे इंग्रज सरकार बिथरले होते. त्यांनी वाळवा व आजूबाजूचा सारा परिसर गावगुंडांना हाताशी धरून पिंजून काढला. वाळवा परिसरातच पोलीस पार्टीने तळ ठोकला. अशावेळी लक्ष्मीबाई, नगाक्का, राजूताई, इंदूताई या रणरागिनी प्रसंगी वेषांतर करून क्रांतिकारकांना मदत करीत होत्या. पोलिसांच्या हालचालीची खडान्‌खडा माहिती क्रांतिकाराकंना पोहोचवत होत्या. त्यांना पोलिसांपासून वाचवत होत्या. ब्रिटिश सरकारने जंग जंग पछाडले परंतु नागनाथअण्णा व जी. डी. बापू ही जोडगोळी हाताला लागत नव्हती. म्हणून पोलिसांनी क्रांतिकारकांच्या कुटुंबाकडे आणि शेतीवाडीकडे आपला मोर्चा वळवला.

■ ■ ■



प्रकरण सात

# पोलिसांचा ससेमिरा

इंग्रजांची सत्ता उलटून टाकण्यासाठी क्रांतिकारकांनी अनेक मार्ग अवलंबिले. पोलिसांची हत्यारे लुटणे, पैशासाठी टपालगाडी व स्पेशल पे ट्रेन लुटणे, पकडलेल्या भूमिगत कार्यकर्त्यांना सोडविण्यासाठी पोलिसांवर हल्ले करणे, टेलिफोनच्या तारा तोडणे, रेल्वे पूल उद्ध्वस्त करणे, अशा कारवाया करून क्रांतिकारक इंग्रजांना एक प्रकारचे आव्हानच देत होते. नागनाथअण्णा व जी. डी. बापू या जोडगोळीवर इंग्रजांचा फार राग होता. या दोघांना 'पकडा अथवा ठार मारा' असा आदेश होता. त्यांना पकडून देणाऱ्यांसाठी पैशाचे मोठे आमिष दाखवले होते. गावगुंडांना हाताशी धरून स्वातंत्र्य सैनिकांवर हल्ले चढवले होते. मात्र इंग्रजांना यश येत नव्हते. क्रांतिसिंह नाना पाटील, नागनाथअण्णा, जी. डी. बापू, वाय. सी. पाटील, किसन पैलवान, खंडू शेळके अशा अनेकांवर सरकारचा डोळा होता. पण कोणच हाताला लागत नव्हते. म्हणून सातारा कलेक्टर, डी.एस.पी., क्रिमनल गुंड व प्रमुख काही मंडळींची गुप्त मीटिंग झाल्याची वार्ता होती. क्रांतिकारकांना त्याची कुणकूण लागली. आता क्रांतिकारकांच्या कुटुंबाकडे मोर्चा वळवण्याचा निर्णय झाल्याचे क्रांतिकारकांच्या गुप्तहेरांना कळले. या क्रांतिकारकांच्या गुप्तहेर संघटनेचे नाव होते 'बहिर्जी नाईक'!

नागनाथअण्णा हाताला लागत नाहीत म्हटल्यावर पोलिसांनी त्यांच्या

घरच्या माणसांकडे मोर्चा वळवला. १९४३-४४ चे साल असेल. एकदा दिवेलागणीच्या वेळेला आष्ट्याचे फौजदार दहा-बारा पोलिसांची तुकडी घेऊन वाळव्यात आले. लक्ष्मीबाई दारातच उभ्या होत्या. फौजदार म्हणाला, ''ताबडतोब मुलाला पोलिसांच्या स्वाधीन करा, नाही तर वेगळे परिणाम भोगावे लागतील.'' तशा आई पोलिसांना म्हणाल्या, ''आरं मुड्द्या, कसला रं परिणाम? तुम्हाला काय करायचं ते खुशाल करा. मी घाबरणारी बाई नव्हं.''

पुढे त्या फौजदाराला म्हणाल्या, ''ए बाबा, तुम्हाला किती वेळा सांगितलं मला फक्त दोनच पोरं हाईत. त्यातला थोरला नागनाथ शिकायला कोल्हापूरला हाय आन् धाकटा शामराव शेती करतोय. माझ्या पोरांनी काय घोडं मारलंय म्हणून मी त्यास्नी तुमच्या म्होरं हजर करू. शामराव गेलाय शेतात. तो येईल आता घडीभरात. आन् कोल्हापूरात नागनाथ हाय. त्याचा पत्ता देऊ काय?'' फौजदार पण कमी नव्हता. तो म्हणाला, ''अहो मावशीबाई, तुम्हाला सगळे माहीत आहे. उगाच भोळेपणाचा आव आणू नका.'' शेवटची ताकीद देऊन फौजदार मागं गेला.

पुन्हा दुसऱ्या दिवशी सकाळी तयारीनं आला. बरोबर फौजफाटा होताच. त्याने आणलेली घरदार व शेतीवाडीच्या जप्तीची नोटीस लक्ष्मीबाईंच्या हातात दिली. त्यांनी नोटीस घ्यायला नकार दिला. तेव्हा रागाने त्याने लक्ष्मीबाईंच्या अंगावर नोटीस फेकली. त्याचवेळी शामरावला पकडले. शेतात काम करणाऱ्या गड्यामाणसांना तंबी देऊन हाकलून दिले. पिसाळलेल्या फौजदाराला बघून सगळी माणसे चूपचाप निघून गेली. नागनाथचे वडील दुसऱ्या रानात गेले होते. सगे-सोयरे लांबूनच चुकचूकत होते.

पोलिसांनी शामरावला पकडून नेले. जाता जाता लक्ष्मीबाईंना म्हणाले, ''मावशीबाई, थोरल्याला हजर करायचं आणि धाकट्याला घेऊन जायचं.'' लक्ष्मीबाई आल्या प्रसंगाला धीराने तोंड देत होत्या. तिकडे दुसऱ्या रानात असणाऱ्या रामचंद्र नायकवडींना कुणीतरी ही बातमी सांगितली. ते पळतच घराकडे आले. आपल्या मुलाला, शामरावला पोलिसांनी पकडून नेले म्हटल्यावर ते भांबावल्यासारखे करू लागले. आता आपल्या मुलाची गत बरी नाही. ते पोलीस त्याचं हाल करतील. मारझोड करतील. असं त्यांना वाटू लागलं. काय करावं त्यांना कळंना. तेव्हा लक्ष्मीबाईंनीच त्यांना धीर दिला. त्या म्हणाल्या,



''तुम्ही शामरावची काळजी करू नका. चार दिवस ठेवतील आणि सोडून देतील.'' आणि तसेच घडले. शामराव क्रांतिकार्यात नाही याची खात्री पटल्यावर पोलिसांनी त्याला सोडून दिले. मात्र पोलिसांनी त्याला खूप त्रास दिला होता. मारझोडही केली होती. प्रश्नांचा भडिमार केला होता. शामरावनं घडल्या गोष्टी आई-बापाला शांतपणे सांगितल्या आणि शेवटी तो म्हणाला, ''बापू, आपल्याला पोलिसांनी कितीही त्रास देऊ देत. यातला एक शब्द अण्णाला सांगायचा नाही. आणि अण्णाला कधीच पोलिसांच्या ताब्यात द्यायचं नाही.'' रामचंद्रांनी ते ऐकलं. त्यांच्या डोळ्यात पाणी तरळलं. लहानग्या शामरावला उराशी कवटाळून ते म्हणाले, ''वारे वा, माझ्या वाघा! जसा भावाला भाऊ शोभलास.''

काही दिवस निघून गेले. मधला थोडा काळ घरच्यांना बरा गेला. याच काळात नागनाथअण्णा व जी. डी. बापूंनी क्रांतिसिंह नाना पाटलांच्या नेतृत्वाखाली प्रतिसरकार स्थापन केले. दिवसाढवळ्या सांगाव आऊट पोष्ट पोलिसांच्या बंदुका लुटल्या. तसं इंग्रज सरकार बिथरलं. पुन्हा येरे माझ्या मागल्या. पुन्हा रामचंद्र नायकवडींच्या घराकडे पोलिसांचा मोर्चा वळला.

३ जुलै १९४३ रोजी पहाटे पहाटे घरावर पाच-पन्नास पोलिसांनी छापा टाकला. घोडेस्वार आणि हत्यारबंद पोलिसांनी घराला वेढा दिला. कुणीतरी पोलिसांना नागनाथअण्णा घरात असल्याची चुकीची खबर दिली असेल असे लक्ष्मीबाईंना वाटले. त्यांनी नेहमीप्रमाणे पोलिसांकडे दुर्लक्ष केले. कारण नागनाथ घरी नव्हताच. उजाडता उजाडता घराचं दार उघडून लक्ष्मीबाई बाहेर आल्या. गोठ्यात म्हशीच्या धारा काढण्यासाठी कासंडी घेऊन गेल्या. पाठोपाठ रामचंद्र वैरण-पाणी करण्यासाठी जाऊ लागले. येवढ्यात फौजदारानं त्यांना हाटकलं. हातात बेड्या घातल्या, दंडाला काढण्या बांधल्या, घेऊन गेले. पुढे पोलिसांनी त्यांना येरवडा जेलमध्ये ठेवले. वडिलांना अटक केल्यावर मुलगा स्वत:च्या मनाने हजर होईल असा पोलिसांचा कयास होता. पण तो साफ चुकला. उलट नागनाथ व त्याच्या साथीदारांनी इंग्रजी सत्ता खिळखिळी करण्यासाठी जास्त जोर धरला. क्रांतिमाता लक्ष्मीबाईंनीही पूर्वीपेक्षा मोठ्या जोमाने क्रांतिकारकांना मदत करायला सुरुवात केली. सुरक्षेची काळजी, जेवणखाण पोहोचवणे, हत्यार लपवणे, पोलिसांच्या बातम्या पोहोचवणे, दारूगोळा, काडतुसे पोहोचविणे या कामाचा सपाटा लावला. सोबतीला नगाक्का, राजूताई, इंदूताई, तानूबाई मदतीला होत्याच.

याच दरम्यान एकवेळ जेलमधून रामचंद्रांचे पत्र घरी आले. त्यांनी लिहिले होते, ''मी इकडे खुशाल आहे. काळजी नसावी. शेतीकडे नीट लक्ष द्यावे. धाकट्या खोंडाची काळजी घ्या.'' फारसे न शिकलेल्या रामचंद्रांनी पोलिसांना हुलकावणी दिली होती. आणि शामरावला सांभाळण्याचे कळवले. लक्ष्मीबाईंना मतितार्थ कळला. त्यांच्या डोळ्यात कळत-नकळत पाणी उभे राहिले.

■■■



प्रकरण आठ

## लक्ष्मीबाईंनाही अटक

पोलिसांनी शामरावला अटक केली आणि काही दिवस आष्ट्याच्या पोलीस स्टेशनमध्ये डांबून ठेवले. नंतर रामचंद्र गणू नायकवडींना अटक करून येरवड्याच्या तुरुंगात टाकले. तरीही नागनाथअण्णांच्या कामावर परिणाम झाला नाही. उलट ते अधिक त्वेशाने चळवळ चालवू लागले. तेव्हा पोलिसांनी क्रिमनल गुंडांना नागनाथअण्णांना ठार मारण्याचा आदेश दिला. त्यांना पकडणाऱ्यास बक्षिसांची खैरात केली, तरी यश येईना. मग त्यांनी शेवटचा घाव घालायचे ठरवले.

दि. १२ नोव्हेंबर, १९४३ च्या सायंकाळी दिवे लागण होत होती. क्रांतिमाता लक्ष्मीबाई घरकामात मग्न होत्या. त्याचवेळी पोलीस घरी पोहोचले आणि त्यांनी क्रांतिमातेला अटक केली. त्यांच्या अटकेच्या ऑर्डरचा नंबर होता एस.डी./आय/१२२६८/१२-११-१९४३. लक्ष्मीबाईंना पकडले, परंतु जवळच्या सांगली, साताऱ्याच्या तुरुंगात न ठेवता येरवड्याच्या जेलमध्ये ठेवले.

ही बातमी क्रांतिकारकांना कळताच ते पेटून उठले. त्यांनी सर्वत्र हल्लाबोल केला. पोलीस चौकीवर हल्ले चढवले. रेल्वे रूळ उखडले, तारा तोडल्या, पोलीस गाड्या व चौकींना आगी लावल्या. अशा परिस्थितीत पोलीस थोडे नरमले. त्यांनी एक पाऊल मागे घेतले आणि २२ फेब्रुवारी, १९४४ रोजी रामचंद्र नायकवडींना सोडून दिले.

इंग्रज तसे हुशार व डावपेचात तरबेज होते. त्यांनी रामचंद्र बापूंना सोडून क्रांतिकाराकांना काही कालावधीसाठी शांत केले. त्याच वेळी इतर स्वातंत्र्यसैनिकांच्या कुटुंबियांना पकडण्याची योजना आखली. जेणेकरून क्रांतिकारकांचे मनोधैर्य खचेल. त्यातील एखाद-दुसरा क्रांतिकारक शरण आला तर त्याच्या माध्यमातून इतरांची बित्तंबातमी समजेल, ठाव-ठिकाणा समजेल, असा त्यांचा होरा होता. त्यासाठी त्यांनी क्रांतिवीर नागनाथअण्णांच्या जीवाला जीव देणारे साथीदार, अंगरक्षक यांच्या बायका-मुलांना, आई-वडील-भावांना त्रास द्यायला सुरुवात केली. त्यांना पकडणे, मारहाण करणे, पोलीस स्टेशनमध्ये डांबून ठेवणे असे प्रकार सुरू केले. अण्णांचे काही सहकारी आपल्या घरच्यांना वाचवायला धावत येतील, अण्णांचे बळ कमी होईल, अण्णा अलगद आपल्या जाळ्यात सापडतील असा त्यांचा कयास होता. म्हणून प्रथम पोलिसांनी अण्णांचा बालेकिल्ला असणाऱ्या अहिर गल्लीवर धाड टाकली. पै. किसन अहिरांचे वडील आत्मू दादा, रामचंद्र अहिरांचे बंधू बाळक्या आप्पा, नारायण कदमांचे बंधू आनंदा कदम-शिराळकर, खंडू शेळके यांचे बंधू यशवंत शेळके, महादेव शेळके, त्यांच्या पत्नी तानूबाई यांना पोलिसांनी पकडले. मारहाण केली. त्यापैकी बाळाराम संतू अहिर, शंकर धोंडी अहिर यांच्यावर गुन्हे दाखल करून त्यांना दोन-दोन वर्षाच्या कारावासाच्या शिक्षा दिल्या. कळत-नकळत क्रांतिकारकांचे कुटुंबियही ब्रिटिश पोलिसांच्या रेकॉर्डवर आले. पोलिसांच्या दंडूकशाहीला घाबरून क्रांतिकारकाच्या कुटुंबातून कोणीतरी फितूर होईल, ही ब्रिटिशांची खुळ आशा फोल ठरत होती.

■■■



प्रकरण नऊ

# क्रांतिमातेला भेटली लेक

नागनाथअण्णांचे वडील रामचंद्र बापूंना इंग्रजांनी तुरुंगातून सोडून दिले असले तरी मातोश्री लक्ष्मीबाई अजून येरवड्यातच होत्या. जेलमध्ये रोज सकाळी कैद्यांना बराकीतून बाहेर सोडले जाई. प्रात:विधी, अंघोळपाणी यासाठी कैद्यांना बाहेर काढले तरी त्यांच्यावर लक्ष ठेवण्यासाठी चार हत्यारबंद पोलीस फिरत. स्त्री कैद्यांसाठी वेगळी व्यवस्था असे. त्यांच्यावर लक्ष ठेवण्यासाठी दोन स्पेशल पोलीस व दोन स्त्री पोलीस असत. त्यांचे लक्ष्मीबाईंवर बारकाईने लक्ष असे.

एकदा लक्ष्मीबाई इतर स्त्री कैद्यांसोबत हौदावर हातपाय धुवायला गेल्या. तिथे त्यांना अरुणा असफअली, उषा मेहता, प्रेमा कंटक, लीलाताई पाटील इ. भेटल्या. त्यांची आईंनी ओळख करून घेतली. त्या पुढे आपल्या बराकीकडे गेल्या. लक्ष्मीबाई तिथेच मिश्री लावत बसल्या होत्या. बाजूलाच हातात दोन दंडे घेतलेले पोलीस बोलत बसले होते. तंबाखू मळता मळता एक लक्ष्मीबाईंना ऐकू जाईल अशा आवाजात पण दबक्या स्वरात दुसऱ्याला म्हणाला, "अरे, कालची बातमी तुला कळली का?" दुसरा म्हणाला, "न्हाई बा. काय झालं?" पहिला पोलीस म्हणाला, "आरं काल मोठंच रामायण घडलंय आन् तू कुठं हाईस. काल सातारच्या पोलिसांनी शिराळा पेठ्यात धाड टाकली आणि वाळव्याचा वाघ नागनाथ नायकवडी याला पकडला." हे शब्द कानावर पडताच लक्ष्मीबाई कान टवकारून ऐकू लागल्या. "बेस झालं गड्या." दुसरा पोलीस म्हणाला. पहिला

म्हणाला, ''आरं बेस काय म्हणतोस. नागनाथ काय तुला साधासुधा वाटला काय? नाना पाटलाच्या तालमीत तयार झाल्याला गडी त्यो. तेनं पोलिसांच्या हाताला हिसडा दिला आणि बघता बघता गुंगार देऊन पळाला.'' दुसरा म्हणाला, ''आ, काय हे आक्रित!'' हे शब्द ऐकून क्रांतिमातेला जरा बरे वाटले.

पहिला पोलीस क्रांतिमातेकडं चोरट्या नजरेनं बघत म्हणाला, ''आरं, खरं सातारचं पोलीस पण काय कच्चं नव्हतं. त्यांनी नागनाथचा पाठलाग केला. आणि पळणाऱ्या नागनाथवर गोळ्यांचा पाऊस पाडला. त्यात तो जायबंदी होऊन खाली पडला.'' हे शब्द ऐकून क्रांतिमातेच्या काळजाचं पाणी पाणी झालं. त्यांना काही सुचेना. त्या आपल्या बराकीकडं पळाल्या. पळता पळता चक्कर येऊन खाली पडल्या. सगळा तुरुंग आपल्याभोवती फिरतोय असं त्यांना वाटू लागलं. आपल्या नागनाथचं काय झालं असेल या विचारानं त्यांच्या नरड्यातनं अन्नाचा घास खाली उतरेना की पाण्याचा घोट खाली जाईना. दिवसेंदिवस त्यांची तब्येत खालावत चालली. त्या आजारी पडल्या.

त्यावेळी येरवड्यात राजूताई पाटील (बिरनाळे) यांना ठेवण्यात आले होते. सोलापूरमध्ये सरकारी कामात अडथळा केला या कारणाने त्यांना अटक केली आणि येरवड्याला आणून टाकलं. राजूताई वेगळ्या बराकीत होत्या. त्यामुळे त्यांची क्रांतिमातेशी भेट झाली नव्हती. राजूताई सोलापूरला श्राविका महिलाश्रमामध्ये राहत होत्या. त्यांनी इंग्रज सरकारच्या विरोधात मोर्चा काढला होता, त्यावेळी त्यांना पकडले. राजूताईंना समजले नागनाथअण्णांची आई या तुरुंगात आहे. ताईंची अण्णांशी चांगली ओळख होती. अण्णा कधीमधी सोलापूरच्या आश्रमात मुक्कामाला येत असत. अण्णांच्या कार्याबद्दल राजूताईंच्या मनात आदर होता. शिवाय आश्रमाच्या गांधीवादी संस्थापिका अण्णांशी मोठ्या आदराने वागत हेही त्यांनी बघितले होते. राजूताईंच्या लहानपणीच त्यांच्या आई वारल्या होत्या. त्यामुळे कधी एकदा नागनाथअण्णांच्या आईला भेटते, असे त्यांना वाटत होते.

त्या जाऊन लक्ष्मीबाईंना भेटल्या. स्वत:ची ओळख सांगितली. स्वत:ची आई भेटल्याचा आनंद ताईंना झाला. क्रांतिमाता म्हणाल्या, ''मुली, तुला आई नाही आन् मला लेक नाही. आजपासून माझं तुझं नातं माय-लेकीचं!'' ते शब्द ऐकताच राजूताईंच्या डोळ्यात पाणी आलं. त्यांनी मनोमन ठरवलं, तुरुंगात



असेपर्यंत आपण या क्रांतिमातेची सेवा करायची. त्या स्वत: जेलरला जाऊन भेटल्या. ''लक्ष्मीबाई या महान देशभक्ताच्या मातोश्री आहेत. त्या आजारी आहेत. त्यांची काळजी घेण्यासाठी मला त्यांच्या बराकीत ठेवा.'' असे ताईंनी सांगितले. जेलरने ती विनंती मान्य केली. तेथून पुढे राजूताईंनी लक्ष्मीबाईंची खूप सेवा केली. आंघोळ घालणे, हातापायाला तेल चोळणे, जेवणाची काळजी घेणे, त्यांची लुगडी धुणे अशी सर्व कामे करायच्या. त्यांच्याशी खूप गप्पागोष्टी करून त्यांना धीर द्यायच्या. बोलता बोलता राजूताईंना सुगावा लागला की क्रांतिमाता अचानक कशा खचून गेल्या? एक दिवस योग्य संधी मिळताच राजूताई त्या खोडसाळ पोलिसांना म्हणाल्या, ''लक्षात ठेवा या एका देशभक्ताच्या आई आहेत. जर तुमची करणी नागनाथअण्णांना कळली तर तुमची बरी गत नाही. इथून पुढं तरी खोट्या बातम्या ऐकवून एखाद्या आईचं काळीज फोडू नका.''

■ ■ ■

प्रकरण दहा

# येरवड्यातून सुटका

येरवडा जेलच्या चौकात उंच उंच झाडांच्या ताटव्यातून सूर्याची कोवळी किरणे खाली जमिनीवर उतरली होती. त्या फाटक्या उन्हात राजूताई लक्ष्मीआईच्या डोक्याला, पायाला तेल चोळत होत्या. आईची तब्येत हळूहळू सुधारत होती. राजूताई आईंना गुप्त पत्रकातील बातम्या सांगायच्या. तर काही वृत्तपत्रात नागनाथअण्णांविषयी छापून आलेला मजकूर वाचून दाखवायच्या. जेणेकरून नागनाथअण्णा जिवंत असून मोठ्या जोमाने स्वातंत्र्य चळवळ चालवत आहेत, हे त्या मातेला कळावे. राजूताईंना मनोमन वाटत होते की, या माय-लेकराची एकदा तरी भेट घडावी. पण ते शक्य नव्हते.

त्यावेळचा जेलर तसा भला माणूस होता. राजूताईंनी त्याला सांगितले, ''लक्ष्मीबाई या फक्त नागनाथअण्णांच्या आई नाहीत, तर सातारा जिल्ह्यातील तमाम क्रांतिकारकांच्या आई आहेत. जर चुकून या स्त्रीच्या जिवाचे तुरुंगात बरे-वाईट झाले तर सगळे क्रांतिकारक खवळतील. इंग्रजांच्या विरोधात संतापाचा उद्रेक होईल. ही स्त्री एका खेड्यात राहून इंग्रजांच्या विरोधात काय करणार आहे? तिला सोडून देण्यात यावे.''

जेलरला राजूताईंचे बोलणे पटले. त्याने तसा रिपोर्ट तयार करून वर पाठविला. आठ-दहा दिवसांनी लक्ष्मीबाईंना सोडण्याची ऑर्डर आली. तातडीने आईंना सोडण्यात आले. सरकारी दप्तराप्रमाणे ती ऑर्डर UL.HD (POI)No.



SD VI/438.dt. 11.1.44 अशी होती. पण त्यांना १३ जानेवारीला सोडण्यात आले. त्याचवेळी राजूताईंनाही सोडण्यात आले. राजूताई आईंना घेऊन वाळव्याला आल्या. घरच्या मंडळींना तुरुंगातील घडल्या गोष्टी सांगितल्या. तातडीने नागनाथअण्णांना निरोप दिला. ''आई जेलमधून सुटून घरी आल्यात, पण आजारीच आहेत. एकवेळ भेटून जावा.'' त्यावेळी अण्णा शिराळ पेट्यात चरणमध्ये एका शेतकऱ्याच्या वस्तीवर होते. बहर्जी नाईक संघटनेच्या हेरखात्याकडून नागनाथअण्णांना निरोप मिळाला, तसा आणखीही एक निरोप मिळाला. ''तुमच्या आई तुरुंगातून सुटून आल्यामुळे तुम्ही त्यांना भेटायला येणारच असा त्यांचा अंदाज आहे. त्यामुळे तुमच्या मागावर गुप्त पोलीस, सी.आय.डी., गावगुंड अशी सगळी मंडळी आहेत. घराच्या आसपास रोज टेहळणी असते. तुम्ही भेटायला आलात की पकडण्याची जय्यत तयारी केली आहे.'' दुसऱ्या निरोपामुळे अण्णा सावध झाले. त्यांनी आपल्या विश्वासू माणसाकडून निरोप दिला, ''आई तू सुटून आल्याचं समजलं. मला लई आनंद झाला. थोड्याच दिवसात तुला भेटून जाईन.'' अण्णांनी आईला भेटायचा बेत पुढे ढकलला आणि आपल्या मोजक्या भूमिगत कार्यकर्त्यांसह ते शाहूवाडी तालुक्यात लोकराजा शाहू छत्रपतींच्या आश्रयाला गेले.

राजूताई पाटील यांच्या मनात असलेले स्वातंत्र्याचे स्फूलिंग वाळव्यात आल्यावर अधिकच फुलले. नागनाथअण्णांच्या कामात सक्रीय उतरायचं त्यांनी ठरवलं. खांद्यावर बंदूक घेऊन इंग्रजांविरुद्ध लढणाऱ्या स्त्रियांमध्ये राजूताईंना मानाचं स्थान आहे. त्यांनी शिराळा पेट्यात पुरुषांच्या बरोबरीनं फौजी ट्रेनिंग घेतलं. त्याप्रसंगी सगळ्या क्रांतिकारकांचं जेवण बनवण्याचं काम त्या करीत. दोन दोन चुलीवर स्वैपाक करीत. गोव्याहून हत्यारं आणण्यापासून धुळ्याचा खजिना साताऱ्यामध्ये सहीसलामत पोहचवण्यापर्यंत अनेक कामात त्या सक्रीय होत्या.

येरवडा जेलमधून वाळव्याला आल्यावर आई अण्णांच्या भेटीसाठी खूपच व्याकूळ झाल्या होत्या. तुरुंगातून आल्यापासून त्यांच्यात खूप बदल झाला होता. तुरुंगानं त्यांना खूप काही शिकवलं होतं. अनेक राजकीय कैद्यांकडून त्यांना अनेक गोष्टी कळल्या होत्या. स्त्रीची जबाबदारी नुसती चूल आणि मुल यापुरतीच नाही, तर त्यापलिकडेही ती काही वेगळेपण दाखवू शकते, ही गोष्ट त्यांना पटली होती. आपण अजूनही काहीतरी करावे असे त्यांना सारखे वाटत

होते. पण त्यांना थोडा वेळ पाहिजे होता. पती-पत्नी दोघेही तुरुंगात गेल्यामुळे प्रपंचाचं जे नुकसान झालं, ते भरून न येणारं होतं. घरची आणि शेतीची सारी जबाबदारी पुन्हा खांद्यावर घ्यावी लागणार होती. रोजचा दिवस वेगळा होता. रोज कुठे काय, कुठे काय घडल्याच्या बातम्या कानावर येत होत्या. कुठे पोलिसांनी मोर्चावर हल्ला केला, तर कुठे सत्याग्रहींवर गोळीबार झाला. त्यात इतकी इतकी माणसे ठार झाली. हे ऐकून लक्ष्मीबाईंचे मन हळहळत होते.

■■■



प्रकरण अकरा

## आठवणीतील शेवंता

लक्ष्मीबाई वाळव्यात परतल्यावर गावातल्या आया-बाया त्यांना भेटायला यायच्या. आई त्यांना तुरुंगातील अनुभव सांगायच्या. अनेक मोठे पुढारी, कार्यकर्ते काय काय काम करतात, काय काय बोलतात ते सांगायच्या. त्यामुळे या सामान्य वाटणाऱ्या स्त्रियांच्या अंगात चेव चढायचा. दुसऱ्या देशातून आलेले इंग्रज आपल्यावर राज्य करतात आणि आपली तरणीबांड पोरं प्राणाची बाजी लावून त्यांच्याशी लढतात, याचं त्यांना कौतुक वाटायचं. आपोआपच क्रांतिकारकांना मदत केली पाहिजे ही भावना प्रत्येक घराघरात बळ धरू लागली. शेकडो कार्यकर्ते भूमिगत राहून लढू शकले ते या सामान्य जनतेच्या पाठबळावरच.

अशीच लक्ष्मीबाईंच्या संस्कारात तयार झालेली एक तरुण सासुरवाशीन म्हणजे शेवंता साळसकर होय. लक्ष्मीबाईंना इंग्रजांनी तुरुंगातून सोडलं तो मार्गशीर्ष महिना होता. नंतर येणाऱ्या पौष महिन्यात सासऱ्याने सुनेचे तोंड बघायचे नसते म्हणून सासुरवाशीनी माहेरी जात होत्या. इकडे तुरुंगातून सुटलेल्या आईला भेटण्यासाठी नागनाथअण्णा आतुर झालेले होते. जानेवारीतला चौथा शुक्रवार होता. अण्णा शनिवारचा उपवास करायचे. त्यामुळे आदल्यादिवशीच बाजारातून रताळी, केळी आणली होती. शाबू, तांदूळ निवडून ठेवले होते. रात्रीचं जेवण व भांडीकुंडी झाल्यावर लक्ष्मीबाई माजघरात झोपल्या होत्या. वडील रामचंद्र मळ्यात वस्तीला गेले होते, तर

धाकटा शामराव माचावर झोपला होता. वाघ्या कुत्रा माचाखाली बसला होता. नागनाथअण्णांनी येतो म्हणून निरोप दिला होता. त्यामुळे आई वाट बघत होत्या. इतक्यात वाघ्या कुत्रा जोरजोरात भुंकायला लागला. तशा चटदिशी उठून आईसाहेब बाहेर आल्या. शामराव माचावरच बसून अंदाज घेऊ लागला. एवढ्याच अण्णा आले. अण्णांना बघून वाघ्या भुंकायचा थांबला. धावत पळत आलेले अण्णा दमगीर झाले होते. ते म्हणाले, ''आई, मी तुला भेटायला पुन्हा येतो. आता माझ्यामागे पोलीस आणि गावगुंड लागले आहेत. मी जातो.'' आणि घराच्या पश्चिमेकडून पळाले. लक्ष्मीबाई दारात उभ्या होत्या. पोलीस त्यांच्याकडे न बघताच अण्णांचा पाठलाग करत ते पुढेच गेले. किती केलं तरी पोलीस नवखेच. त्यांना अंधारात दिशा कळणं, अधल्या-मधल्या पाऊलवाटा, त्यातील वळणं, खाच-खळगे कसे कळणार? ते आपल्या जिवाला जपूनच पाठलाग करत होते. अण्णांच्या पायाखालच्या वाटा होत्या, रान होतं. त्यामुळे ते सुसाट पळत होते. वाळव्यात आज जिथं हायस्कूल आहे, तिथं पूर्वी सगळं रानजंगल होतं. त्यात घायाळाचे ताटवे, काटेरी फडे, निवडुंगाची झाडे, मोठमोठी वारूळे होती. पोलीस बॅटरीचा वापर करून धावत होते. त्यामुळे आपलं सावज कोणत्या दिशेला जातय याचा त्यांना अंदाज होता. मध्येच हवेत गोळीबार सुरू होता. दरम्यान अण्णा आणि पोलीस यात बरंच अंतर पडलं. ते मारुतीच्या देवळाजवळच्या वडाच्या झाडाआड दडले. बॅटऱ्यांच्या प्रकाशझोतावरून पोलीस इकडेच येत आहेत, हे अण्णांना कळले. थोडासा विचार करून ते देवळाच्या उत्तर बाजूने पुन्हा आपल्या गल्लीत गेले आणि त्यांनी शेजारच्या गणू साळसकरांच्या घराची कडी वाजवली. मध्यरात्र होती. कडीच्या आवाजाने शेवंता दचकून उठली. पुन्हा कडी वाजली तशी करड्या आवाजात शेवंता बोलली, ''कोण हाय?'' ''शेवंताताई, मी नागनाथ. दार उघड आधी. माझ्या मागं पोलीस लागल्यात.'' अण्णा म्हणाले. शेवंतानं दाराच्या फटीतून बाहेर बघून खात्री केली आणि दार उघडलं.

शेवंता तशी सासूरवाशीण. तिच्या लग्नाला सहाच महिने झाले होते. तिला अजून घरच्या माणसांचा पुरता अंदाज आला नव्हता. पण ती मुळात धाडशी होती. शेजारी राहणाऱ्या नायकवड्याचा थोरला मुलगा नागनाथअण्णा मोठा देशभक्त आहे, हे तिला ऐकून माहीत होतं. तो मोठ्या हिमतीनं इंग्रजांशी



लढतोय. अशा अडचणीच्या वेळी या क्रांतिकारकाचे प्राण वाचवणे महत्त्वाचे, असे तिला वाटले. इतक्यात पुन्हा पोलीस गल्लीत आले. नागनाथ अंधारात कुठे गडप झाला, ते त्यांना कळेना. गल्लीतील कुत्री पोलिसांवर भुंकत इकडून तिकडे पळत होती. पोलिसांच्या बुटाचा आवाज येत होता.

इकडे लक्ष्मीबाई दारात थांबून अंदाज घेत होत्या. त्याअगोदरच नगाक्का बाहेर आली होती. तिनं नागनाथअण्णांना साळसकरांच्या घरात शिरताना बघितलं होतं. त्या लक्ष्मीबाईंकडे गेल्या आणि दबक्या आवाजात नगाक्का लक्ष्मीबाईंना म्हणाल्या, ''मी अण्णाला साळसकराच्या घरात शिरताना बघितलं. खरं पोलिसांनी साऱ्या गल्लीला गराडा घातलाय. आता नागनाथ सापडणार असं वाटतंय.''

लक्ष्मीबाई म्हणाल्या, ''अगं मी तर त्याला पश्चिमेकडं पळून जाताना बघितलं व्हतं. आणि तो हिकडं कसा आला?'' दोघी बराच वेळ बाहेरचा कानोसा घेत राहिल्या. लक्ष्मीबाई पुढे म्हणाल्या, ''तू म्हणतीयास तसं खरंच नागनाथ साळसकरांच्यात आसल तर मला काळजी वाटत्या. खरं मला एक सांग पूस पाळायला गेलेली शेवंता परत आल्या काय?'' त्यावर नगाक्का म्हणाली, ''आजच माघारी आल्या.'' लक्ष्मीबाई म्हणाल्या, ''मग काळजी न्हाई. शेवता धाडशीबी हाय आन् युक्तिबाजपण हाय. ती कायतर शक्कल लढवल.''

नागनाथअण्णा पळून पळून दमले होते. त्यांनी शेवंताला सांगितलं, ''पोलीस आणि गावगुंड पाठी लागल्यात. पोलीस निघून जाईपर्यंत मला दडण्याची व्यवस्था कर.'' शेवंता म्हणाली, ''तुम्ही घाबरू नगा. इथं कुणीबी घरात शिरणार न्हाई. मधल्या माळीत मालक झोपल्यात. खुशाल तिथं जाऊन झोपा. मी सोप्यात पहारा देते.'' एवढ्यात घोड्यांच्या टापांचा आवाज आला. काही घोड्यावर बसलेले पोलीस, काही पायदळी पोलीस आणि काठ्याकुऱ्हाडी घेतलेली काही माणसं होती. शेवंता दाराच्या फटीतून अंदाज घेत होती. पोलीस चक्रावून गेले होते. आपलं सावज नेमकं कुठं लपलंय याचा त्यांना अंदाज येत नव्हता. फौजदारानं साऱ्या गल्लीची आणि मुख्य रस्त्याची नाकेबंदी करण्याची ऑर्डर पोलिसांना दिली. साऱ्या घरांना गराडा घालून रात्रभर पहारा करायला सांगितला. दिवस उजाडताच घरात शिरून झडती घेण्याचा त्यांचा बेत असावा. शेवंताच्या अंगणातल्या पिंरणीखाली काही पोलीस बसले होते. काहींचा खडा पहारा सुरू होता.

अण्णाही पोलिसांचा अंदाज घेत सोप्यातच उभे राहिले. ते बसायलाही तयार नव्हते, आन् झोपायलाही तयार नव्हते. शेवटी शेवंता म्हणाली, ''अण्णा, मधल्या घरात फळ्या टाकून माळा केलाय. त्या माळ्यावर जाऊन तुम्ही झोपा.'' मग अण्णा तयार झाले. अण्णा माळ्यावर गेल्यावर शेवंताने शिडी काढून खाली आडवी ठेवली आणि त्यावर सटरफटर सामान टाकून ती दडवली. एका बाजूला तिला वाटत होते, 'आपण जे करतोय ते योग्य आहे काय? आपले सासू-सासरे, नवरा, दीर, जाऊबाई काय म्हणतील?' त्याचवेळी दुसरे मन सांगत होते, 'आपण देशकार्य करतोय. या देशाचा एक जवान वाचवतोय.' विचाराच्या तंद्रीत ती झोपी गेली. पहाटे कोंबड्याच्या बांगेनं तिला जाग आली. आजूबाजूच्या घरांना जाग आली. कुठे कुठे जात्याची घरघर ऐकू येऊ लागली. पोलीस घराबाहेर पडणाऱ्या प्रत्येकाची चौकशी करत होते. अण्णा पोलिसांच्या गराड्यात पुरते सापडले होते. लवकरच सगळ्या घरांची झडती सुरू होणार होती.

एवढ्यात शेवंता दार उघडून बाहेर आली. तिच्या दारातील दोन पोलीस अजून पेंगत होते. ती त्यांच्याकडे गेली आणि म्हणाली, ''अहो पोलिसदादा, आमची एक अडचण हाय.'' पोलिसानं विचारलं, ''काय अडचण हाय.'' पुन्हा शेवंता बोलली, ''आमच्या घरात एक पावणी आलीया. ती वाईच लाजवट हाय. तिला झाड्याला जायचं हाय. खरं ती तुम्हाला लाजत्याबी आन् घाबरत्याबी. आता कसं करावं?''

एक पोलीस म्हणाला, ''अहो ताई आम्हीबी माणसंच हाय. बाईमाणसांची अडचण करून आमाला काय फायदा? तुमी असं करा, गल्लीच्या या बाजूने माळावर जावा.'' शेवंता 'बर' म्हणाली आन् घरात गेली. तिनं अण्णांना सांगितलं, ''अण्णा, धाडस करून निसटला तरच तुम्ही वाचताय. नाहीतर तुम्ही सापडणार. आपण झाड्याच्या निमित्तानं बाहेर पडू या.'' अण्णा तयार झाले. शेवंतानं एक बऱ्यापैकी पातळ आणलं. अण्णांना नेसवलं. जरीची चोळी घालायला दिली. हातभर पदर काढला. पायात चांदीच्या साखळ्या घातल्या. हातात बांगड्या भरल्या, पायात जोडवी, बायकी चप्पल, कपाळाला कुंकवाचा टिळा असा वेश काही मिनिटात केला. अण्णांना त्या वेशात बघून शेवंताला हसू फुटलं. पण सोंग बेमालूम वटलं होतं. या दोन बायका दोन तांबे हातात घेऊन घराबाहेर पडल्या. पोलिसांनी पण बाईमाणसांची अडचण केली नाही. वाट सोडली. पोलिसांच्या बाजूला शेवंता व अलीकडे अण्णा अशी हुलकावणी दिली. पोलिसांच्या गराड्यातून सुटल्यावर अण्णा तडक सांकेतिक स्थळी सुरक्षित ठिकाणी पोहोचले.



अण्णा दूरवर गेल्याचे बघून शेवंता घराकडं आली. तोवर लोकांनी अण्णांना लक्ष्मीच्या देवळाकडं पकडल्याची हूल उठवली. तसे पोलीस लक्ष्मीच्या देवळाकडे उत्तरेला पळाले. इकडे अण्णा दक्षिणेला मल्लिकार्जूनचा डोंगर चढत होते. पोलीस गेल्यावर लक्ष्मीबाई आणि नगाक्का शेवंताकडं गेल्या. तिघी एकमेकींना कडकडून भेटल्या. तिघींचे डोळे पाण्यानं भरले. लक्ष्मीबाई म्हणाल्या, ''शेवंता, तुझ्यामुळंच आज माझा नागनाथ वाचला. वाघीन हाईस तू वाघीन!''

■ ■ ■

प्रकरण बारा

# संसार जोडणाऱ्या क्रांतिमाता

जून १९४४ साली क्रांतिसिंह नाना पाटलांनी प्रतिसरकारची स्थापना केली. प्रतिसरकार म्हणजे गोरगरीब जनतेचं, कष्टकऱ्यांचं सरकार. प्रत्येक गावात काही गावटगे होते, धनदांडगे होते. ते परकीय इंग्रजांना मदत करून गोरगरिबांना नाडत होते. प्रतिसरकारचे मुख्य शत्रू इंग्रज असले तरी इंग्रजांचे बगलबच्चे असणारे सावकार, गावगुंड यांनाही वटणीवर आणणे गरजेचे होते. त्यासाठी प्रतिसरकार चळवळीचा शिस्तबद्ध कार्यक्रम ठरविण्यात आला. त्यामध्ये १) प्रतिसरकार चळवळीसाठी अंतर्गत फौजी संघटना तयार करणे. २) स्वत:चा न्यायनिवाडा राबविणे. ३) जनजागृती घडविण्यासाठी बैठका, सभा घेणे. ४) गाव स्वच्छता मोहीम राबविणे. ५) गावोगाव रस्ते बांधणे. ६) पीक संरक्षणाची व्यवस्था करणे. ७) गाव दांडगे, रान दांडगे, प्रतिष्ठित, सावकार, गावगुंड यांच्यापासून लोकांवर झालेल्या अन्यायाचा न्यायनिवाडा करणे. ८) नवऱ्याने सोडलेल्या मुलींचे नांदणे लावणे. अशा अनेक पातळ्यांवर प्रतिसरकारचे कार्यकर्ते काम करीत होते.

क्रांतिमाता लक्ष्मीबाईंना प्रतिसरकारच्या या धोरणात्मक कार्यक्रमाची फारशी कल्पना नव्हती. परंतु आपल्या मुलांनी म्हणजे नागनाथअण्णा, जी. डी. बापू व नाना पाटील यांनी तयार केलेलं हे सरकार हेच खरं आपलं सरकार आहे. इंग्रजांचं सरकार आपलं नव्हं, याची त्यांना पुरेपूर जाणीव होती. तुरुंगात



राहिल्यामुळे त्यांना एका गोष्टीची जाणीव प्रकर्षानं झाली होती, ती म्हणजे लढणाऱ्या पुरुषांना साथ देणाऱ्या स्त्रियांची गरज आहे. आपला देश, देशाचा राज्यकारभार, न्याय-अन्याय हे कळण्यासाठी शिक्षणाची गरज आहे. म्हणून क्रांतिमातांनी स्त्रियांना एकत्र जमवून चार अनुभवाच्या गोष्टी सांगायला सुरुवात केली. गावातील बायकांच्या अडी-नडीला मदत करणे, स्त्रियांवरील अन्याय-अत्याचाराला विरोध करणे अशा गोष्टी त्या करू लागल्या. त्या सोबतच मुलींना शिकवलं पाहिजे हे समजावून सांगू लागल्या. शिकून शहाणी झालेली मुलगी अधिक चांगला संसार करील, पोराबाळांचं नीट संगोपन करील, चांगले संस्कार करील, असं सावित्रीबाईंचं मुलींच्या शिक्षणासंबंधी असलेल्या विचारांशी नाळ जोडणारे बोल त्या सांगायच्या. सगळ्याच जुन्या रीतिभाती चांगल्या नसतात. ज्या चांगल्या आहेत त्या ठेवायच्या ज्या बदलण्याची गरज आहे त्या सोडायच्या, असं त्या सांगत. त्याबरोबरच सासुरवाशीनींचा होणारा छळ, नवऱ्याने किरकोळ कारणाने घरातून हाकलून देणे या प्रश्नांवरही त्या काम करू लागल्या. अनेक मोडलेले संसार त्यांनी जोडले. सासरचा जाच सहन करणाऱ्या स्त्रियांना हक्काचे व भक्कम माहेर दिले.

असाच एका नवऱ्याने सोडलेल्या मुलीचा प्रसंग. एकदा संध्याकाळी लक्ष्मीबाई सोप्यात दळप नीट करत होत्या. त्याचवेळी रस्त्यावरून एक प्रौढ स्त्री व तरुण मुलगी येत होती. त्या मुलीच्या काखेत लहान मूल होते. कुणाकडे आल्या असाव्यात या बायका, असा विचार लक्ष्मीबाईंच्या मनात आला. तशा त्या दोघी थेट लक्ष्मीबाईंच्या दारातच येऊन उभ्या राहिल्या. ना ओळख, ना पाळक. लक्ष्मीबाईंनी विचारलं, ''कोण पाहिजे? काय काम काढलंय?'' तशी ती प्रौढ स्त्री म्हणाली, ''नागनाथअण्णांच्या आईस्नी भेटायचं हाय. हाईत का त्या घरात?'' त्यांच्याकडं हसून बघत लक्ष्मीबाई म्हणाल्या, ''मीच नागनाथची आई. या, आत या. बसा हिथं सोप्याला. का आला होता?'' तसं त्या बाईचं डोळं पाण्यानं डबडबलं. लक्ष्मीबाईंनी त्यांना तांब्याभर पाणी आणून दिलं आणि त्या म्हणाल्या, ''अजिबात रडायचं न्हाई. काय घडलं ते मन घट्ट करून सांगायचं.''

थोडावेळ मनातल्या मनात शब्दांची जुळवाजुळव करत ती बाई म्हणाली, ''ही माझी थोरली लेक. हीचं लगीन करून देऊन दोन वर्सं झाली. एक मूलबी झालंय. खरं आता तिचा नवरा तिला नांदवायला तयार नाही. गेली तीन-चार

महिने पोरीला इकडंच पाठवून दिलीया. मला ओळीनं तीन मुली आणि मुलगा. हिच्या पाठची लेक लग्नाला आल्या. आता थोरलीचंच नांदणं तुटलं तर बाकीच्या पोरींचं कसं व्हायचं? जिवाला लई मोठा घोर लागलाय. काल माझी नणंद आली होती. तिला समद्या गोष्टी बैजवार सांगितल्या तवा ती म्हणाली, नागनाथअण्णांच्या आईला भेटा. तुमची अडचण दूर होईल. म्हणून आज लगोलग तुम्हाला भेटायला आलो. कायतरी करा माझ्या लेकीसाठी.'' असं म्हणत तिनं कळकळीनं हात जोडलं.

लक्ष्मीबाई म्हणाल्या, ''का हाकललं हिला नवऱ्यानं? हिचं काय चुकलं का?''

ती बाई म्हणाली, ''माझी लेक लई गुणाची हाय. घरातलं, रानातलं सगळं काम करती. पण तिच्या नवऱ्याला गळ्यात सोन्याची चेन आणि हातात अंगठी पाहिजे हाय. आता मी कुठनं देऊ? घरात तर सोन्याचा फुटका मणी नाही. मग जावयाला काय देऊ आणि मुलगीला नांदायला कशी पाठवू? मला तरी कोडंच पडलंय. म्हणून तुमच्याकडं आलोय आईसाहेब.'' लक्ष्मीबाईंनी त्या माई-लेकीची समजूत घातली. मुलीच्या नवऱ्याचं नाव, गाव, पत्ता विचारून घेतला आणि त्या म्हणाल्या, ''तुम्ही बिनधोक घरी जावा. चार-सहा दिवसात मुलीला नांदायला पाठवायचं हाय, अशी मनाशी खुणगाठ बांधून तयारी करा.''

लगतच्या सोमवारी लक्ष्मीबाई त्या मुलाच्या गावी गेल्या. गावात शिरता शिरताच एक क्रांतिमातेला ओळखणारा माणूस भेटला. तो म्हणाला, ''आईसाब, आपण इकडं कुठं?'' तेव्हा लक्ष्मीबाईंनी त्या पोराचं नाव सांगून पत्ता विचारला. त्यांचं घर लांबूनच दाखवा आणि स्वत:च्या कामाला जा, असं सांगितलं. त्यानं लांबूनच घर दाखवलं आणि तो मागल्या पावली निघून गेला.

लक्ष्मीबाई त्या घराच्या दारात गेल्या आणि त्या मुलाचे नाव घेऊन त्यांनी हाक मारली. तसा मुलगा, मुलाचा बाप आणि आई सगळेच बाहेर आले. मुलाचा बाप क्रांतिमातेला ओळखत होता. तो म्हणाला, ''आईसाहेब, तुम्ही आमच्या गरिबाच्या घरी! भाग्य उजाडलं म्हणायचं आमचं.'' आणि पुढं आपल्या बायकोला म्हणाला, ''ये ऐकलंस का? नागनाथअण्णांच्या आई आल्यात. पाण्याचा तांब्या आण बघू.'' तशी मुलाची आई बाहेर आली भरल्याला तांब्या समोर ठेवला. खाली वाकून पाया पडली. म्हणाली, ''काय काम काढलंय आम्हा गरिबाकडं?''



तशा लक्ष्मीबाई रागातच म्हणाल्या, ''तुम्ही दोघं आणि तुमचा तो दिवटा पहिला माझ्या समोर बसा. गरिबाच्या पोरीला छळून बरी मर्दुमकी गाजवता.'' असा दम देत त्या बोलू लागल्या. मुलाच्या बापाला सगळ्या गोष्टी माहीत नव्हत्या. मायलेकरांचं तोंड काळंठिक्कर पडलं. मुलाचा बाप कावराबावरा झाला. तो रागातच आपल्या पोराला व बायकोला म्हणाला, ''आईसाहेब, सांगत्यात ते खरं हाय का?'' दोघंबी खाली मान घालून बसले. बाप पुन्हा म्हणाला, ''असली अवदसा तुम्हाला कशी आठवली? वर सून भांडून माहेरी निघून गेली म्हणून सांगता. तुम्ही घरच्यांनीच मला कमीपणा दिला.''

क्रांतिमाता म्हणाल्या, ''आता माझ्यासमोर भांडून काय उपयोग. अगोदरच पोराच्या संसारात लक्ष घातलं असतं तर आज चार लोकांत हसं झालं नसतं. आता मी काय सांगते ते नीट ऐका. उद्या सकाळी उठून जायाचं आणि सुनेला आपल्या घरी आणायचं. मी ऐतवड्याला राजूताईकडे जाते. आज सोमवार तिथं मुक्काम हाय माझा. उद्या दुपारी मी परत इन तुमच्या घराकडं तवा मला ती पोर घरात हसत-खेळत नांदताना दिसली पाहिजे. सांगून ठेवते.''

सगळ्यांनी मान हालवली. क्रांतिमाता उठू लागल्या. तेव्हा घरातला कर्ता माणूस म्हणाला, ''आईसाहेब, गरिबाघरची भाजी-भाकर खाऊन जावा. जेवायची वेळ झाल्या.'' क्रांतिमाता म्हणाल्या, ''आज तुमच्या घरी पाणीसुद्धा घेणार नाही. उद्या तुझ्या सुनेनं केलेला स्वैपाक खायाला परत येईन. पोटभरून जेवीन.'' असं म्हणत त्या ताडकण उठल्या आणि ऐतवडे गावचा रस्ता धरला.

दुसऱ्या दिवशी क्रांतिमाता परत आल्या तेव्हा ती मुलगी पाण्याचा तांब्या घेऊन स्वागताला हजर होती. जशी लक्ष्मीबाई दारात गेली तसं त्या मुलीनं पायावर पाणी घातलं आणि तिनं मिठी मारली. आनंदानं आणि कृतज्ञतेनं तिच्या डोळ्यात पाणी दाटलं होतं. क्रांतिमातेचं हृदय भरून आलं. गरिबाचा मोडून पडलेला संसार पुन्हा जोडला गेला होता. क्रांतिमातेच्या चेहऱ्यावर वेगळंच समाधान होतं.

■ ■ ■

प्रकरण तेरा

# जनतेची क्रांतिमाता

क्रांतीने भारावलेले दिवस भराभर जात होते. लक्ष्मीबाई सर्व क्रांतिकारकांच्या मागे खंबीरपणे उभ्या होत्या. त्याचवेळी सामाजिक कार्यातही त्यांचे लक्ष होते. सातारच्या प्रतिसरकारचे काम जोरात सुरू होते. त्यांच्या न्यायनिवाड्याचे तर चोहीकडे कौतुक होत होते. सरकारी न्यायालय आणि कचेऱ्या बंद पडायची वेळ आली होती. जनता इंग्रज सरकारच्या न्यायनिवाड्याला कंटाळली होती. त्यामुळे प्रतिसरकारच्या न्यायनिवाड्याला गावागावातून उदंड प्रतिसाद मिळत होता. अनेक गावगुंडांना वठणीवर आणले जात होते. लोक नाना पाटलांच्या प्रतिसरकारला पत्री सरकार म्हणत होते.

प्रतिसरकारचा न्यायनिवाडा बिनचूक होता. वेगवान व बिनखर्चिक न्याय हे त्याचे वैशिष्ट्य होते. मात्र प्रतिसरकारचा न्यायनिवाडा एखाद्या गुंडाने किंवा घमेंडखोर सावकाराने मानला नाही, तर त्याला शिक्षा दिली जाई. संबंधित व्यक्तीचे पाय दोरीने बांधायचे त्या पायात लाकडी बांबू घालून त्याला उलटा टांगायचा. त्याचे तळपाय फुटेपर्यंत फिरवून काठ्या त्याच्या पायावर मारायच्या. तो माणूस मरायचा नाही, मात्र जन्माचा अधू व्हायचा. धड जगताही येत नाही आणि मरणही येत नाही अशी अवस्था व्हायची. म्हणून लोक प्रतिसरकारला पत्री सरकार म्हणायचे.



प्रतिसरकारपर्यंत न पोहोचणारे बायाबापड्यांचे न्यायनिवाडे क्रांतिमाता लक्ष्मीबाई सोडवायच्या. राजूताई पाटील, इंदूताई पाटणकर, नगाक्का, तानुबाई शेळके अशा क्रांतिकारी स्त्रियांना बरोबर घेऊन हा न्यायनिवाडा होत असे. या क्रांतिकारी स्त्रियांचं धाडस बघून अनेक भली माणसं थक्क व्हायची. म्हणायची, ''या माउलीला उदंड आयुष्य लाभू दे. तिच्या हातून अशीच गोरगरिबांची कामं होऊ देत.'' त्यामुळे लक्ष्मीबाई फक्त दोन मुलांच्या आई न राहाता साऱ्या समाजाच्या क्रांतिमाता झाल्या. अनेकांनी त्यांना धर्माची आई मानलं. समाजातील गोरगरिबांना काही दु:खलं-खुपलं तर मनातून सगळं सांगावं असा एक हळवा कोपरा क्रांतिमातेच्या रूपानं समाजाला मिळाला.

■ ■ ■

प्रकरण चौदा

## जीवाला चटका

एकोणीसशे शेहचाळीस साल उजाडलं. स्वातंत्र्य जवळ आल्याची चर्चा जोरात होती. ते ऐकून प्रत्येकाच्या मनाला समाधान वाटत होतं. पण हे समाधान प्रत्येकाच्याच वाट्याला येतं असे नव्हे. प्रतिसरकारच्या क्रांतिकारकांचं इंग्रजांशी छुपं युद्ध चालूंच होतं. त्यामुळे क्रांतिमाता लक्ष्मीबाईंच्या मनात नेहमी धाकधूक असायची. कधी, कुठून, कशी बातमी येईल सांगता यायचं नाही. १९४६ च्या फेब्रुवारी महिन्यातला बुधवार होता. तांबडं फुटता फुटता शिराळ पेट्यातला एक घोडेस्वार दारात आला. त्याच्या अंगावरची कपडे रक्तानं भरली होती. त्याला बघताच लक्ष्मीबाईंचं काळीज चरकलं. कायतरी विपरित घडलं असणार याचा अंदाज आलाच.

तेवढ्यात तो घोडेस्वार म्हणाला, ''आईसाहेब, घात झाला. सोनवडच्या जंगलात एका ओढ्याच्या काठावर इंग्रजांचे पोलीस आणि अण्णांचे साथीदार यांच्यात आमने-सामने मोठी लढाई झाली. त्या लढाईत आपले दोन क्रांतिकारक किसन अहिर पैलवान आणि पंजाबचे नानकसिंग कामी आले, शहीद झाले.'' हे ऐकताच क्रांतिमातेला धक्का बसला. डोळ्यात अश्रूंचा पूर दाटला. त्या धाय मोकळून रडू लागल्या. शेजारच्या आया-बाया जमा झाल्या. नगाक्का आल्या. क्रांतिमाता म्हणाली, ''माझी दोन वाघावानी असणारी पोरं गेली. आता मी त्यांना कुठं बघू. किसन अहिर, नानकसिंग मी तुम्हाला कुठं शोधू.'' हळूहळू



सगळ्यांना झाल्या गोष्टीचा उलगडा झाला. आख्खा वाळवा गाव दु:खात बडून गेला. तो शहीद दिवस होता मंगळवार दि. २५ फेब्रुवारी, १९४६.

अजून हुतात्मा किसन अहिर व हुतात्मा नानकसिंग यांच्या दु:खाची जखम सुकली नव्हती. त्या घटनेला पुरते तीन महिने व्हायचे होते. तोपर्यंतच दुसरी बातमी क्रांतिमातेच्या कानावर आली. पडवळवाडीचे बाबूराव कोकाटे व बॅक्युडचे व्ही. एल. पाटील यांचे धाकटे बंधू प्रताप पाटील हे दोघे ऐतवाड्याला राजूताई पाटील व नागनाथअण्णा यांना भेटण्यास गेले. रात्रीचे जेवणखाण झाल्यावर अण्णा मीटिंगसाठी गेले. हे दोघे राजूताईच्या घरी माडीवर झोपले. क्रांतिवीर नागनाथअण्णा व वाय. सी. पाटील मीटिंग संपल्यावर नेहमीप्रमाणे ताईच्या माडीवर झोपायला जाणार होते. परंतु ऐनवेळी एकतर मीटिंगला उशीर झाला. तशातच अण्णांना काय वाटले कुणास ठावूक ते दुसरीकडे झोपायला गेले. त्याच रात्री अण्णांच्या शत्रूंनी अण्णांचा घात करायचा प्लॅन केला. त्यानुसार ते अण्णा व वाय. सी. पाटील यांना ठार मारण्यासाठी ताईंच्या माडीवर गेले. तिथे पाहतात तर दोन मुले झोपलेली. म्हणून त्यांनी बेत बदलला. ते जिना उतरून खाली आले. परंतु वशीचे शिवा महार यांची बुद्धी पलटली. त्यांनी झोपल्या जागी त्या मुलांगा गोळ्या घालून ठार केले. ती तारीख होती २२ मे, १९४६. अशा घटनांना, प्रसंगांना क्रांतिमाता धीराने तोंड देत होत्या. क्रांतिकारकांना आधार देत होत्या. संघर्ष अखंड चालूच होता.

■ ■ ■

प्रकरण पंधरा

# अन्नदात्री क्रांतिमाता

क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड यांनी 'पेटलेले पारतंत्र्य आणि धुमसते स्वातंत्र्य' या पुस्तकात स्वातंत्र्याची धगधगती कहानी मांडली आहे. या ग्रंथात त्यांनी क्रांतिमाता लक्ष्मीबाई यांच्याबद्दलच्या आठवणी मांडल्या आहेत. या ग्रंथाच्या पृ. क्र. ७०/७१ वर ते लिहितात, ''कुंडल बँक लुटली आणि मला गाव पारखे झाले. मी गाव सोडले आणि वाळवा गावात आलो. मे महिना. वाळव्याचे अफाट शिवार पसरलेले. कुठे विहीर नाही नि झाडंही तुरळक. त्या रानात आमचा मुक्काम होता तो फक्त माळभागावर. नागनाथची आई आणि त्यांची मैत्रीण नगाक्का या दोन स्त्रिया आमच्या पाठी भक्कमपणे उभ्या होत्या. त्या माउल्या आम्हा पोरांभोवती रात्रंदिन घुटमळायच्या.''

नागनाथची आई मध्यम वयाची, मजबूत प्रकृतीची आणि करारी अशी ही माता. तिला स्वातंत्र्य ही चीज किती समजली होती माहीत नव्हते. पण आपली पोरं करतायत ते बरोबर आहे. इंग्रजी सत्ता गेली पाहिजे. त्यासाठी पोरांचा प्राण गेला आणि नवऱ्याचा प्रपंच लयाला गेला तरी चालेल अशी जिद्दीची ही माता. तिची मैत्रीण नगाक्का एक काळी सावळी, नीट नाका-डोळ्यांची नि सडसडीत बांध्याची. ५०-५१ वर्षांची आक्का. तिच्या चेहऱ्यावर वात्सल्य व निधडेपणाचं तेज होतं. तिचे आम्हा दोघा मुलांवर अत्यंत प्रेम व विश्वास. आई आणि या आक्का यांना स्वत:चा प्रपंच सुचतच नव्हता.



आम्ही त्या रखरखीत वाळव्याच्या शिवारात रहात असू. रात्री गावाकडं येत असू. पण फटफटीत व्हायच्या आत शिवार गाठत असू. शिवारात पाणी नसायचं. उन्हाळी पाऊस पडलेला असायचा. कुठंतरी तालीत पाणी साठलेलं असायचं. सकाळचा प्रात:विधी उरकलेला असायचा. एका तालीच्या टोकाला दिवस चढत जायचा दूर उन्हाच्या झळात एक शिडशिडीत बांध्याची स्त्रीची आकृती दिसायची. डोईवर भाकऱ्याची चावड आणि काखेत ताकाचा मोगा. ती अन्नदाती प्रेमळमूर्ती मग पावला पावलाने स्पष्ट होत जायची. जवळ आल्यावर ती सावळीमूर्ती प्रेमळ हसायची. आम्ही लहान मुलाप्रमाणे चेकाळायचो. आक्का आमच्याजवळ यायची. डोईवरची भाकरीची चवड खाली यायची. ताकाचा मोगा भुईवर वसायचा आणि आक्का आम्हा पोरांना कवटाळायची. अक्का कोण? तिचे आम्ही कोण? पण तिचे विशाल हृदय अफाट प्रेमाने आम्हाला न्हाऊ घालायचे. तिला स्वातंत्र्याची काय कल्पना. पण स्वातंत्र्य म्हणजे काहीतरी भले दिवस आणणारे आहे. आपली पोरं (जी. डी. बापू, नागनाथअण्णा) नाना पाटील, गांधी महाराज करतात ते बरोबरच आहे. एवढीच तिची श्रद्धा.''

पुढे पृ. क्र. ११९ वर जी. डी. बापू लिहितात, ''नागनाथची आई एक बहाद्दर माता. तिने तिचा मुलगा व मी दोघांना आपल्या धीरगंभीर कुशीत दोन वर्षे सांभाळले. त्या मातेची मिळणारी ऊब माझ्या जीवनातून त्या काळी संपली. पण नागनाथांनी इतर दर्जेदार कार्यकर्ते साथीला घेऊन देदीप्यमान व भूमिगतांच्या आकलनशक्ती पलीकडचे कार्य घडविले. त्याची नोंद मला घेणे भाग आहे. सातारच्या स्वातंत्र्य लढ्याचे ते सोनेरी पान आहे.''

■■■

प्रकरण सोळा

# अनोखा लग्नसोहळा

१९४६ च्या सुरुवातीपासूनच स्वातंत्र्य जवळ आलंय याची चर्चा भूमिगतांमध्ये होती. परंतु प्रतिसरकारचे नेते क्रांतिसिंह नाना पाटील आणि त्यांचे दोन हात क्रांतिवीर नागनाथअण्णा व क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड या नेत्यांना त्याची शाश्वती वाटत नव्हती. त्यांनी एकत्रितपणे निर्णय घेतला की इकडे स्वातंत्र्य बघायचं आणि मगच हातातलं हत्यार खाली ठेवायचं. हा क्रांतिकारकांचा निर्णय हा हा म्हणता सातारच्या सर्व भूमिगतांना समजला. त्यांनी क्रांतिसिंहांच्या या निर्णयाचे स्वागत केले. राजूताई पाटील-बिरनाळे अजूनही खांद्याला बंदूक लावून गावोगावी न्यायनिवाड्याच्या कामात व्यस्त होत्या. तशी गावोगावची गुंडगिरी बऱ्याच प्रमाणात संपुष्टात आली होती. परंतु सावकारी फाशात अडकलेली जनता अजूनही त्यांच्या दबावाखाली होती. हा फास सोडवायचे काम राजूताई सहकाऱ्यांच्या माध्यमातून करत होत्या. त्यात त्यांना चांगलेच यश येत होते. सावकारांनी केलेले खोटेनाटे दस्तावेज त्यांच्या तिजोरीतून काढून त्यांची होळी केली जात होती. क्रांतिमाता लक्ष्मीबाई, इंदूताई पाटणकर आजूबाजूच्या खेड्यातून त्यांना मदतीचा हात देत होत्या. अजूनही क्रांतिकारकांना जेवण पोहोचविणे आणि त्यांची हत्यारे सांभाळणे या कामातून क्रांतिमाता मुक्त झालेल्या नव्हत्या.

१९४२ च्या क्रांतिनंतरचा चार वर्षांचा काळ लोटला. आईंनी आता पन्नाशी गाठली होती. तर बापूंनी पन्नाशी ओलांडली होती. साहजिकच त्यांच्या डोक्यात



मुलांच्या लग्नाचा विषय घोळत होता. बापूंनी आपल्या पत्नीजवळ नागनाथच्या लग्नाचा विषय काढला. तेव्हा त्या म्हणाल्या, ''त्याला विचारा. तो तयार असला तर यंदाच त्याचं लग्न उरकून टाकू. पुढच्या वर्षी शामरावचं करता येईल.'' बापूंनी नागनाथजवळ लग्नाचा विषय काढला तेव्हा ते म्हणाले, ''बापू, मी चळवळीत पडलो त्याच वेळी ठरवलंय आणि तुम्हालाबी बोललोय, आपला देश स्वतंत्र झाल्याशिवाय मी लग्न करणार नाही. तवा माझ्या लग्नाचा विचार तूर्त बाजूला ठेवा आणि शामरावचं लग्न करा.''

बापू म्हणाले, ''आरं नागनाथ, थोरल्याचं ठेवून धाकट्याचं लग्न करायचं म्हणजे मला लोक काय म्हणतील?'' नागनाथअण्णा म्हणाले, ''त्याची तुमी काळजी करू नका. ते सगळं माझ्यावर सोडा.'' बापूंना माहीत होतं, काय जरी सांगितलं तरी नागनाथ ऐकणार नाही. म्हणून त्यांनी शामरावसाठी स्थळ बघायला सुरुवात केली. बापूंना येडेनिपाणीच्या हंबीर पाटलांची चुलत बहीण हौसाबाई पसंत पडली. स्थळ जुन्या पावण्यालगतचं होतं. बापू, आई व इतर मंडळी मुलगी बघायला म्हणून गेले ते लग्न ठरवूनच आले. लग्नाचा बार उडवून दिला. धुमधडाक्यात लग्न झालं. लग्नात आहेर म्हणून भांडीकुंडी, कपडे, रोकड रक्कम १००० रु. जमा झाले. नागनाथअण्णा बापूंना म्हणाले, ''भांड्याकुंड्याचा व कपड्यांचा जो आहेर तुम्हाला जमलाय तो तुमच्या पावण्यापैचा आहे. तो तुम्ही ठेऊन घ्या. परंतु आहेराची रोख जमलेली जी एक हजार रुपयांची रक्कम आहे ती माझ्या मित्रांकडून मिळाली आहे. ती रक्कम माझ्याकडे सुपूर्द करा. आम्ही विद्यार्थी कार्यकर्ते रयत शिक्षण संस्थेला जो एक लाखाचा निधी देणार आहोत, त्या निधीसाठी ही आहेराची रक्कम आपण देऊ या. आई-बापूंनी क्षणाचाही विलंब न लावता त्याला मान्यता दिली. घरच्या लग्नकार्यातही समाजहिताचा निर्णय घेणारा आपला मुलगा मोठ्या मनाचा आणि थोर विचाराचा आहे, याचा त्यांना अभिमान वाटला. असा पुत्र पोटी आला, आपण धन्य आहोत, अशी भावना मनात निर्माण झाली. समाजाने असा आदर्श जोपासला पाहिजे, असे त्यांना वाटले. अनायसे लग्नाला निधी समितीचे सदस्य बापूजी आले होते. त्यांच्याकडे ती आहेराची रक्कम देणगी म्हणून सुपूर्द करण्यात आली. पुढे हेच बापूजी साळुंखे विवेकानंद शिक्षण संस्थेचे प्रवर्तक झाले. शिक्षण महर्षी झाले.

■ ■ ■

प्रकरण सतरा

# स्वातंत्र्याची चाहूल

१९४६ मध्ये सर्वत्र स्वातंत्र्याचा बोलबाला होता. लवकरच इंग्रज भारत सोडून जाणार अन् देशाला स्वातंत्र्य मिळणार अशी चर्चा होती. परंतु सातारा अजूनही धगधगताच होता. मुंबई प्रांताचे मुख्यमंत्री बाळासाहेब खेर यांच्या मंत्रिमंडळाने २६ एप्रिल, १९४६ रोजी सातारा सोडून इतर सर्व जिल्ह्यातील भूमिगतांची अटक वॉरंटे रद्द केली. त्यांना मुंबईच्या शिवाजी पार्क मैदानावर प्रकट व्हायला सांगितलं.

क्रांतिसिंह नाना पाटलांनी खेर मंत्रीमंडळाच्या या आवाहनाविरुद्ध प्रतिआव्हानाची डरकाळी फोडली. ते म्हणाले, ''सातारा जिल्ह्यातील सर्व भूमिगतांची वॉरंटे रद्द केल्याशिवाय मी आणि माझे इतर जिल्ह्यातील सहकारी प्रकट होणार नाहीत.'' क्रांतिसिंहांच्या या ठाम भूमिकेसमोर सरकारला नमते घ्यावे लागले. सातारा जिल्ह्यातील सर्व भूमिगतांचे वॉरंटे मागे घ्यावे लागले. परकीय सत्तेला नमविणारे सातारकर स्वकीय सरकारला घाबरतील काय? असा सवाल लोक करीत. पुढे क्रांतिसिंह नाना पाटलांनी सातारा जिल्ह्यातील सर्व क्रांतिकारी भूमिगतांची मीटिंग बोलावली. त्या मीटिंगमध्ये ठरले की सर्वांनी दि. ५ मे, १९४६ रोजी कोरेगाव ता. कराड येथे जाहीररित्या प्रकट व्हायचे. त्यासाठी मिरज स्टेशनातून रेल्वेत बसून सर्वांनी कोरेगावमध्ये एकत्र जमायचे. त्यावेळच्या पहिल्या सत्कारसमारंभामध्ये नाना पाटील आपल्या सहकाऱ्यांसह प्रकट झाले. कार्यक्रमाला प्रचंड जनसागर लोटला होता. या क्रांतिकारकांना बघून जनसमुदायाच्या आनंदाला उधाण आले. या क्रांतिकारकांचे न भूतो न भविष्यती असे उत्स्फूर्त स्वागत झाले. पुढे महाराष्ट्राच्या भागाभागात, गावागावात भूमिगतांचे सत्कार समारंभ सुरू झाले. क्रांतिवीर नागनाथअण्णा भूमिगतांच्या, क्रांतिकारकांचे सोबतच सत्कार समारंभाला जात. मात्र त्याचवेळी आपल्या चार जिवाभावाच्या सहकाऱ्यांना स्वातंत्र्याच्या अग्निकुंडात आहुती द्यावी लागली याचे अण्णांना दुःख होते. म्हणून ते स्टेजवर जाऊन हार-तुरे स्वीकारत नव्हते. स्टेजच्या मागच्या बाजूस थांबून ते लोकांच्या शुभेच्छा स्वीकारायचे. आम्ही जनतेच्या आनंदात सहभागी आहोत असे म्हणायचे. अशा अनेक सत्कार समारंभात क्रांतिमाता लक्ष्मीबाई, राजूताई, इंदूताई, नगाक्का हजर असायच्या.

■ ■ ■

प्रकरण अठरा

# स्वातंत्र्याची रम्य पहाट

स्वातंत्र्यप्रिय भारतीय जनता, भूमिगत क्रांतिकारक स्वातंत्र्यसैनिक आणि हुतात्म्यांची मनीषा पुरी होण्याची वेळ जवळ आली होती. १५ ऑगस्ट, १९४७ रोजी देशाचा पहिला स्वातंत्र्यदिन मोठ्या उत्साहात साजरा होणार होता. स्वातंत्र्याच्या जल्लोषी स्वागताची तयारी लोकांनी सुरू केली होती. जो तो आपापल्या कल्पनेनुसार स्वातंत्र्याच्या स्वागताची तयारी करत होता.

१४ ऑगस्ट, १९४७ च्या मध्यरात्री बरोबर १२.०० वाजता सुमारे दीडशे वर्षे दिल्लीच्या लाल किल्ल्यावर फडकत असलेले इंग्रजी सत्तेचे निशाण 'युनियन जॅक' हे त्या वेळचे शेवटचे व्हाईसराय लॉर्ड माऊंटबॅटन यांच्या हस्ते खाली उतरविण्यात आले. आणि मध्यरात्री १२ वा. १ मिनिटांनी म्हणजे १५ ऑगस्ट, १९४७ रोजी भारताचे लाडके नेते आणि स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या हस्ते दिल्लीच्या लाल किल्ल्यावर आपला तिरंगा राष्ट्रध्वज फडकवण्यात आला. दिल्लीत लाल किल्ल्यासमोर लाखो लोकांच्या जनसागराने ध्वजास राष्ट्रीय सलामी दिली. सर्वांचे डोळे आनंदाश्रूने भरून आले. सर्वांचे मन भारावून गेले. वाटले या देशाच्या राष्ट्रध्वजावर हुतात्म्यांनी फुलांचा वर्षाव केला असेल. या भारताच्या राष्ट्रध्वजाला लॉर्ड माऊंटबॅटन यांनीही सर्वांबरोबर राष्ट्रीय सलामी दिली.

१५ ऑगस्टची पहाट होता होता तांबडं फुटलं. पूर्व दिशेच्या लालीतून



स्वातंत्र्यरवीच्या सोनेरी नवकिरणांनी भारतभूमी तेजस्वी दिसू लागली. भारताच्या कानाकोपऱ्यात, खेड्यापाड्यात तिरंगा ध्वज डौलात फडकला. त्यावेळच्या ३३ कोटी जनतेने राष्ट्रध्वजाला अभिवादन केले. ''भारतमाता की जय!'' अशा घोषणा दुमदुमल्या.

क्रांतिवीर नागनाथअण्णांनी आपल्या सहकाऱ्यांसह आठ-दहा ठिकाणी स्वातंत्र्य दिन सोहळ्यात सहभाग घेतला. जमेल त्या ठिकाणी भाषणे केली.

क्रांतिमाता लक्ष्मीबाई या वाळव्यातील स्वातंत्र्य सोहळ्यास हजर राहिल्या. त्यांच्या एका डोळ्यातून आनंदाश्रू व दुसऱ्या डोळ्यातून दुःखाश्रू येत होते. हुतात्मा किसन अहिर, हुतात्मा नानकसिंग, हुतात्मा बाबुराव कोकाटे, हुतात्मा प्रताप पाटील यांच्या आठवणीने अनेकांचे हृदय भरून आले. या सुखदुःखाला भिडताना क्रांतिमाता म्हणाल्या, ''माझे राहिलेले आयुष्यही प्रपंचापेक्षा सामाजिक कामात घालवणार आहे.''

■ ■ ■

प्रकरण एकोणीस

# फाळणीची वेदना

भारताच्या स्वातंत्र्याला फाळणीचा शाप मिळाला. अखंड हिंदुस्थानमधून भारत व पाकिस्तान असे दोन देश जन्मले. मात्र या फाळणीतून हिंदू-मुस्लिमांचे दंगे भडकले. उत्तरेकडून दंगलीच्या येणाऱ्या बातम्या काळजाचा थरकाप उडवत होत्या. डोके सुन्न होत होते. मेंदू बधीर होत होता. लाखो हिंदू-मुस्लीम परस्परांचे खून पाडत होते. दोन्ही समुदायातील स्त्रियांची विटंबना माणुसकीला काळिमा फासणारी होती. काही लहान मुलांना डोक्यावर, देहावर खिळे ठोकून मारले. काहींना आकाशात फेकले आणि भाल्याच्या टोकावर झेलून मारले. काही पालकांना स्वत:च्या डोळ्यासमोर हे अमानुष कृत्य पहावे लागले. काही मातांनी आपली छोटी मुले धावत्या आगगाडीच्या डब्यात फेकली. 'जा पाखरा, वणव्यातून या, धरतीमाता, तुझी आई रे' ही भावना त्या माता-भगिनींची होती.

म. गांधींचे हृदय या दंगलीने करपून गेले. स्वातंत्र्याच्या आनंदापेक्षा दंगली शांत करण्यासाठी ते या भागात वणवण भटकले. कसलं हे स्वातंत्र्य? भारतमाता स्वतंत्र करण्यासाठी जेवढी माणसं मेली नाहीत त्याच्या कितीतरी पटीनं माणसं या दंगलीत मेली. नुकतीच उमललेली कितीतरी फुलं या दंगलीत चुरगळली, हे ऐकून भारतीयांची मनं जळत होती, तर गोऱ्याच्या मनात कुटिल हास्य उमलत होते. त्यांच्या कारस्थानाला अपेक्षेपेक्षा जास्त यश लाभले होते. एक देश स्वतंत्र होता होता, समोर एक बलाढ्य शत्रूही निर्माण करत होता. या सगळ्या



गोष्टींनी क्रांतिमाता लक्ष्मीबाईही कळवळल्या.

त्या फाळणीनंतर पाकिस्तानातून भारतात येणाऱ्या 'निर्वासितांचा प्रश्न' निर्माण झाला. त्यांना अन्न, वस्त्र, निवारा देणेही मुश्किल झाले. इतक्या मोठ्या संख्येने निर्वासित आले. त्यातील अनेक छावणीमध्येच मेले. काहींना नीटपणे अग्निही मिळाला नाही. स्वातंत्र्याने भारत व पाकिस्तान, हिंदू व मुस्लीम यांच्यात हाडवैर निर्माण केले.

पारतंत्र्य संपले. स्वातंत्र्य आले. एक एक दिवस नजरेआड जात होता; परंतु इथल्या सर्वसामान्य कष्टकरी बहुजनांची परिस्थिती बदलत नव्हती. ब्रिटिशांबरोबर तडजोड करून मिळवलेले हे स्वातंत्र्य क्रांतिकारकांना मान्य नव्हते. क्रांतिकारकांच्या कल्पनेतले स्वातंत्र्य अजून अवतरायचे होते. बदल एवढाच गोरे गेले, काळे आले. धोरण तेच भांडवलशाहीच्या हिताचे आणि राजेरजवाड्यांच्या तनख्याच्या बाजूचे. गोरगरीब जनतेचे काय? हा प्रश्न क्रांतिमातेलाही सतावत होता.

एक दिवस लक्ष्मीबाई आठवड्याचा घर बाजार आणून अंगणात बसल्या होत्या. त्यावेळी अण्णा त्यांच्याजवळ जाऊन बसले आणि म्हणाले, ''आई, मी कोल्हापूरला परत शिक्षणासाठी जायचे ठरविले आहे. प्रथम मॅट्रिकची परीक्षा द्यायची. मग कॉलेज शिक्षण पूर्ण करून हुतात्मा किसन अहिरांच्या नावे वाळव्यात एक माध्यमिक शाळा काढायची. गोरगरिबांच्या मुलांसाठी हुतात्मा नानकसिंग यांच्या नावे मोफत वसतिगृह सुरू करायचे या दोन कामाबरोबर मागेपुढे लोकांच्या मनाची तयारी करून मुलींसाठी स्वतंत्र जिजामाता विद्यालय सुरू करायचे. तसेच सावित्रीबाई फुलेंच्या नावे मुलींसाठी मोफत वसतिगृह काढायचे. असा मी विचार केला आहे.'' क्रांतिमातेने अण्णांना आशीर्वाद दिला. कायम सगळ्या कामात पाठीशी राहीन असे प्रोत्साहन दिले. अण्णांना बरे वाटले. ते नव्या उत्साहात कोल्हापूरला गेले. मॅट्रिकची परीक्षा चांगल्या मार्कांने पास झाले. कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजमध्ये नाव घातले. वर्षभर चांगला अभ्यास केला. परीक्षा जवळ आली होती. त्याचवेळी एक संकट उभे राहिले.

पश्चिम महाराष्ट्रात राजकारण्यांमध्ये मोठा वाद चालू होता. मी मोठा की तू मोठा? या वादातून हाणामाऱ्या, भांडण व खून पडत होते. यातून अशांत झालेले वातावरण शांत करावे या हेतूने यशवंतराव चव्हाणांनी मुंबईला मोरारजी

देसाई यांच्याकडे साताऱ्यातील निवडक क्रांतिकारकांची बैठक बोलावली. या बैठकीला पाटील, किसन वीर, डी. जी. देशपांडे, धन्वंतरी वैद्य, कासेगावचे शेख काका, पांडू बोराटे, बाबूजी पाटणकर आदी क्रांतिकारक हजर होते. या बैठकीत नागनाथ अण्णांचा मोरारजी देसाईंशी वाद झाला. त्याचा राग मनात धरून नागनाथअण्णांचे पकड वॉरंट काढण्यात आले. जो बलाढ्य इंग्रजांना घाबरला नाही तो स्वकीय पोलिसांना कसा घाबरेल? पण ही बातमी सर्व क्रांतिकारकांमध्ये पसरली. मोरारजी देसाईंनी खुनशी दुष्ट विचाराने हे वॉरंट काढले आहे, असे सर्वांना वाटले. यामुळे नागनाथअण्णांचे पुढचे शिक्षण थांबले. त्यांनी अन्यायी वॉरंटला भीक घातली नाही. उलट ते स्वातंत्र्य लढ्यात शहीद झालेल्या सहकारी क्रांतिकारकांच्या स्मारकांच्या कामात व्यस्त झाले. त्यासाठी निधी जमविण्याचे काम नेटाने करीत होते. त्याचबरोबर शेतमजूर, मैलकुली, कष्टकरी शेतकरी, कामगार यांच्या प्रश्नांत लक्ष घालत होते. अशीच एकदा कामगारांची एक बैठक किर्लोस्करवाडीला होती. अण्णा बैठकीला गेले. बैठक सुरू झाली आणि पोलिसांनी छापा टाकला. अण्णांना पकडले व सरळ सांगलीला जेलमध्ये कडेकोट बंदोबस्तात डांबून ठेवले.

अण्णांना किर्लोस्करवाडीत पोलिसांनी पकडल्याची बातमी कामगारांकडून हा हा म्हणता वाऱ्यासारखी वाळवा तालुक्यात आणि शिराळा पेट्यात पोहोचली. सारा सातारा पेटला. त्यावेळी लक्ष्मीबाईंच्या मनाची तगमग होत होती. परंतु त्या एकट्या काय करू शकत होत्या? परंतु जनता एकत्र आली. वाळवा तालुका, शिराळा पेट्यातील घरटी एक शेतकरी सांगली कलेक्टर कचेरीवर चालून गेला. ते आंदोलन, तो मोर्चा स्वयंस्फूर्त होता, त्यामध्ये कुणीही नेता नव्हता. तरी जनतेने क्रांतिवीर नागनाथअण्णांना विनाअट सोडून देण्यास सरकारला भाग पाडले. त्यावेळी सातारा जिल्ह्याने सांगितले, नागनाथअण्णा आमचा नेता आहे. अण्णांना इजा म्हणजे आमच्या काळजाला इजा असे म्हणणारी ही सातारी इनामी जनता होती.

■■■



प्रकरण वीस

# हुतात्म्यांचा स्मृतिदिन

भारतीय स्वातंत्र्याकडून सर्वसामान्य लोकांची अनेक स्वप्ने होती. देश स्वतंत्र झाला की, सर्वांना शिक्षण मिळेल, रोजगार मिळेल. गरिबी, अन्याय, विषमता दूर होईल. परंतु तसे घडले नाही. लोकशाही स्वीकारली गेली, परंतु ती रुजवण्यासाठी व टिकवण्यासाठी शिक्षणाच्या सार्वत्रिकरणाची गरज होती. हे ओळखून नागनाथअण्णांनी आपल्या शहीद क्रांतिकारक सहकाऱ्यांची जिवंत स्मारके उभारण्याचे ठरविले. अर्थातच त्याला समाजाचा, गावाचा पाठिंबा आवश्यक होता. त्या विषयावर चर्चा घडविण्यासाठी कार्यकर्ते व गावकऱ्यांची एक व्यापक मीटिंग बोलवायचे ठरले. अनायसे स्वातंत्र्यानंतरचा हुतात्म्यांचा पहिला स्मृतिदिन २५ फेब्रुवारी, १९४८ रोजी येत होता. हुतात्मा किसन अहिर व हुतात्मा नानकसिंग यांचा स्मृतिदिन मोठ्या प्रमाणात साजरा करायचा व त्यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून साने गुरुजींना बोलवायचे ठरले.

संपूर्ण वाळवा तालुका व शिराळा पेट्यातील क्रांतिकारक कार्यकर्ते, ग्रामस्थ या स्मृतिदिनाला मोठ्या संख्येने हजर होते. स्त्री-पुरुषांचा जनसागर लोटला. त्यावेळी बोलताना क्रांतिमाता लक्ष्मीबाई स्टेजवरच्या मंडळींकडे हात करून म्हणाल्या, ''मला ह्यांच्यागत चांगलं बोलायला सुधरत नाही. पण मी तुम्हाला येवढंच सांगते, तुम्ही समदीजन किसन पैलवानची आणि नानकसिंगाची आठवण ठेवून इथवर आलात. त्यामुळं ह्या दोघांवरचं तुमचं प्रेमबी मला दिसलं. त्याचप्रमाणं तुमचा त्यांच्याबद्दलचा इमानीपणाही दिसला. तुम्ही सर्वजण सानेगुरुजी, अण्णा

जे काय ठरवाल, जे कार्यक्रम हातात घ्याल त्यास माझा आशीर्वाद आहे. नुसता आशीर्वाद नाही तर जिथं जिथं माझी तुम्हाला गरज लागेल तिथं मी तुमच्या पाठीशी खंबीरपणानं उभी आहे.'' क्रांतिमातेच्या साध्यासोप्या बोलीला सभेनं जोरदार टाळ्या वाजवून दाद दिली.

क्रांतिवीर नागनाथअण्णा म्हणाले, ''स्वातंत्र्य मिळून सहा महिने झालेत. या स्वातंत्र्याचा चेहरामोहरा आपण सर्वांनी ओळखलाय. हे खरंखुरे स्वातंत्र्य नाही. हुतात्मा किसन अहिर, हुतात्मा नानकसिंग यासारख्या अनेक हुतात्म्यांनी असल्या बेगडी स्वातंत्र्यासाठी आपलं रक्त सांडलं नाही. आपण सर्व एक ध्यानात ठेवा, हुतात्म्यांच्या मनातलं जे स्वातंत्र्य होतं त्या स्वातंत्र्याचे स्वराज्य करण्यासाठी सर्वांनी कटिबद्ध राहू या. या हुतात्म्यांची मनीषा पूर्ण करण्यासाठी आपण साऱ्यांनी त्याचा पाठपुरावा करू या. त्या कार्याचा एक भाग म्हणून लवकरच हुतात्म्याची जिवंत स्मारकं, जी लोक उपयोगी असतील त्याच्या उभारणीच्या कामाला तातडीनं लागू या. तुम्ही साने गुरुजींच्या भाषणासाठी उत्सुक आहात. मी इथं थांबतो.''

साने गुरुजी आपल्या भाषणाला सुरुवात करताना म्हणाले, ''नागनाथअण्णा, तुमच्या आईना बघून मला माझ्या आईची आठवण झाली. प्रत्येक कामाच्या, कार्याच्या पाठीशी तुमच्या आई असतात. त्या तुमच्या गुरू आहेत. तशीच माझी आई ही माझी गुरू होती. आज जो मी तुमच्या पुढे साने गुरुजी म्हणून उभा आहे, त्या गोष्टीचे श्रेय माझ्या आईचे आहे. तिने माझ्यावर जे संस्कार केले, त्यामुळेच माझ्याबद्दल सामान्य लोकांच्यात प्रेम निर्माण झाले. माझ्या बालमनावर जे विविध पैलू उठले, त्यातूनच माझ्या जीवनाचा विकास झाला. असो, आईच्या आठवणींमुळे मी बाजूला गेलो. माफ करा. क्रांतिकारक हुतात्मा किसन अहिर व हुतात्म नानकसिंग यांच्या स्मृतिदिनाला आपण इतक्या मोठ्या संख्येने हजर आहात हे बघून माझ्या मनाला आनंद झाला. हा स्मृतिदिन हुतात्म्यांची भारतभूमी सुजलाम् सुफलाम् करण्याची स्वप्ने पूर्ण करण्यासाठी कटिबद्ध होण्यासाठी असावा. सामान्य गोरगरीब, दलित जनतेच्या निदान अन्न, पाणी, निवारा, शिक्षण व रोजगार एवढ्या मर्यादित गरजा तरी आपण पूर्ण केल्या पाहिजेत. त्यासाठी आपण हुतात्म्यांना अभिवचन देऊ या.'' सगळ्यांच्या भाषणानंतर राष्ट्रगीत व वंदेमातरम् झाले. भारावलेल्या मनाने लोक गावोगाव, घरोघर परतले. हुतात्म्यांचा स्मृतिदिन हा संकल्पदिन ठरला.

■■■



प्रकरण एकवीस

## हुतात्म्यांची जिवंत स्मारके

स्मृतिदिनाचा कार्यक्रम पार पडल्यानंतर नागनाथअण्णांनी आपल्या सहकाऱ्यांची मीटिंग घेऊन स्मारकाच्या कामाचा आराखडा तयार केला. त्यामध्ये त्यांनी पुतळे उभारण्यापेक्षा शाळा उघडणे महत्त्वाचे असे ठरविले. त्यानुसार १९४९ मध्ये किसान शिक्षण संस्थेची स्थापना केली. पुढे गावकऱ्यांच्या बरोबर विचारविनिमय करून माध्यमिक विद्यालयाची योजना आखली व त्या विद्यालयास हुतात्मा किसन अहिरांचे नाव निश्चित केले. तर गोरगरिबांच्या मुलांसाठी हुतात्मा नानकसिंग यांच्या नावे मोफत वसतिगृह सुरू करायचे ठरविले. गावकऱ्यांनी दोन्ही गोष्टींना एकमताने मान्यता दिली. २६ जून, १९४८ रोजी या कामाची मुहूर्तमेढ रोवण्यात आली. दुसऱ्याच दिवशी गावकऱ्यांच्या सहमतीने कार्यकारी मंडळ निवडले. अनेक अडचणींना तोंड देत इयत्ता आठवीचा वर्ग ७ एप्रिल, १९४९ रोजी सुरू झाला. त्यावेळी अण्णा आईला म्हणाले, ''आई, उद्या तू असशील, नसशील. मी असेन नसेन, परंतु चंद्रसूर्य असेपर्यंत सदैव हुतात्म्यांची जिवंत स्मारके अजरामर राहतील.''

विद्यालय सुरू केले, मात्र पहिली अडचण इमारतीची होती. खेडेगावात शाळेसाठी योग्य इमारत बांधणे ही कल्पनाच महाकठीण! म्हणून लक्ष्मीबाईंनी एकदा गावकऱ्यांसमोर शाळेच्या इमारतीचा प्रश्न मांडला. गावकऱ्यांनी विचार करून शेतजमिनीच्या मालकीनुसार एकरी दोन रुपये व ज्याने त्याने ऐपतीनुसार

वर्गणी द्यायचे ठरविले. २४ आक्टोबर, १९४९ रोजी जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष स्वामी रामानंद भारती यांच्या हस्ते इमारतीच्या पायाभरणीचा शुभारंभ झाला. कोल्हापूरच्या राजाराम हायस्कूलच्या इमारतीप्रमाणे बांधकाम करायचे ठरले. त्याप्रमाणे प्रथम चार खोल्यांचे बांधकाम सुरू केले. पुढे ते निधीअभावी बंदही पडले.

एकदा दुपारच्यावेळी अण्णांचा एक कार्यकर्ता आईंकडे गेला आणि म्हणाला, ''आईसाहेब, तुम्ही अण्णांच्या जेवणाचे ताट पाठविले आहे. परंतु अण्णा अजून जेवले नाहीत. ते शाळेच्या अर्ध्या बांधकामाजवळ बसून आहेत.'' हे समजताच तातडीने आई अण्णांकडे गेल्या. त्यांना म्हणाल्या, ''दुपारचे दोन वाजून गेले, तरी तुम्ही अजून का जेवला नाही?'' तेव्हा अण्णा म्हणाले, ''मला भूक नाही.'' आई म्हणाल्या, ''तुम्हाला खरंच भूक नाही का शाळेचं अर्ध्यात बंद पडलेलं काम बघून भूक गेली?'' अण्णा काही बोलले नाहीत. आईंना माहीत होतं. अण्णा जेवा म्हणून जेवणार नाहीत. म्हणून त्यांनी घरातून येताना आपला सोन्याच्या दागिन्यांचा डबा आणला होता. तो त्यांनी अण्णांच्या पुढे ठेवला. त्या म्हणाल्या, ''हे दागिने माझ्या काही कामाचे नाहीत. तुम्ही याचा काही उपयोग करा. आणि शाळेचे काम सुरू ठेवा.'' अण्णांच्या जवळ बसलेल्या कार्यकर्त्यांकडे बघून त्या म्हणाल्या, ''पोरांनो, हा सोन्याच्या दागिन्यांचा डबा एका बाजूला आणि तुम्ही दुसऱ्या बाजूला. अडीअडचणीला बोलवलं तर कोण येईल? तुम्ही याल का सोन्याचा डबा? मला तुम्ही पाहिजे. शाळा पाहिजे. बाकी कायबी नको.''

अण्णांसह साऱ्या कार्यकर्त्यांना आश्चर्य वाटले. आई दिसतात साध्या, पण त्यांचे आचार-विचार, त्याग महान आहे. त्या नऊवारी टोप पदराचे लुगडे नेसायच्या, अंगात चोळी, पदर टाचेपर्यंत घ्यायच्या. पायात चप्पल नाही. कपाळावर भला मोठा कुंकवाचा लालभडक टिळा, अगदी लांबूनही दिसावा असा. गळ्यात साधं डोरलं. तसे पाहिले तर आईंच्याकडे दहा-वीस तोळ्यांचे दागिने होते. परंतु त्यांना दागिन्यांचा मोह नव्हता. त्यांनी सहजपणे आपले वैभव आपल्या गावातील मुलांच्या शिक्षणासाठी कार्यकर्त्यांच्या हवाली केले.

केवळ आईच्या दागिन्यांनी शाळेची इमारत पूर्ण होणार नव्हती. परंतु त्यांच्या वागण्याचा इतरांवर मोठा परिणाम झाला. गावातील, परिसरातील



लोकांकडून, अण्णांच्या मित्रांकडून मदतीचा ओघ सुरू झाला. ज्या शेतकऱ्यांना आर्थिक मदत देता येत नव्हती त्यांनी श्रमदानातून आपला हिस्सा पूर्ण केला. कुणी चुन्याचा घाणा काढण्यासाठी बैल दिली, कुणी नदीतून वाळू आणून टाकली, कुणी खडकाळीतून चुनखडी गोळा करून आणली, कोणी गवंड्याच्या हाताखाली काम केले. कोणी चुनखडी भट्टीत टाकण्यास मदत केली, तर कोणी चुना भाजण्यासाठी लाकडे दिली. हळूहळू इमारत बांधून पूर्ण झाली. फक्त त्यावर बेंगलोरी कौले घालायची राहिली. त्यासाठी वाळव्यातील शिवाजीराव उर्फ अप्पासाहेब थोरात यांनी ती जबाबदारी स्वीकारली. संपूर्ण इमारतीला पुरतील एवढी बेंगलोरी कौले या 'सरकार'नी दिली. अनेक अडीअडचणीतून शाळेची चार खोल्यांची इमारत पूर्ण झाली.

२५ फेब्रुवारी, १९५३ रोजी कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या हस्ते इमारतीचे उद्घाटन झाले. हुतात्मा किसन अहिरांच्या स्मृतीने उभी ही संस्था अखंड ज्ञानदान करत राहणार याबद्दल कोणाच्याच मनात शंका नव्हती. कर्मवीर भाऊराव म्हणाले, ''या संस्थेच्या पाठीशी माझा सदैव आशीर्वाद राहील.''

■ ■ ■

## प्रकरण बावीसावे

# क्रांतिवीराचे लग्न

मोरारजी प्रकरणानंतर अण्णांनी शिक्षणाला पूर्णविराम दिला. क्रांतिमाता लक्ष्मीबाईंनी आता आपल्या नागनाथाचे लग्न करायचे ठरविल. तेव्हा त्यांनी व बापूंनी अण्णांसमोर लग्नाचा विषय काढला. त्या म्हणाल्या, ''अण्णा, आता तुझ्या मनाप्रमाणे सर्व गोष्टी झाल्या. देश स्वतंत्र झाला, तुझ्या सहकारी हुतात्म्यांची स्मारके उभी राहिली, गावात शाळा सुरू झाली. आता यंदा तुझे लग्न करायचे.''

अण्णा हसले. म्हणाले, ''कबूल. पण माझ्या दोन अटी आहेत. एक म्हणजे मुलगी शिकलेली हवी आणि दुसरे म्हणजे लग्न अगदी साध्या पद्धतीने कमीत कमी खर्चात व्हावे. आपण जाणत्यांनी काही गोष्टी केल्या तर समाज त्या मार्गावर जाईल. बाकी मुलीच्या बाबतीत पसंती तुझी. मुलगी पसंत पडली की झाले. मी लग्नाला तयार आहेच.'' आईंना फक्त अण्णांचा होकारच पाहिजे होता. त्यांनी लगोलग मुली बघायला सुरुवात केली.

एकदा जक्राराच्या वाडीचे अण्णांचे मित्र गंगाराम गायकवाड आईंना भेटण्यासाठी आले. बोलता बोलता आईनी अण्णांच्या लग्नाचा विषय काढला. त्यावर गंगाराम म्हणाले, ''आई, माझी बहीण बुरुंगवाडीला दिली आहे. ती परवा गावाकडे आली होती. तिने माझ्या कानावर एक स्थळ घातलंय. त्यांच्या गावातले यशवंत कदम मिरजेच्या आर.एम.एस. ऑफिसमध्ये पोस्टमास्तर



म्हणून काम करतात. त्यांची मुलगी लग्नाची आहे. शिक्षणपण झालंय.''

त्यावर आई म्हणाल्या, ''आरे गंगाराम, बुरुंगवाडी काय लांब हाय काय? आज शनिवार. तू वाळव्यात मुक्काम कर. उद्या रविवारी बैलगाडी जुपून आपण मुलगी बघायला बुरुंगवाडीला जाऊ या.''

गंगाराम म्हणाले, ''आईसाहेब, मुलगी बघायची असेल तर आपणाला मिरजेला गेले पाहिजे. ती मुलगी मिरजेत शाळा शिकते आणि तिथेच राहते.''

आई म्हणाल्या, ''ठीक हाय.''

सोमवारी सकाळी आई व गंगाराम मिरजेला यशवंत कदमांच्या घरी गेल्या. घरात कदमांचा धाकटा मुलगा होता. आईंनी त्याला विचारले, ''तुझी बहीण कोणत्या शाळेत शिकतिया? आम्ही तिला बघायला आलोय. तेवढी तिची शाळा दाखीव.'' तो पाहुण्यांना घेऊन शाळेत आला. आई शाळेत गेल्या आणि हेडबाईंना भेटल्या. येण्याचे कारण सांगितले. मॅडमनी कदम मुलीला ऑफिसात बोलावून घेतले. तिथेच आईनी तिला बघितले. तिला विचारले, ''मुली, तुझं नाव काय?''

''कुसूम यशवंत कदम'' मुलगी म्हणाली.

''कितवीत शिकतियास?'' आई

''मी अकरावीच्या वर्गात आहे.'' मुलगी

आईनी काही प्रश्न विचारले. तिच्याकडूनच तिची, कुटुंबाची माहिती एका कागदावर लिहून घेतली. आपले नाव-गाव-पत्ता तिला एका कागदावर लिहून द्यायला सांगितला. शेवटी जाता जाता त्या म्हणाल्या, ''हे बघ कुसूम, आम्ही तुला बघायला आलो होतो. घरी गेल्यावर वडिलांना हा कागद दे. त्यांना सांग, मुलाचं घरदार बघायला तुम्हाला बोलावलंय. तुझं वडील नोकरी करत्यात नव्हं? तसं आसल तर येत्या रविवारी त्यास्नी पाठवून दे.''

वाळव्यात आल्यावर आईंनी अण्णांना मुलीने लिहून दिलेला कागद दिला. पाहुण्यांना रविवारी येण्याचा निरोप दिला असल्याचे सांगितले. अण्णांनी तो कागद वाचला. ते म्हणाले, ''हा कागद मुलीने स्वत: लिहून दिलाय काय?''

आई म्हणाल्या, ''हो. काय झालं? काय लिहिताना चुकलंय काय?''

अण्णा म्हणाले, ''तसं काही नाही. मुलीचं अक्षर सुंदर आहे. म्हणून म्हणालो.''

निरोप दिल्याप्रमाणे मुलीचे वडील, मुलगा, घरदार बघायला रविवारी आले. नागनाथ नायकवडी हे नाव चहूमुलूखात गाजत, वाजत होतं. त्यामुळे मुलगा आदर्श असणार हे निश्चित होतं. पाहुण्यांनी घरदार, लागेबांधे चौकशी केले. त्यांना मुलगा पसंत पडला. त्यांनी मुलाला मुलगी बघायला बुरुंगवाडीला पाठवून द्या म्हणून सांगितलं. अण्णा त्याच्या मित्रांना घेऊन मुलगी बघायला गेले. चहापान, कांदेपोहे, गुळ-शेंगा झाल्या. मुलगी दाखवण्यात आली. अण्णा मनात म्हणाले, ''जरा मुलीची उंची कमी आहे. बाकी सर्व ठीक.''

पुन्हा उघडपणे मुलीच्या वडिलांना म्हणाले, ''आम्हाला मुलगी पसंत आहे. तुम्हाला व मुलीला आमचं स्थळ पसंत असेल तर पुढचा विचार करू. आम्हाला हुंडा-मानपान नको. नारळ-मुलगी घेऊन तुम्ही लग्नाला यावं. परवा दिवशी १३ तारखेला मुलीला घेऊन कोल्हापूरला या. तिथं अय्यर सरांच्या घरी लग्न उरकून घेऊ. योगायोगाने अय्यर सर हे अण्णांचे गुरूजी होते. तसेच कदमांचेही शिक्षक होते. त्यामुळे पत्ता देणे-घेणे-शोधणे याचा प्रश्नच नव्हता. नंतर मुलीचे वडील मुलीला घेऊन वेळेत आले. सर्वांची पसंती जुळून आली होती. त्यामुळे लगेच लग्न उरकण्याचा निर्णय घेण्यात आला. जिजाबाईंच्या जयंतीनंतर दुसऱ्याच दिवशी म्हणजे १३ फेब्रुवारी, १९५० रोजी हा विवाह झाला.

या लग्नाच्या आठवणी सांगताना लक्ष्मीबाई म्हणायच्या, ''अण्णाच्या लग्नाला आठ-दहा माणसंच हजर होती. नवरा-नवरी अंगावरच्या नेहमीच्याच कपड्यावरच लग्नाला उभी राहिली. त्यांनी एकमेकांना हार घातले. अय्यर सरांच्या मुलीनं गाणं म्हटलं. सर्वांनी टाळ्या वाजवल्या आणि लग्न झालं. लग्नानंतर घरगुती जेवणाची पंगत बसली. एवढं आमच्या मुलाचं लग्न, खरं आम्हीसुद्धा लग्नाला नव्हतो. अण्णा, त्याचे दोस्त, मुलगी, तिचे वडील व एक भाऊ तसेच अय्यर सर आणि त्यांची बायको व दोन मुलं. एवढंच लग्नाचं दोन्हीकडचं वऱ्हाड. भटजी नाही, दान-दक्षिणा नाही, हुंडा नाही का मानपान नाही. साधी राहाणी हा माझ्या अण्णाचा स्वभावगुण होता. तो त्यानं कायम जपला. डामडौल न करता बिनखर्चाचं लग्न होऊ शकतं, हे अण्णानं स्वत:च्या उदाहरणानं आम्हाला दाखवून दिलं.''

■■■



प्रकरण तेवीसावे

## सामाजिक चळवळीतल्या आईसाहेब

प्रत्येक युगात शिवाजी जन्माला यावा, परंतु तो दुसऱ्याच्या घरात, अशी समाजाची मानसिकता असते. शिवाजी जन्माला यावा म्हणणे सोपे आहे, परंतु त्यासाठी आधी विशाल अंत:करणाची जिजाऊ जन्मावी लागते. नागनाथअण्णा व त्यांच्या मातुश्री लक्ष्मीबाई म्हणजे अलीकडच्या काळातील शिवबा-जिजाऊ आहेत. लक्ष्मीबाईंनी फक्त शिवाजी जन्माला घातला नाही, तर त्याला घडविला आणि वाढविलासुद्धा. अण्णांच्या प्रत्येक कामात साथ देणारी ही माउली होती, हे कदापि विसरता येणार नाही. स्वातंत्र्य चळवळीतला इंग्रजांविरुद्धचा संघर्ष असो किंवा स्वातंत्र्यानंतरचा सामाजिक, रचनात्मक कामाचा संकल्प असो. क्रांतिमाता कधी मागे सरल्या नाहीत. पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून त्या प्रत्येक चळवळीत उतरल्या. जोखीम पत्करली, परंतु राष्ट्रहिताचे, समाजहिताचे काम कधी सोडले नाही.

अण्णांनी १९५७ ची व १९८५ ची विधानसभा निवडणूक लढवली आणि जिंकली. त्यांच्या यशात कार्यकर्ते, सामान्य जनता यांच्या बरोबरच क्रांतिमातेचाही मोठा वाटा होता. १९८५ च्या निवडणुकीत अण्णांचे चिन्ह होते सिंह. कार्यकर्त्यांनी अशी कल्पना मांडली की, प्रचारासाठी जिवंत सिंह फिरवायचा. त्यावर कार्यकर्त्यांचा उत्स्फूर्त पाठिंबा देत क्रांतिमाता कार्यकर्त्यांना म्हणाल्या, ''तुम्हाला कोण काय म्हटलं तर आईनं परवानगी दिल्या म्हणून सांगा.''

२५ फेब्रुवारी, १९७१ रोजी हुतात्मा किसन अहिरांच्या पुतळ्याचे अनावरण तत्कालीन संरक्षण मंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते झाले. त्या कार्यक्रमाचे अध्यक्ष क्रांतिसिंह नाना पाटील होते, तर स्वागताध्यक्ष दत्ता देशमुख होते. तो कार्यक्रम यशस्वी करण्यामागे सर्वस्वी नागनाथअण्णा असले तरी त्या कार्यक्रमाच्या तयारीची सल्लामसलत आईंसोबत झाली होती. पुतळ्याचा निधी जमवण्यामध्ये त्यांचा सिंहाचा वाटा होता. रात्रंदिन पायपीट करून त्यांनी निधी गोळा केला. आपणाला असे दिसते की, पोलीस इतरांकडून निधी गोळा करतात, परंतु पोलिसांकडे कोण निधी मागतो? पण क्रांतिमातेने तेही केले. त्या काळात त्यांनी पोलिसांकडून २५१ रु. वर्गणी घेतली. आणि फौजदाराकडून ५१ रु. चा निधी घेतला. बहुतेक त्यावेळी आष्ट्याला मुल्लाणी फौजदार होते. आईंच्या नजरेतून कोणी सुटले नाही. एखाद्या गरिबाने एक रुपया निधी दिला तर त्या आनंदाने स्वीकारत. त्याला म्हणत, ''आरं बाबा, एकानं शंभर रु. देण्यापेक्षा तुझ्यासारख्या शंभरजणांनी दिलेला एक-एक रुपाया मला जास्त मोलाचा आहे.''

हुतात्मा किसन अहिर यांच्या पुतळा उभारणीनंतर अण्णांनी वाळवा-इस्लामपूर रस्त्यासाठी चळवळ सुरू केली. सारा बंदीच्या चळवळीत क्रांतिमातेने जे कार्य केले ते वाळव्याच्या सर्व जनतेने बघितले. तेव्हा वाळवा-इस्लामपूर रस्ता माती-फुफाट्याचा आणि खाचखळग्यांचा होता. इस्लामपूरला तर सारखे जावे लागे. अण्णांनी परिसरातल्या सगळ्या शेतकऱ्यांना एकत्र केले. वाळवा-इस्लामपूर रस्ता डांबरी झाल्याशिवाय शेतसारा भरायचा नाही असे आपले मत मांडले. सगळ्या शेतकऱ्यांनी पाठिंबा दिला. गाव एक झाले. 'रस्त्यातला खड्डा की खड्ड्यातला रस्ता' असे म्हणावे लागत होते. वाळव्यात एस.टी. आणताना ड्रायव्हर मेटाकुटीला यायचे. ड्युटी बदलून घ्यायचे. खड्ड्यांमुळे शेवटच्या बाकावरील प्रवासी उडून टपाला थडकायचे. असे प्रकार वारंवार व्हायचे.

यापूर्वी वल्लभभाई पटेलांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नासाठी बारडोलीला सत्याग्रह केला व साराबंदीची पहिली चळवळ उभी करून ती यशस्वी केली. त्यानंतर नागनाथअण्णांनी रस्त्यासाठी केलेली साराबंदीची चळवळ उभारून यशस्वी केली. देशाला स्वातंत्र्य मिळून दोन तप झाली. पाच पंचवार्षिक योजना संपत आल्या. स्वातंत्र्य लढ्यात वाळवा गावाने केलेले योगदान मोठे होते. हुतात्म्यांचे



गाव, स्वातंत्र्य सैनिकांचे गाव, तालुक्याचे गाव असे सारे असूनही गावाला साधा रस्ता होऊ नये ही गावकऱ्यांच्या स्वाभिमानाला धक्का पोहचविणारी गोष्ट होती. अण्णा व क्रांतिमाता सरकारला सांगत होत्या, ''लोकांच्या सहनशक्तीचा अंत बघू नका. रस्ता लवकर करा.'' पण ऐकतं कोण? पुढे रस्त्याची चळवळ लोकांना इतकी महत्त्वाची वाटली की, त्यासाठी हजारो शेतकरी रस्त्यावर आले. क्रांतिमाता आघाडीवर होत्या. त्यांनी विचार केला की, या पुरुषांच्या बरोबरीने स्त्रिया रस्त्यावर उतरल्या तर सरकारला मोठा धक्का बसेल. त्यासाठी त्यांनी स्वत:च्या घरापासून सुरुवात केली. आपली मोठी सून सौ. कुसूमताई व नात विशाखाताई यांना बरोबर घेऊन महिलांच्या बैठका घेतल्या. कोपरा सभा घेतल्या. स्त्रियांना संघटित केले. गावातून दोन-दोन हजार स्त्रियांना बरोबर घेऊन रस्त्याच्या मागणीसाठी फेऱ्या काढल्या. घोषणा देऊन रस्त्याच्या मागणीचा आवाज सरकारच्या कानापर्यंत पोहोचविला. 'आधी रस्ता, मगच शेतसारा', 'डांबरी रस्ता झालाच पाहिजे' अशा घोषणा देत वाळव्यातील साराबंदीची चळवळ शांततेच्या मार्गाने पुढे चालली होती.

याच दरम्यान शासनाने चुकीचा निर्णय घेतला. रस्त्याच्या कामाला सुरुवात करण्याऐवजी गावात शे-पाचशे पोलिसांची छावणी टाकली. सरकारची ही भूमिका शेतकऱ्यांना आवडली नाही. त्यामुळे रस्त्याच्या चळवळीपासून थोडेफार लांब असलेले शेतकरी साराबंदीच्या चळवळीत सक्रीय झाले. म्हणून सरकार शेतकऱ्यांवर चिडले. सरकारने शेतकऱ्यांना जप्तीच्या नोटीसा पाठविल्या. तरी शेतकरी दाद देईनात. सरकार म्हणे, ''शेतसारा भरा नाही तर जप्ती आणू.'' लोक म्हणायचे, ''आधी रस्ता करा, मगच आम्ही शेतसारा भरू.'' दिवस सरकतील तसे चळवळीने उग्र स्वरूप धारण केले.

सरकार हताश झाले होते. ही कोंडी फोडण्याचा मार्ग दिसत नव्हता. ही साराबंदीची चळवळ अशीच पसरत पसरत एका गावातून दुसऱ्या गावात सुरू झाली तर आणखी अडचणी वाढतील, असे सरकारला वाटत होते. काही झाले तरी चळवळ मोडली पाहिजे, अशी सरकारची ठाम भूमिका होती. त्यासाठी सरकारी अधिकाऱ्यांनी पोलिसांच्या मदतीने सारा न देणाऱ्या गरीब शेतकऱ्यांपासून जप्तीला सुरुवात केली. त्यांचा फाटका, तुटका प्रपंच रस्त्यावर आणला. त्यांची भांडीकुंडी सामानसुमान जप्त करून चावडीत आणून एका

खोलीत सीलबंद करून ठेवले. सरकारच्या या दुष्ट प्रवृत्तीला वाळव्याच्या स्वाभिमानी जनतेने कडाकडून विरोध केला. गाव पेटून उठला. क्रांतिमाता म्हणाल्या, ''आम्ही इंग्रजांना घाबरलो नाही, ते तुम्हाला काय भिणार!'' आईंनी सारा गाव जमा केला. घोषणा देत त्या चावडीवर गेल्या आणि त्यांनी सीलबंद खोलीचे सील तोडले. वाजत गाजत जप्त केलेली शेतकऱ्यांची भांडीकुंडी, मालमत्ता ज्याचे त्याला परत केली. या उठावात सगळी जनता एकवटली. तटस्थ भूमिका घेणारा शेतकरीही चळवळीत उतरला. शेवटी जनतेने रस्ता करायला सरकारला भाग पाडले. डांबरी रस्ता झाल्यावरच लोकांनी शेतसारा भरायला सुरुवात केली.

क्रांतिमाता सौ. लक्ष्मीबाई या क्रांतिवीर अण्णांच्या प्रत्येक विधायक कामाच्या पाठीमागे ठामपणे उभ्या राहिल्या. मग तो शेतीच्या पाण्याचा प्रश्न असो, धरणग्रस्तांचे प्रश्न असोत, शेतकऱ्यांच्या प्रश्नावर सरकारी कार्यालयावर मोर्चे असोत, दलितांचे प्रश्न असोत, नाहीतर दलित-आदिवासी विद्रोही साहित्य संमेलन असो. आई प्रत्येक आघाडीवर पुढे असायच्या.

क्रांतिवीर नागनाथअण्णांनी क्रांतिसिंह नाना पाटलांना वाळव्यात आणले. नाना पाटील वर्षातील आठ महिने वाळव्यात तर चार महिने पंढरपुरात असायचे. ते वाळव्यात असताना त्यांची जेवणाखाण्याची, राहण्याची सगळी व्यवस्था आईच करत असत. एकदा वाळव्यात स्त्रियांच्या प्रश्नावर जागृती घडविण्यासाठी परिषद घेण्यात आली. क्रांतिमातेने बैलगाडीतून प्रवास करून शिराळ पेट्यातील सर्व गावच्या महिलांना परिषदेला येण्याचे जाहीर आवाहन केले. ती परिषद नागनाथअण्णांच्या पुढाकारामुळे यशस्वी झाली. परिषदेला चाळीस हजार स्त्रिया हजर होत्या. परिषदेत स्त्रियांच्या अनेक प्रश्नांना वाचा फोडण्यात आली. अनेक ठराव करून सरकारकडे पाठविण्यात आले. क्रांतिमाता आपल्यापरीने या चळवळीत योगदान देत होत्या.

हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखाना वाळव्याला काढून अकरा महिन्यात साखर पाडली, या कामात नागनाथअण्णांचा सिंहाचा वाटा आहे. परंतु साखर कारखाना मंजुरीच्या कामास सुरुवात करताना अण्णांनी दोन अटी घातल्या होत्या. एक वसतिगृहातील मुले उपाशी राहता कामा नयेत. दोन, दिल्लीला खर्चासाठी लागणारे पैसे तार मनिऑर्डर करून पाठविले पाहिजेत.



त्यावेळी क्रांतिमाता म्हणाल्या, ''अण्णा, तुम्ही मागची काळजी करू नका. ती जबाबदारी माझी आहे.'' त्यावेळी आईंनी गावोगाव फिरून वसतिगृहासाठी धान्य जमवले. त्या कामात त्यांना बच्चू पोरवाल, आष्टा यांनी फार मदत केली. ट्रकाने धान्य जमवले. तसेच हुतात्मा कारखान्याच्या प्राथमिक खर्चासाठी हुतात्मा किसन अहिर विद्यालयातील व जिजामाता विद्यालयातील शिक्षक, शिक्षिका, कारकून व काही शेतकरी कार्यकर्ते यांनी प्रत्येकी एक हजार रुपयाचे शेअर्स घेऊन पैसे उभे केले. अण्णांच्या कार्यावर निष्ठा असणाऱ्या मीराबाई नारायण कांबळे या महिलेने पहिला शेअर्स घेतला. अण्णा दिल्लीहून कारखान्याची मंजुरी घेऊन आल्यावर क्रांतिमाता त्यांना म्हणाल्या, ''अण्णा, तुमच्या पाठीमागं संस्थेचं कामकाज, बोर्डिंग सांभाळायला मला अनेकांनी मदत केली. तुमच्या दिल्लीच्या खर्चासाठी मनीऑर्डरची जबाबदारी मात्र दत्ता, जया, पवार सर या पोरांनी पार पाडली.''

■ ■ ■

प्रकरण चोवीस

# आठवणीतल्या क्रांतिमाता

क्रांतिमाता जास्त शिकल्या नव्हत्या, पण त्यांचे जाणतेपण विलक्षण होते. त्यांच्याजवळ अनुभवाची, समय सूचकतेची शिदोरी उपजतच होती. त्या आपले म्हणणे सोप्या भाषेत मांडायच्या आणि कार्यकर्त्यांची मन जिंकायच्या. त्यांचे अनेक पैलू असे होते की, त्यांच्या मांडणीतून फार शिकण्यासारखे असायचे. त्या एक वेळ कार्यकर्त्यांना म्हणाल्या, ''प्रसंगाला माणूस उपयोगी पडंल पण पैसा नाही. तेव्हा पैशाला जास्त महत्त्व देऊ नका. मी काय सांगते ते ऐका. हे पहा, इथं पैशाचा ढीग आहे आणि दुसऱ्या बाजूला माणसांचा ढीग आहे. तुमच्यावर एखादा प्रसंग आलाय. बोलवल्यावर कोण येईल? पैसा येईल का माणूस येईल? माणूसच येणार.'' यातून आईंना काय म्हणायचे आहे ते लक्षात आलेच असेल.

एक वेळ अण्णांनी हुतात्मा साखर कारखान्याचे कार्यक्षेत्र ठरवून देण्याबद्दल पुण्याला शेतकऱ्यांचा मोर्चा मुख्यमंत्री शंकरराव चव्हाणांचेकडे नेला होता. त्यावेळी आई सोबत होत्याच. अण्णांचे बरोबर त्याही शंकररावांना भेटल्या. मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण यांच्या समोरच्या खुर्चीवर त्यावेळचे अर्थमंत्री सुशीलकुमार शिंदे बसले होते. आई अर्थमंत्र्यांना म्हणाल्या, ''पोरा, जरा मला शंकरराव अण्णांच्याबरोबर बोलायचं आहे.'' अर्थमंत्री सुशीलकुमार शिंदेनी आईंच्या हाताला धरून आपल्या खुर्चीवर बसविले आणि स्वत: त्यांच्याजवळ उभे राहिले. त्या शंकररावांना म्हणाल्या, ''अहो चव्हाण अण्णा, तुम्ही दिल्लीत



आमच्या हुतात्मा साखर कारखान्याला मंजुरी मिळावी म्हणून मदत केलीत आणि महाराष्ट्रात मात्र कारखान्याच्या कार्यक्षेत्र मागणीला तुमच्या सरकारचा विरोध का?'' येवढेच बोलल्या आणि थांबल्या. शंकरराव चव्हाणांनी आईच्या बोलण्याला हसून दाद दिली आणि पुढे म्हणाले, ''आईसाहेब, असं का ते नागनाथअण्णांना माहीत आहे.''

असाच एक वेळचा प्रसंग. अण्णांच्या पत्नी म्हणजे क्रांतिमातेच्या थोरल्या सुनबाई सौ. कुसूमताई पहिल्या बाळंतपणानंतर आजारी पडल्या. त्यांना टी.बी. झाला होता. त्या काळात टी.बी. चा आजार तसा लवकर बरा न होणारा असा होता. त्यांना मिशन हॉस्पिटलमध्ये ॲडमिट केले होते. नावनाव आजार बळवत चालला होता. त्या काळात टी.बी.सारख्या अजारावर चांगले, प्रभावी औषध नव्हते. डॉ. गायकवाड, डॉ. ओव्हळ यांच्या मार्गदर्शनाखाली शिकस्तीचे प्रयत्न चालू होते. एक दिवस आई डॉक्टरांना भेटल्या आणि त्यांना म्हणाल्या, ''डॉक्टर, सुनबाईची तब्येत जास्तच खालावत चाललीया. कायतर भारी इलाज करा की.'' आईना सहज डॉक्टर म्हणाले, ''अहो आईसाहेब, आम्ही आमच्या परीनं उपचार करतोयच, पण तुम्ही येवढं का मनाला लावताय? अहो आई, तुमचा मुलगा तरुण आहे, त्याचं दुसरं लग्न करा.'' त्यावर आई डॉक्टरांना म्हणाल्या, ''डॉक्टर साहेब, माझ्या मुलाला हिच्यापेक्षा देखणी चांगली दुसरी बायको मिळेल हो, पण माझ्या नातवाला आई कुठली आणू? तुम्ही शहाणी, सवरती माणसं खूप हिंडला फिरलायसा, दुनियेत असा कुठं बाजार आहे का की तिथं आई विकत मिळल?''

या बोलण्यानं डॉक्टर एकदम बसल्या खुर्चीवरून ताडकन उठून उभे राहिले. या तर साध्या शेतकरी बाई दिसतायच आणि यांची बुद्धी किती तल्लख आहे. ''आईसाहेब, आम्ही बोलण्यात थोडं घसरलो, परंतु तुमच्या बोलण्यानं जे बळ आम्हाला मिळालं, त्याची आठवण आम्ही मनात ठेवून आमच्या परीने जे शक्य आहे तेवढा प्रयत्न करू.'' डॉक्टरांच्या प्रयत्नाला यश आले. क्रांतिमातेच्या सुनबाई पूर्ण बऱ्या झाल्या. हॉस्पिटलमधून डिस्चार्ज मिळाला आणि त्या वाळव्याला आल्या. आज त्यांचे ८३ वर्षे वय असून त्यांची तब्येत उत्तम आहे.

आईनी सांगितलेली अशीच एक गोष्ट आठवते, ''माझ्या मुलानं (क्रांतिवीर नागनाथअण्णा) १९४२ ला घर सोडलं ते कायमचं. पुढे स्वातंत्र्याच्या लढ्यात

त्यांनी जे काम केलं ते तुम्हाला माहीत आहेच. देशाच्या स्वातंत्र्यानंतर माझा मुलगा जीवंत हुतात्म्यांचे जीवन जगत आहे. घरच्या कोणत्याच गोष्टीकडे लक्ष घालत नाही. त्याचा मुक्काम हुतात्मा विद्यालयात असतो. स्वातंत्र्य सैनिकांची हक्काची मिळणारी पेन्शन तो घेत नाही. त्यांच्या जीवाभावाच्या मित्रांनी अण्णांनी स्वातंत्र्य सैनिकांची पेन्शन घ्यावी म्हणून एकवेळ खूप आग्रह केला. त्यावेळी त्या मित्रांना समजावताना ते म्हणाले, 'पेन्शन मिळावी यासाठी स्वातंत्र्याची चळवळ मी केली नाही. शिवाय एकट्यानं चळवळ करून देशाला स्वातंत्र्य मिळालेलं नाही. अनेक ज्ञात अज्ञात असे स्त्री पुरुष आहेत की त्यांच्या वाट्याला पेन्शन आली नाही. त्या सर्वांना पेन्शन मिळू दे, स्वातंत्र्य सैनिकांना मिळणाऱ्या सवलती सर्वांना मिळू देत, मग शेवटी माझं बघू.' असे अण्णा स्वार्थापासून दूर राहिले. त्यांच्या वैयक्तिक गरजा, चप्पल, कपडे, केस-दाढी, साबण ह्यासाठी होणारा खर्च त्यांचे धाकटे बंधू शामराव अप्पा करतात. एकवेळ मी अण्णाचे जेवण घेऊन शाळेत आले होते. अण्णा शाळेत ऑफिसमध्ये बसले होते. माझ्याबरोबर अण्णाचा धाकटा मुलगा अरुणही आला होता. तो शाळेला जात होता. त्याला वही पुस्तक कायतर पाहिजे होते. त्याच्या मनात काय आलं त्याचं त्यालाच माहीत. तो अण्णांजवळ गेला आणि त्यांना म्हणाला, 'अण्णा, मला वहीला आणि पुस्तकाला पैसे पाहिजेत.' अण्णा अवघडल्यासारखे झाले. ते त्याच्या तोंडाकडे पहात होते. येवढ्यात मी अरुणला म्हणाले, 'अरुण, पैसे अप्पांना (चुलता शामराव) मागायचे, अण्णांकडे पैसे नसतात.' अण्णांना पैसे मागितलेला एवढा एक प्रसंग सोडला तर मुलांनी त्यांना कधी पैसे मागितले नाही. अण्णांची मुलं-मुली खूप शिकली, मोठी झाली. पण कोणीही अण्णांना पैसे मागितले नाहीत. 'वडिलांनी (अण्णांनी) आपल्यासाठी काहीही केलं नाही हे जरी खरं असलं तरी त्यांनी समाजासाठी केलं. ज्यांचं कोण नव्हतं त्यांच्यासाठी केलं. त्यांच्या आनंदात आपला आनंद आम्ही पाहिला. अशा आमच्या वडलांबद्दल आमच्या ठाई खूप प्रेम आहे. आदर आहे. पुर्नजन्माच्या गोष्टी खऱ्या असतील तर जन्मो-जन्मी आम्हाला हेच वडील लाभू देत,' असे म्हणणारी अण्णांची मुलं आहेत.''

मी आणि वैभव काका ऑफिसमध्ये सहज गप्पा गोष्टी करत बसलो होतो. विषयाने विषय निघाला आणि आम्ही आईंच्याविषयी बोलायला लागलो.



त्यांच्या आठवणी एकमेकांना सांगत होतो. बोलता बोलता वैभव काका मला म्हणाले, ''जया मामा वाळव्याचा मुला-मुलींचा खो-खो चा खेळ पूर्वीपासूनच गाजतोय. तुमच्या काळातही गाजला तसा आमच्या काळातही गाजला. राज्यापासून राष्ट्रीय पातळीवरची क्रीडांगणं वाळव्याच्या खेळाडूनी गाजवली. प्रत्येक ठिकाणी आई या खेळाडूंच्या बरोबर असायच्या. आई बरोबर आहेत, म्हटल्यावर पालक निर्धास्त असायचे. विशेषत: मुलींचे पालक तर बेहद खूश असायचे. मामा, मला अजूनही चांगले आठवतंय शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू कणबरकर सर होते. त्यावेळी त्यांच्या विद्यापीठाची मुलींची खेळाची टीम पुण्याला जाणार होती. त्या मुर्लींबरोबर कुणाला पाठवायचे असा प्रश्न कणबरकर सरांच्या पुढे होता. योगायोगाने आई कणबरकर सरांकडे विद्यापीठात कामानिमित्त गेल्या होत्या. वाळव्याच्या खेळाडू मुला-मुलींच्या टीमबरोबर आई जात होत्या, हे कणबरकर सरांना माहीत होते. त्यांनी आईंना विचारले, ''आई आमच्या विद्यापीठाची मुलींची टीम खेळायला पुण्याला जाणार आहे. त्यांच्याबरोबर पाठवायला आमचेकडे स्त्री कोणी नाही. तुम्ही त्यांच्याबरोबर पुण्याला जाल का?' आईंनी लगेच होकार दिला. त्या मुलींच्या टीमबरोबर पुण्याला गेल्या. खेळ संपेपर्यंत पुण्यात त्या दोन तीन दिवस राहिल्या. त्यांची तिथे चांगली व्यवस्था केली आणि खेळ संपल्यानंतर त्यांना सुखरूप कोल्हापूरला घेऊन आल्या. कणबरकर सरांनी त्यांचे आभार मानले. त्यावेळी आई म्हणाल्या, 'माझं हे कर्तव्यच होतं ते मी पार पाडलं.' ''

बाळासाहेब देसाईंनी १२०० रुपयांचे आतील उत्पन्न असलेल्या मुला-मुर्लींना फी माफीची सवलत दिली. त्याच दरम्यान स्वातंत्र्य सैनिकांच्या शाळेला जाणाऱ्या मुलांसाठी स्कॉलरशिप चालू केली होती. क्रांतिवीर अण्णा, त्यांचे आई व वडील हे तिघेही स्वातंत्र्य सैनिक होते. इतर स्वातंत्र्य सैनिकांचे मुलाबरोबर अण्णांच्या मुलांचाही स्कॉलरशिपसाठी अर्ज केला होता. अर्जावर पालकांची सही लागत होती. अण्णा तत्त्वाने जाणारे असल्यामुळे त्यांनी सही केली नाही. त्यांचं म्हणणं देशाच्या स्वातंत्र्याच्या लढ्यात ज्यांनी भाग घेतला होता, त्यापैकी सरकारच्या रेकॉर्डप्रमाणे ज्यांची नोंद होती त्यांच्याच मुलांना स्कॉलरशिप देणार होते. परंतु अण्णांचे म्हणणे होते, ज्ञात-अज्ञात अनेक लोकांचा स्वातंत्र्य चळवळीत सहभाग होता. त्यांनी इतक्या यातना, लाठ्या, काठ्या सोसल्या होत्या

की, नोंद असणाऱ्या सैनिकांपेक्षा त्यांचा स्वातंत्र्य चळवळीतील त्याग जास्त होता. असं असताना निव्वळ त्यांची नोंद नाही म्हणून त्यांच्या मुलांना स्कॉलरशिप नाही, हे मला मान्य नाही. म्हणून मी माझ्या मुलांच्या अर्जावर सही करणार नाही. आई म्हणाल्या, ठीक आहे मी पालक म्हणून सही करते. आम्ही क्लार्क मंडळींनी आईंना सांगितले मुलांचे वडील हयात असताना तुमची सही चालणार नाही. त्या म्हणाल्या, कशी चालत नाही हे मी बघते. तुम्ही अर्ज वर पाठवा. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे आम्ही शिक्षण अधिकाऱ्याकडे मंजुरीसाठी अर्ज पाठविला.

त्यावेळी अण्णांची सर्वांत मोठी असणारी मुलगी विशाखाताई ह्याच शाळेत होत्या. बाकी मुलं लहान होती. जिल्हा परिषदेमध्ये शिक्षणाधिकाऱ्यांकडे अर्ज पोहोचल्यानंतर आई त्यांना स्वत: भेटल्या. त्यावर शिक्षणाधिकारी म्हणाले, ''आईसाहेब तुमच्या नातीचे वडील हयात असताना त्यांच्या सहीशिवाय आम्हाला स्कॉलरशिप मंजूर करता येणार नाही.'' आई म्हणाल्या, ''ठीक आहे, तुम्ही आमचा अर्ज वरती पुण्याला पाठवा.'' पुण्याला अर्ज पोहचल्यानंतर मला (जयवंत) आई पुण्याला डायरेक्टर ऑफ एज्युकेशन यांच्याकडे घेऊन गेल्या. पुण्यात गेल्यानंतर मी आईंना अण्णांचे एक मित्र साळुंखे साहेब त्या ऑफिसमध्ये डे. डायरेक्टर होते त्यांच्याकडे घेऊन गेलो. तसा तो भारी इरसाल अधिकारी होता. आईने त्यांना सांगितले, ''साळुंखेसाहेब तुमचे मित्र अण्णा तुम्हाला माहीत आहेत. ते घरात अजिबात लक्ष घालत नाहीत आणि घराकडेही येत नाहीत. त्यांची मोठी मुलगी विशाखाताई नागनाथ नायकवडी ही आठवीच्या वर्गात शिकत आहे. तिचा स्वातंत्र्य सैनिक स्कॉलरशिप अर्ज माझ्या सहीने तुमच्या ऑफिसला आलेला आहे. आमच्या घरात अण्णा जसे स्वातंत्र्य सैनिक आहेत, तसे त्यांचे वडील व मी एकाच घरातले आम्ही तिघेजण स्वातंत्र्य सैनिक आहोत. अण्णा मुलींच्या अर्जावर सही करत नाहीत म्हणून तिला स्कॉलरशिप न मिळणे, हे अन्यायकारक आहे.'' साळुंखेसाहेबांना आईंचे म्हणणे पटले. त्यांनी आपल्या पी.ए.ला बोलाविले आणि एज्युकेशन सेक्रेटरी यांच्याकडे अर्ज लिहायला सांगितला. त्या अर्जात त्यांनी स्पष्ट लिहिले होते, 'कु. विशाखा नागनाथ नायकवडी ही मुलगी आठवीच्या वर्गात शिकत असून तिचा स्वातंत्र्य सैनिक स्कॉलरशिपसाठी अर्ज केला आहे. मुलींचे वडील स्वातंत्र्य सैनिक असून हयात असले तरी ते घरी अजिबात लक्ष देत नाहीत. ते जनतेच्या



विधायक कामात सातत्याने व्यस्त असतात. त्या मुलीची आजी आणि आजोबा हे दोघेही स्वातंत्र्य सैनिक असून त्यांनी कारावास भोगला आहे. अशा त्यांच्या नातीची स्कॉलरशिप मंजूर व्हावी.' पुढे मुंबईत मंत्रीमंडळापुढे चर्चा होऊन खास बाब म्हणून स्कॉलरशिप मंजूर झाली. अशी आईंची कामाची पद्धत होती. चिकाटी होती. स्कॉलरशिप मंजूर होईपर्यंत त्या स्वस्त बसल्या नाहीत.

क्रांतिमातेचे तसे अनेक पैलू आहेत. तसं आईंच्याबद्दल खूप लिहिण्यासारखं आहे. त्या त्यागी जीवन जगल्या, अनेक शिकल्यासवरल्या मुलामुलींना नोकऱ्या लावल्या. विशेषत: मुलींनी शाळेला जावे म्हणून अग्रहक्काने अनेक मुलींना मार्गदर्शन केले. अण्णांनी स्वतंत्र मुलींची शाळा लवकर काढावी म्हणून आग्रहाने त्यांना त्या कामाची आठवण करत होत्या. मुलांच्या शिक्षणाच्या बाबतीत मात्र आई आपणहून शाळेला जाणाऱ्या मुलांपेक्षा शाळेला न जाणारी गोरगरिबांची जी मुलं मेंढरामागं, गुरा ढोरामागं अशी रानावनात भटकत होती ती मुलं शिकतील कशी, शाळेला येतील कशी, याकडे त्या मनापासून लक्ष घालत होत्या. त्या मुलांची शिकण्याची इच्छा असूनही परिस्थितीमुळे शाळेला येता येत नव्हतं, त्या मुलांची क्रांतिमाता पाटी पुस्तकापासून कपड्यालत्त्यापर्यंत, जेवण-खाण्यापर्यंत व्यवस्था करत होत्या. अशी शाळेला न जाणारी चार दोन मुलं जर शाळेला आली तर त्यात त्यांना समाधान वाटत होतं. अशा या क्रांतिमातेने मुलींच्या शिक्षणाबाबतीत इतरांना नुसता उपदेश न करता आपल्या घरापासून सुरुवात केली होती. प्रथम त्यांनी आपली थोरली सून सौ. कुसुमताईंना लग्नानंतर शिक्षणाला प्रोत्साहन दिले. त्यांना कोल्हापूरला उच्च शिक्षणासाठी पाठविले आणि पदवीपर्यंतचे शिक्षण दिले. त्याचप्रमाणे पुढे आपले नातू अरुण भैय्या, वैभव काका आणि नाती विशाखाताई आणि शोभाताई यांनाही पदवीपर्यंतचे शिक्षण दिले. परंतु कोणालाही नोकरी लावली नाही. उलट अण्णांच्या विधायक कामात मदत करा, म्हणून सांगितले. तुमच्या नशीबानं आजोबा आणि तुमच्या चुलत्यांच्या पुण्याईनं घरचं खूप चांगलं आहे. आपण सारे खाऊन-पिऊन सुखी आहोत. तुमच्या ताकदीप्रमाणं इतरांना मदत करा. तुमच्या या वागण्यानं, कार्यानं, तुमच्या जीवनाची वाट यशस्वी होईल. उद्या मी आहे, नाही, एकीनं राहा. सत्यानं राहा, प्रामाणिक रहा, अन्यायाविरोधात लढा. चांगल्या कामाला सहकार्य करा.'' असे वरचेवर आई आपल्या नातवांना सांगत होत्या.

■ ■ ■

प्रकरण पंचवीस

# सर्वसामान्यांची आई

नागनाथ अण्णांची नेहमीच धावपळ असायची. त्यामुळे मित्र मंडळींच्या, पै-पाहुण्यांच्या व्यक्तिगत घरगुती समारंभासाठी त्यांना फारसा वेळ मिळत नसे. अशा वेळी अण्णांच्या आई ते सारे व्यवहार सांभाळत असत. अण्णांच्या कोणा मित्राच्या मुलाचं-मुलीचं लग्न असो, बारसे असो, गृहप्रवेश असो, दुकानाचं उद्‌घाटन असो किंवा एखाद्या घरी दुःखद घटना घडलेली असो, तिथे आई आवर्जून जायच्या. सांगली, सातारा आणि कोल्हापूर टापूतील अण्णांचे व्यक्तिगत मित्रांच्या घरगुती कार्यक्रमात आई हजर राहून अण्णांची उणीव भरून काढत. अशामुळे त्यांचे संबंध त्या कुटुंबाच्या चुलीपर्यंतचे जिव्हाळ्याचे, आपुलकीचे होते. त्यांचा प्रवास हा एस.टी. बसनेच असायचा. आईचं जरी वय झालं होतं, तरी त्यांच्याबरोबर कोणी असण्याची आवश्यकता नव्हती. एस.टी. बसचे अनेक कंडक्टर्स व ड्रायव्हर्स त्यांच्या परिचयाचे होते. त्या बसमध्ये घेतल्यापासून ते त्यांच्या उतरण्याच्या ठिकाणापर्यंत सर्वजण काळजी घेत होती. एस.टी.तून उतरल्यानंतर शहरात ज्या ठिकाणी जायचे आहे, तेथे जाण्यासाठी त्यांचा प्रवास रिक्षाने व्हायचा. त्यामुळे बरेचसे रिक्षावाले त्यांच्या ओळखीचे झाले होते.

साताऱ्यात पोहचल्यावर आई रयत शिक्षण संस्थेत जात असत. त्या कर्मवीर अण्णांच्या संस्थेत शिपायांपासून चेअरमनपर्यंत सर्वजण आईंना 'नागनाथ अण्णांच्या आई' म्हणून ओळखत. तेथे गेल्यावर प्रथम कर्मवीर अण्णांच्या समाधीचे दर्शन घ्यायच्या. यानंतर डॉ. आप्पासाहेब पाटील, डॉ. अनिल पाटील, सरोदे सर, रा. सु. पाटील, बॅ. पी. जी. पाटील, गणी आत्तार, व्ही. एन. पाटील इ. मंडळींना त्या भेटत. रयत शिक्षण संस्थेत कोणी यापैकी नाही भेटले तर आई त्यांना त्यांच्या घरी आवर्जून जाऊन भेटत. सरोदे सर आईची खूप काळजी घ्यायचे. ते सर्वांशी आईची भेट घालून देत आणि नंतर वाळव्याला जाण्यासाठी एस.टी. स्टॅण्डवर येऊन त्यांना निरोप देत.

आईंचा कोल्हापूरचा कामानिमित्त दौरा असला तर त्या प्रथम कोल्हापूरच्या प्रिन्स शिवाजी बोर्डिंगमध्ये यायच्या. तिथे महाराष्ट्र हायस्कूलमधील सर्व शिक्षक-शिक्षिकांना भेटायच्या आणि त्यांच्याबरोबर सुख-दुःखाच्या दोन गोष्टी केल्यानंतर हेडमास्तर असलेल्या दादासाहेब पाटलांकडे जाऊन बसायच्या. चहापाणी झाल्यानंतर दादासाहेब आईंना विचारायचे, ''आई, आज काय काम काढलंय?'' आईंनी काम सांगितलं की दादासाहेब त्यांच्याबरोबर एक शिपाई देत असत. त्या शिपायाला बजावलेले असायचे आईंची सगळी कामं झाली की, त्यांना एस.टी. बसमध्ये बसव आणि परत आल्यानंतर मला सांग. इथंपर्यंतची आईंची काळजी दादासाहेब घेत होते. तसं कोल्हापूर आईंच्या खूप ओळखीचे होते. त्यामध्ये वनीरे सर, शिवाजीराव खाडे, तम्माण्णा उपाध्ये, राम जाधव, कुलगुरू कणबरकर सर, पुढारीकार जाधवसाहेब, पंडितराव माने, धोंडीराम दिंडे, राजा अतिग्रे, दिनकरराव अजगावकर, रावळ मामा, काळेसाहेब, शंकरराव नलवडे, पैलवान आंदळकर, ए. डी. शिंदे आणि त्यांच्या ऑफिसची सर्व मंडळी, शिवाजी विद्यापीठातील काही मंडळी, बापूजी साळुंखे, पाटणकर सरकार, श्रमिक ऑफिसमधले कार्यकर्ते, रिफायनरीचे जाधव, प्रिन्सिपॉल एम. आर. देसाई आणि सखाराम बापू खराडे अशी अनेक मंडळी आईंच्या परिचयाची होती. यामध्ये पहिला जो भेटेल तो आईंची सारी जेवणाखाण्यापासून ते वाळव्याच्या एस.टी.बसमध्ये बसवेपर्यंत सर्व काळजी घ्यायचा.

आई सांगली मिरजेला कामानिमित्त आल्यानंतर प्रथम नामदेव कराडकरांच्या घरी जायच्या. बहुतेक वेळा नामदेव घरी नसायचे. परंतु त्यांची गृहलक्ष्मी शांताबाई मात्र त्यांना नक्की भेटायच्या. आई त्यांच्या घरी पोहोचल्याबरोबर म्हणायच्या, ''ये शांता, माझा पोरगा कुठाय?'' (नामदेव कराडकरांना त्या आपला मुलगा मानत) शांताबाई म्हणायच्या, ''अहो आई, पोरगा कशाला

पाहिजे? मी आहे की, काय पाहिजे तुम्हाला? अगोदर जेवणार का, चहा करून देऊ?'' आईंना जर वाटलं तर जेवायच्या. नाहीतर चहा पिऊन नंतर येतो, असं सांगून निघायच्या. मग सांगलीतील मजलेकर पाटील, बापू कुंभोजकर, जैन बोर्डिंगमधील मंडळी, सांगली हायस्कूलमधील मंडळींच्या गाठीभेटी घेत, सांगली साखर कारखान्यावर वसंतदादा असतील तर त्यांनाही भेटायला जायच्या. शांतिनिकेतनमध्ये प्राचार्य पी. बी. पाटलांच्या घरी पोहोचताच, ''सरोज घरात आहे का? शाळेत आहे? शाळेत असतील तर वाळव्याची आई आलीया म्हणून सांगा.'' ही वाक्ये ठरलेली असायची. प्राचार्य पी. बी. पाटील कधी असायचे, कधी नसायचे (पी. बीं. ना ही त्यांनी आपला मुलगा मानले होते.) सरोज भेटल्याबरोबर आई म्हणाल्या, सरोज माझ्या मुलाची काळजी घेतेस नव्हं? त्या म्हणायच्या, ''अहो आई, तुमचा मुलगा आता लहान आहे काय त्याची काळजी घ्यायला?'' आई म्हणायच्या, ''सरोज तसं नव्हं. त्यांची कामं मोठी. ते सतत कामात असतात. तेव्हा वेळच्या वेळी जेवण-खाण देतेस का? हे मला तुला विचारायचं होते.'' असे दोघींमध्ये सासु-सुनेचे नाते होते. अशा प्रकारे गप्पा झाल्यानंतर जेवण-खाण व्हायचं. आई जातो म्हणाल्या तर सरोजताई त्यांना कधी गाडीतून तर कधी रिक्षातून आपल्या शाळेतल्या शिपायाबरोबर एस.टी. स्टॅण्डवर पोहोच करायच्या. बऱ्याचवेळा आई पी. बी. पाटील, नामदेव कराडकर यांच्याकडेच मुक्कामाला असायच्या. इतकं त्यांचं जिव्हाळ्याचं नातं होतं.

आईंनी आपल्या अशा मायाळू स्वभावाने अनेक माणसं जोडली होती. त्यांच्या ओळखीचे सांगली-मिरजेत खूप डॉक्टर होते. डॉ. आनंद गायकवाड व त्यांच्या पत्नी सौ. माणिकताई गायकवाड, डॉ. हेमंत पडिया, डॉ. मिना पडिया, डॉ. टकले, डॉ. खाबडे, डॉ. ओहोळ, डॉ. रणभिसे असे काही नामवंत डॉक्टरांशी त्यांचे जिव्हाळ्याचे व आपुलकीचे नाते होते. या ओळखीचा, नात्याचा उपयोग आईंनी गोरगरीब गरजू आजारी माणसांसाठी करून समाजसेवा केली. जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद, कोर्ट-कचेरी येथील ओळखीचे तसेच आमदार, खासदार या सर्वांच्या ओळखीचा फायदा त्यांनी सर्वसामान्य जनतेच्या कल्याणासाठीच केला. आपला अमूल्य असणारा लोकसंग्रह लोकसेवेसाठी वापरण्याचा एक वेगळा छंद त्यांनी जोपासलेला होता.

■■■



प्रकरण सव्वीस

# क्रांतिमाता अनंतात विलीन

''प्रत्येक जन्मलेल्या जिवाला एक दिवस ह्या जगाला सोडून जावे लागते. ह्यात वेगळं असे मी काही सांगत नाही,'' असं त्या म्हणायच्या. परंतु नेहमीची आईंची दिनचर्या ठरलेली असायची. रात्री माणसं गाढ झोपेत असतात, त्यावेळी त्या जाग्या असायच्या. शाळेत रात्री अकरा वाजता यायच्या. कुठल्यातर झाडाच्या वल सावलीत (रात्रीच्या वेळी झाडाची पडणारी सावली) बसायच्या, चहुकडे लक्ष देत दोन-अडीच तास थांबायच्या. नंतर बारा-एकच्या दरम्यान घरी जायच्या. अण्णा शाळेत असतील, तर दुसरी एक चक्कर मारायच्या. दोन अडीच वाजता घराकडं यायच्या, मग झोपायची तयारी करायची. पहिली भल्या पहाटेची कोंबड्यानं बांग दिली म्हणजे काही माणसांना जाग येते. आई म्हणायच्या, ''मी तेव्हा अंथरुणावर कलंडायची. जवळचा कंदील जरा बारीक करून निपचीत पडायची आणि पहाटेच्या कोंबड्यानं दुसऱ्यांदा बांग दिली की गडद झोपायची.'' घरादारातली, गल्लीतली, शाळेतली माणसं जागी व्हायची आणि ती आपाआपल्या उद्योगाला लागायची. क्रांतिमातेचा मात्र ठरलेला नियम. मी सहज आईना विचारलं, ''असं कशासाठी करता?'' ''हे बघ जयवंत, तुला त्यातलं कळायचं नाही. पहिल्या गाढ झोपेत माणसं असतानाच पोलीस रेड टाकतात. दरोडेखोर-गुंड लोक, घातपात करतात. छप्पर-गंज्या पेटवापेटवी, चोऱ्या करतात, जनावरं पळवतात म्हणून मी त्यावेळी जागी राहते. ह्या साऱ्या खोडी करणाऱ्यांचा मला १९४२ पासूनचा चांगला अनुभव आहे.''

सोमवार २६ जून, १९८९ या दिवशी आईनी नेहमीप्रमाणे रात्रचर्या संपवली. पहाटे गाढ झोपल्या. सकाळी नेहमीपेक्षा लवकर उठल्या. मंगळवार ता. २७ जून, १९८९. सकाळी अंघोळ-पाणी झालं. चुलीवर चहाचं डिचकं ठेवलं. कपाळी नेहमीप्रमाणे मोठाच्या मोठा कुंकवाचा टिळा लावला. बशीत सांडेपर्यंत कपात चहा भरून घेतला. शाळेकडे जाऊन अण्णांना भेटून आल्या. नातवंडांची शाळेला जायची तयारी चालली होती. थोरला नातू शेतकरी, त्यांना सकाळी लवकर न्याहरीची सवय. त्याची न्याहरी झाली का याची चौकशी धाकटी सून हौसाकडं झाली. धाकटा मुलगा शामराव अप्पा, त्यांना आईच्या हातचाच चहा लागत असे. घरच्या बायकांनी कुणी अगोदर चहा दिला असला तरी अप्पांना आईच्या हातचा चहा पाहिजेच. त्यांना चहा पाठवला. अण्णांच्या जेवणाची भांडी घासून-पुसून ठेवली. नातू जेवून शाळेला गेले. शामराव अप्पांचे जेवणाचे ताट वाढून दिले. अण्णांचे जेवणाचे ताट शाळेत पाठवले. सुना जेवल्या. घरची बाहेरची सारी माणसं जेवली खाल्ली. अण्णांच्या जेवणानंतर अण्णांचं आलेले खरकटं ताट धुवून ठेवलं. आपण नेहमीप्रमाणे चतकोर भाकरी, खरड्याबरोबर खाल्ली आणि विश्रांतीसाठी थोड्या कलांडल्या. थोड्याच वेळात धाकट्या सुनेला बोलावलं आणि थोडसं उठत म्हणाल्या, ''हौसा, मला जरा कसंतर होतंय गं.'' येवढं कशातर बोलल्या आणि खाली कोसळल्या. अण्णा शाळेत होते. त्यांना समजल्या-समजल्या ते तातडीने आले. त्यांनी बघितलं. अप्पापण तिथे होते. दोघांनी आईला बोलवलं. आई खूप लांब गेली. एक धगधगती क्रांतिविरांगणा सौ. लक्ष्मीबाई अनंतात विलीन झाल्या. तो वार मंगळवार ता. २७ जून, १९८९ होता. त्यांना आपलं मरण जवळ आलं हे कळलं होतं का? ते माहीत नाही. परंतु सकाळी उठल्यापासून आई जी साऱ्यांची काळजी घेत होत्या, त्यावरून असं वाटतं की, त्यांना आपल्या मृत्यूचा सुगावा लागला असावा.

हा हा म्हणता ही बातमी वाळवा आणि आसपासच्या गावांना लागली. आईंच्या अखेरच्या दर्शनासाठी गावातून स्त्री पुरुषांचे, मुलांचे लोंढेच्या लोंढे येत होते. माझी आई कृष्णाबाई, पत्नी जयश्री आणि तीन वर्षांची मुलगी ज्योत्स्ना चांदोली धरणाजवळ सोनवड्याला हुतात्मा नगरला होत्या. मिळेल त्या वाहनांनी आईच्या दर्शनाला आल्या. त्यांनी आईला पाहिलं, आई गेल्यात असं वाटेना. असं आईच्या चेहऱ्यावर तेज होतं. ते आई जीवंत असताना मी



अनेक वेळा पाहिलं होतं. माझी आई, क्रांतिमातेपेक्षा वयानं दहा वर्षांनी लहान होती. पण एकमेकींवर जीव दांडगा होता. तो मी अनेक वेळा अनुभवला होता.

शिराळ पेट्यातून, वाळवे तालुक्यातून सांगली पर्यंतची हजारो माणसं आईंच्या दर्शनाला येत होती. क्रांतिमातेची गावातून मिरवणूक काढून कृष्णेच्या काठावर पाच-सहा हजाराच्या जनसुमदायात, चंदनाच्या लाकडात धाकटा मुलगा शामराव अप्पांनी अश्रुपूर्ण नयनांनी अग्नी दिला. त्यावेळी अनेकांना आपले हुंदके आवरता आले नाहीत. तीच अवस्था नागनाथअण्णांची झाली. लहान मुलासारखे अण्णा रडत होते. इकडे आईचा देह जळत होता. आई गेल्या परंतु कीर्तिरूपानं त्या मागे राहिल्या. त्यांच्या आशीर्वादानं सारं काही अबाधित आहे. ते सदैव तसंच राहील.

तिसरा दिवस रक्षा विसर्जनाचा. या क्रांतिमातेला अनेक थोरामोठ्यांनी श्रद्धांजली वाहिली. इंदूताई पाटणकरांचा क्रांतिमातेवर जीव फार होता. त्यांना आपली आई गेली, आपण पोरके झालो असे वाटले. तरी त्यांनी स्वत:ला सावरलं आणि मोठ्यानं घोषणा दिली, 'वीरमाता लक्ष्मीबाई नायकवडी अमर रहे.' त्या पुढे म्हणाल्या, 'अमर रहे याचा अर्थच असा होता की, क्रांती ही नेहमी अमर राहिली पाहिजे आणि ती अमर असते.' इंदूताई पुढे म्हणाल्या, 'आई, या अण्णांच्या आई म्हणून प्रसिद्धीला आल्या नाहीत, तर स्वकर्तृत्वाने सातारा, सांगलीच काय संपूर्ण महाराष्ट्रात गाजल्या. स्वातंत्र्य चळवळीतलं त्यांचं कार्य अविस्मरणीय असं होतं. त्या माझी ओळख करून देताना नागनाथअण्णांना म्हणाल्या होत्या, 'अण्णा, तसा बाबूजी पाटणकर माझा मुलगा. त्यांची ही मालकीन. ही ही मला मुलीसारखीच. जात, धर्म, देश निरपेक्षतेच्या त्या पलीकडे होत्या. स्वातंत्र्य सैनिकांच्या स्मृतिदिनाला आवर्जून हजर असायच्या. दे. भ. दादासाहेब उंडाळकरांच्या स्मृतिदिनाच्या कार्यक्रमानिमित्त प्रमुख पाहुण्या अरुणा असफअल्ली आल्या होत्या. त्यांची आणि आईंची नोव्हेंबर, १९४३ च्या शेवटच्या आठवड्यात येरवडा जेलमध्ये ओळख झाली होती. त्या भेटीची आठवण करून दिली. त्यांच्या बरोबर आई हिंदीत बोलत होत्या. आपली स्वत:ची ओळख करून देताना आई त्यांना म्हणाल्या, 'मै नागनाथ नायकवडी की माँ हूँ' आई वयाच्या ८९ वर्षीही एखाद्या तरुणीला लाजवेल अशा पद्धतीने काम करायच्या. मृत्यूच्या आदल्यादिवशी २६ जून, १९८९ रोजी त्या एका

लग्नाला जाऊन आपल्या होत्या. अशा आईबद्दल बोलावं तेवढं थोडंच आहे. तरी शेवटी एवढंच सांगेन, ''ही क्रांतिज्योत शेवटपर्यंत प्रत्येकाच्या अंतकरणात कर्तृत्वाची-क्रांतीची ज्योत पेटवून गेली. जाता जाता क्रांतिमातेचा संदेश आहे, 'मी तुम्हाला हा यशाचा कुंकुम तिलक लावते. तुम्ही उठा, कामाला लागा. एकीन रहा, थांबू नका. घेतला वसा सोडू नका. अन्यायाला भिऊ नका, माणुसकीच्या हक्कासाठी लढा. माणूस म्हणून जगा. येवढंच.''

अण्णा त्यावेळी म्हणाले, ''आईनं माझ्याकडे दोन गोष्टींची इच्छा व्यक्त केली होती. त्यापैकी एक इंदिरा गांधींना भेटायचं आणि दुसरी इच्छा एक वेळ विमानात बसायचं. त्यापैकी इंदिरा गांधींना भेटण्याचा योग आला, तो सांगलीला. लोकसभेच्या निवडणुकीच्या प्रचारासाठी इंदिरा गांधी आल्या होत्या.

आई वाळव्याहून निघाल्या. त्या आज इंदिरा गांधींना भेटायचंच या निर्धाराने सांगलीला आल्या होत्या. अनेक सभा करत इंदिरा गांधींना सांगलीला यायला खूप वेळ झाला. रात्रीचे एक दीड वाजले होते. इंदिरा गांधी सभेच्या ठिकाणी आल्याबरोबर तडक स्टेजवर गेल्या. त्यांच्याबरोबर पद्मभूषण वसंतदादा व मोजकेच प्रतिष्ठित पुढारी स्टेजवर गेले. क्रांतिवीर नागनाथअण्णांचे ड्रायव्हर महेश कांबळे व मी (जयवंत अहिर) आईंना घेऊन इंदिरा गांधींना भेटण्यासाठी स्टेजकडे निघालो होतो. स्टेजकडे जाण्याअगोदरच आम्हाला पोलीस अधिकाऱ्यांनी त्यांच्या नियमाप्रमाणे अडवले. आम्ही त्यांना विनंती केली, या नागनाथअण्णांच्या आई आहेत, त्यांना इंदिरा गांधींना भेटायचे आहे. परंतु पोलीस अधिकारी आम्हाला दाद देत नव्हते. शेवटी आईंनी पोलीस अधिकाऱ्यांना दरडावले, आईचा तो आवाज वसंतदादांचे कानापर्यंत पोहचला. दादांचे लक्ष आईंकडे गेले. त्यांनी जवळ असलेल्या पोलीस अधिकाऱ्याला खाली पाठविले आणि आईंना स्टेजवर आणायला सांगितले. आईंची आणि इंदिरा गांधींची दादांनी आपल्या नेहमीच्या पद्धतीने ओळख करून दिली की, इंदिरा गांधींनी ती ध्यानात ठेवावी. इंदिरा गांधीना आई भेटल्याबरोबर त्यांनी मायेने त्यांच्या तोंडावरून हात फिरवला. इंदिरा गांधींचा खांद्यावरचा पदर त्यांच्या डोक्यावर घातला. आई हिंदीमध्ये म्हणाल्या, ''मेरा आशीर्वाद है, आप को लंबी उमर मिले, कामयाबी आपके कदम चुमे।''

पुढे अण्णा म्हणाले, ''अशी आईची व इंदिरा गांधींची भेट माझे परममित्र



वसंतदादा यांनी घातली. मी मात्र माझ्या आईला विमानात बसवू शकलो नाही. पुढे आई इंदिरा गांधीना हिंदीतून पत्र पाठवत होत्या. त्या पत्राची उत्तरे इंदिरा गांधींकडून आईंना येत होती. आई हिंदी बोलत होती, पण तिला लिहिता येत नव्हते. सूर्यवंशी म्हणून हिंदीचे शिक्षक आमच्याकडे होते. त्यांचं गाव डिग्रज. ते आई सांगेल त्याप्रमाणे हिंदीत पत्र लिहायचे आणि त्यावर इंदिरा गांधींचा पत्ता लिहून पत्र पोष्टात टाकत असत.''

साहेबजी बा. सनदे (रा. आष्टा) हे आपल्या लेखात क्रांतिमातेबद्दल लिहितात, ''स्वातंत्र्य लढा, राजकारण, शिक्षण, समाज सुधारणा व सहकार या क्षेत्रामध्ये त्यांनी जिद्दीनं काम केलं. स्त्रियांना आंबे, चिंचा, बोरे व मातीचे डोहाळे लागत होते. ......मला मुलगा दे, मी तो स्वातंत्र्यासाठी भारतमातेच्या चरणी वाहिन. त्याप्रमाणे लक्ष्मीबाईंना नागनाथ नावाचा सुपुत्र झाला आणि त्यांनी देश सेवेसाठी वाहिला. त्याचबरोबर त्यांनी स्वत:लाही वाहून घेतले.''

हुतात्मा किसन अहिर विद्यालयातील सेवक बाळासाहेब सखाराम पाटील चावरेकर आईंची आठवण सांगताना म्हणाला, ''आई खेळाडूंबरोबर महाराष्ट्र राज्य सामन्यावेळी नेहमीप्रमाणे आल्या होत्या. त्यावेळी औरंगाबादला सामने होते. सामने संपल्यानंतर आम्ही सर्वजण देवगिरीचा दौलताबादचा किल्ला पाहायला गेलो. तो किल्ला पहायचा म्हटलं तर किती वर चढून जावे लागते. तसेच बारीकशी अरूंद वाट असलेला भुयारी रस्ता पार करावा लागतो. मला आश्चर्य वाटलं, एवढ्या उंचावर एवढ्या वयातही न दमता आई किल्ला चढल्या. किल्ल्यावर चढत असताना काही सुखवस्तुतल्या स्त्रिया कंटाळून बसल्या होत्या. त्यांचेकडं पहात आई म्हणाल्या, ''तूप रोटी खाणारी ही म्हातारी नव्हं. चटणी-भाकरी खाणारी आहे.''

तो पुढं बोलताना म्हणाला, 'जयामामा, आईंच्या अनेक आठवणी सांगता येतील. आपल्या शाळेतली मुलं-मुली राज्य क्रीडा स्पर्धेसाठी मीरतला खेळायला गेली होती. सततच खेळाडूंच्या बरोबर आई असायच्या. त्याप्रमाणे त्या आमच्याबरोबर होत्या. दिल्लीच्या पुढं एक तासाच्या रस्त्यावर मीरत. आम्ही सारी स्टेशनवर उतरलो आणि रहाण्याच्या ठिकाणाकडे चालत निघालो होतो. मला खरोखर भूक लागली होती. मी आईंना म्हणालो, 'आई मला भूक लई लागलीया. येवढं म्हणतोय तवर आईनं माझा हात धरला आणि आई एका

घरासमोर आल्या. 'घरात कोण आहे का?' त्यांनी विचारलं. ते घर एका मुसलमानाचं होतं. घरातून मुस्लीम समाजाची बाई आली. ती म्हणाली, ''काय हो मावशी?'' ''अहो, या पोरांना भूक लागल्या. त्याला असंल तर जेवण वाढा, नाहीतर कायतर खायला द्या.'' त्या बाईनं आईकडं पाहिलं आणि त्यांना घरात बोलवलं. बाळूला जेवायला वाढलं. आईंना चहा करून दिला. बोलता बोलता योगा-योगानं त्या बाईचे पाहूणे कराडचे निघाले, ही गोष्ट वेगळी. वाळवा कुठं? मीरत कुठं? ओळख पाळख नसताना आपल्या घरातल्या एखाद्या बाईला सांगितल्यागत आईचं वागणं बघून सर्वांना आश्चर्य वाटलं. त्या बाईंनी आईला सांगितलं, ''तुम्ही इथं आहात तोपर्यंत रोज आमच्या घरी या.'' आईंचं वागणंच असं होतं. समोरच्या माणसाला जीव कसा लावावा हे आईकडनं शिकावं. त्या घरातून बाहेर पडताना बाळूला रहावलं नाही. तो आईंना म्हणाला, 'आई, तुमच्यातला हा गुण मला माहीत नव्हता.' त्यावर आई बाळूला म्हणाल्या, 'आरं बाळू, तुलाच काय साऱ्या पोरांना जेवायला वाढायची हिम्मत माझ्यात आहे. अरं बाबा, ओळख-पाळख नसताना गावातून पन्नास पन्नास भूमिगत कार्यकर्त्यांसाठी जेवण मागून गोळा करायचं आणि ते त्यांच्या ठिकाणापर्यंत पोच करायचं, काम मी अनेकवेळा १९४२ च्या स्वातंत्र्य लढ्याच्या वेळी केलंय.'

या क्रांतिमातेच्या अशा असंख्य आठवणी आहेत. १९६४-६५ पासून त्यांच्या मृत्यूपर्यंत मी त्यांना अगदी जवळून पाहिलंय, अनुभवलंय. अनेक भाग, अनेक गावं फिरलो. अनेक कुटुंबात गेलो. मात्र असं एकही कुटुंब आढळलं नाही की, ज्यांनी क्रांतिमातेची आठवण काढली नाही. अनेकांचा जिव्हाळा आणि प्रेम मिळवणारी ही साऱ्यांची 'आई' २७ जून, १९८९ रोजी अनंतात विलीन झाली. मात्र तिच्या आठवणींचा सुगंध अजूनही दरवळतो आहे. 'कसं जगावं आणि कशासाठी जगावं?' याचा उत्तम नमुना या तेजस्वी लढवय्या क्रांतिमातेच्या जीवनानं आम्हाला दिला आहे. अजूनही ती माता हजारो-लाखो माणसांच्या मनात आठवणींच्या रूपाने जिवंत आहे. शेवटच्या श्वासापर्यंत तिच्या आठवणींचा प्रकाश आमच्या जीवनात मार्गदर्शक ठरणार आहे.

■■■



# क्रांतिमातेवरील काव्य

क्रांतिमाता लक्ष्मीबाई नायकवडी यांना काव्यातून वाहिलेली श्रद्धांजली.

### १. 'क्रांतिमाता'

स्वातंत्र्यरणी रणरागिणी तू तळपलीस माउली
तुझ्या पाऊली वीर माउली विनम्र श्रद्धांजली!
झांशीच्या लक्ष्मीपरी तू
फडकविसी शौर्याचा केतू
तव वाणी स्वातंत्र्य सैनिका रणभेरी भासली...१

भोगुनी कारावास भयंकर
सोन्यापरी उजळशी शुभंकर
तुझ्या कृतीने होऊन दुबळी वीर रणी उतरली...२

स्वातंत्र्यातही सदा कर्मरत
सुराज्य बनवाया उन्नत
मानवतेची ध्वजा निज करी धैर्याने मिरविली...३

नित्यशब्द तव प्रेमळ निर्मळ
पाप ताप हारी गंगाजल
भाग्यवंत आम्ही म्हणून आम्हाला तव ममता लाभली...४

अवचित आज कशी तू गेलीस?
साऱ्या अणूरेणूतून भरलीस
'उठा, करा काही' शब्दावली आकाशी दाटली...५

फिरले अजूनही पाठीवर
तुझा माउली प्रेमळसा कर
या आशेवर जगतो, लाभो कृपा सावली...६

कवी सुधांशू
दि. २ जुलै, १९८९

## २. 'आईच्या अमर आठवणी'

कृष्णामाई सांगत जाई । मज गावा वरूनी ।।
लक्ष्मी आई सोडून जाई । रमणीय आठवणी ।।१

मातृभूमिच्या सेवेसाठी । सुपुत्रास जन्म दिला ।।
स्वातंत्र्याच्या कार्यासाठी । तुरूंग हा भोगला ।।२

नागनाथांची लक्ष्मी आई । इंग्रज केलं हैराण ।।
झाशीवाली लक्ष्मीबाई । हीच शोभंल शान ।।३

शिक्षण राजकारण धुरंधर । वीर सैनिका आई ।।
गरिबांचा सावरला संसार । चतुर लक्ष्मी आई ।।४

तुझीच छाया, तुझीच माया । मिळेल का गरिबास ।।
किसन अहिरचा घालून पाया । शुगर दिली देशास ।।५

क्रांतिकारक कार्य करूनी । सत्य मार्ग दावला ।।
तन-मन-धन देशास अर्पुनी । स्वर्गवास साधला ।।६

अगणित अशा रम्य आठवणी । भरल्या या जीवनात ।।
कंठ दाटला आज अश्रुंनी । कीर्ती झाली जगात ।।७

कवी - साहेबजी सनदे 'राही'
स्वातंत्र्य सैनिक, आष्टा
दि. ३० जून, १९८९



## ३. मूर्तिमंत क्रांतिवाली

नायकवडी लक्ष्मीबाई । ही तर झाशीवाली आई ।
कन्या ही कलकत्तावली । सातारा वाळवावाली ।
देशभक्तांना सावली । दीन दुबळ्यांची माउली ।।

बेचाळीस-संग्रामवाली । मूर्तिमंत क्रांतिवाली ।
क्रांतिसिंहा भाकर घाली । क्रांतिपुत्र जन्म घाली ।
बाळकडू क्रांती प्याली । धन्य धन्य ती माउली ।।

शाळेची सोबतवाली । शेतात घाम ती गाळी ।
झुणका भाकरवाली । घर तिथेचे चंद्रमौळी ।
ही साध्वी मराठमोळी । ती आज दिसेना जवळी ।।

स्वातंत्र्य समतावाली । बाळात स्वत: जी रमली ।
कष्टात कधी ना शिणली । सादगी स्वत: जी जगली ।
रयतेच्या संसारातील । सुगरीण आज ही गेली ।।

कवी - ॲड. शिवराम कृष्णाजी पाटील (बोरगावकर)
इस्लामपूर

अमर रहे! अमर रहे!! क्रांतिमाता लक्ष्मीबाई अमर रहे!!!

## नोंदी